मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

**मुंबई कार्यालय**
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

**पालघर कार्यालय**
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५

**नाशिक कार्यालय**
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

**वितरण**
मो. नं. ८४२४९३६४३६

मुंबई | RNI No.: MAHAMAR/2016/79101 | शनिवार, ७ जून २०२५ | वर्ष: १० | अंक: ३८ | पाने-८ | किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

## कर्जाचे हप्ते आणखी कमी होणार आरबीआयकडून रेपो दरात कपात

मुंबई , दि. ६ प्रतिनिधी

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या आर्थिक चलनविषयक धोरण समितीच्या तीन दिवसांच्या बैठकीत रेपो रेट ०.५० टक्क्यांनी कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे आता रेपो रेट ६ टक्क्यांवरून कमी होऊन ५.५० टक्के इतका झाला असल्याची माहिती आरबीआय गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी दिली. आरबीआयच्या या निर्णयामुळे तुमचे गृहकर्ज, वाहनकर्ज, वैयक्तिक कर्ज आणि इतर कर्जाचे हप्ते कमी होणार आहेत. आरबीआयची सहा सदस्यांची टीम महागाई लक्ष्य साध्य करण्यासाठी पॉलिसी रेपो दरातील बदलांवर चर्चा करते. बैठकीच्या तिसऱ्या दिवशी चलनविषयक धोरणाबाबत निर्णय आणि माहिती दिली जाते.

अग्रलेख

## खरीखरी

## समृद्धीचे गणित

अखेर एकदाचा समृद्धी महामार्गाच्या संपूर्णीकरण सोहळ्याचा उपचार पार पडला. हा समृद्धी महामार्ग नागपूर आणि मुंबइ यांच्यातील तेवढेच अंतर कापण्यासाठी जो वेळ लागत होता. तो कापून ६० टक्के वर आणला. म्हणजे आता नागपूर ते मुंबइ हे अंतर आठ तासात पार होइल, अशी घोषणा करण्यात आलेली आहे. वास्तविक पाहता समृद्धी महामार्ग मुंबइला पोहोचतच नाही. त्याची समृद्धी फक्त ठाण्यापर्यंत आहे. आपल्या मनाचे समाधान करण्यासाठी आणि ज्यांना ज्यांना ठाणे म्हणजे मुंबइ नाही. हे माहीत नाही, त्यांना आठ तासात मुंबइ हे गणित सांगायला हरकत नाही. समृद्धी महामार्ग संपल्यावर मुंबइ जिथून शून्य मैलावर राहते. तोपर्यंत मुंबइच्या गजबजलेल्या रस्त्यांवरून ते ठिकाण गाठण्यास किमान दोन ते अडीच तास लागतात. समृद्धीचा प्रवास ठाण्यापर्यंत करण्यासाठी १२० किलोमीटर प्रति तासाचे गणित केले. तर कुठेही न थांबता हा प्रवास आठ तासात पूर्ण होऊ शकतो. पण या आठ तासात तुम्ही स्वतः गाडी चालवत असाल किंवा तुमचा एखादा ड्रायव्हर गाडी चालवत असेल. तर किमान तीन वेळा तुम्हाला गाडी थांबवावी लागते. तशी ती थांबवणे भाग आहे. अन्यथा चालकाला झोप येइल. कारण त्या मार्गावर ब्रेक मारायचा नसतो. ब्रेक मारण्याची सहसा गरजच नसते. सहजपणे इतर वाहनांना ओव्हरटेक करता येते. अशा स्थितीत इतर कोणतीही दक्षता घेण्याची गरज नसते. त्यामुळे जर गाडी दर दोनशे किलोमीटरवर थांबवली नाही. तर ड्रायव्हरला डुलकी लागण्याचा आणि गाडीला अपघात होण्याचा धोका उद्भवू शकतो. यामुळे स्वयंचलित गाड्यांच्या दाव्यावर आपल्याला विश्वास ठेवता येत नाही. त्या गाडीचे ऍव्हरेज प्रतिलिटर ३० किलोमीटर असते. प्रत्यक्षात तेच ऍव्हरेज इथे १४ ते १५ किलोमीटर प्रतिलिटर पेक्षा जास्त उतरत नाही. या समृद्धीचा खर्च १५००० कोटी रुपयांनी वाढलेला आहे. त्यावर विरोधी पक्षनेते काँग्रेसचे राज्याध्यक्ष सपकाळ साहेबांनी भ्रष्टाचाराचा आरोप केला आहे. काँग्रेसच्या राज्यातही एखादी योजना ठराविक वेळेत पूर्ण होत नसायची. तेव्हा अनेक वेळा वाढत्या महागाइमुळे भाववाढ देण्यात येत होती. तेव्हा जर योग्य असेल तर त्या पद्धतीचा खर्च केला जात होता. तर मग आताही हे योग्यच म्हणावे लागेल. मुंबइ पुणे एक्सप्रेस हायवेच्या कंत्राटाचे टेंडर धीरूभाइ अंबानी यांनी ३३ हजार कोटी रुपयांचे भरले होते. तो मुंबइ पुणे एक्सप्रेस महामार्ग तत्कालीन सार्वजनिक बांधकाम मंत्री नितीनजी गडकरी यांनी केवळ अठरा हजार कोटी रुपयांत तयार केला. त्यामुळे आता भ्रष्टाचार वगैरेच्या बाबतीत कोणाकडे बोट दाखवणे म्हणजे स्वतःकडेच बोट दाखवण्यासारखे होते. जेव्हा या समृद्धी महामार्गाचा पहिला टप्पा पूर्ण झाला. तेव्हा भव्यदिव्य कार्यक्रम करून महाराष्ट्रातील सर्व वृत्तपत्रांना जाहिराती देऊन तो प्रसंग थाटामाटाने पार पाडला होता. आता मात्र महाराष्ट्राच्या तिजोरीवर जास्त ताण पडू नये. म्हणून समृद्धीचे समापन कमी खर्चात करण्यात आलेले आहे, हे आवर्जून नमूद करावेसे वाटते. आता समृद्धीच्या महामार्गावरून मुंबइची समृद्धी नागपूर पर्यंत जाइल, असा विश्वास व्यक्त करूया. तसेच या निमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे स्वप्न साकार झाले, त्याबद्दल त्यांचेही मनस्वी अभिनंदन!

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

# जगातील सर्वात उंच रेल्वे पुलाचे उद्‌घाटन



जम्मू, दि. ६ वृत्तसंस्था

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज सकाळी ११ वाजता जम्मूमधील चिनाब नदीवर बांधलेल्या जगातील सर्वात उंच रेल्वे पुलाचे उद्घाटन केले. पंतप्रधान इंजिनमध्ये बसून चिनाब आर्च पुलावरून केबल स्टे अंजी पुलावर पोहोचले. येथे त्यांनी रेल्वेच्या अंजी पुलाचेही उद्घाटन केले. त्यांनी रेल्वे अधिकाऱ्यांसह पूल बांधकाम कामगारांची भेट घेतली.**

तब्बल १३४ वर्षांनी काश्मीरवासींच्या स्वप्नांची पूर्तता झाली आहे. जम्मू ते श्रीनगर या मार्गावरील वंदे भारत एक्स्प्रेस ट्रेनला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हिरवा झेंडा दाखवला. तसेच सर्वांत उंच चिनाब नदीवरील रेल्वे पुलाचे लोकार्पणही पंतप्रधान मोदी यांनी केले. पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर प्रथमच पंतप्रधान नरेंद्र मोदी काश्मीर दौऱ्यावर गेले.

जम्मू-उधमपूर-बारामुल्ला रेल्वे मार्गाची आखणी केंद्र सरकारने केल्याचे सांगितले जात असले तरी प्रत्यक्षात हा मार्ग जम्मू आणि काश्मीरचे महाराज प्रताप सिंह यांनी १८९० सालीच तयार करायला सुरुवात केली होती. मात्र, देशाच्या फाळणीमुळे या प्रस्तावावर पुढे काम होऊ शकले नाही. भारतीय अभियंत्यांनी उथमपूरहून काश्मीरमधील बारामुल्लापर्यंत रेल्वे नेण्यासाठी ज्या मार्गाचा सर्वेक्षण केला, तोच मार्ग महाराजांच्या काळातही निवडण्यात आला होता. या रेल्वेची मूळ योजना तब्बल १३४ वर्षापूर्वीची आहे. परंतु, आता जम्मू ते श्रीनगर मार्ग प्रत्यक्षात जोडण्यात आला आहे.

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर पहिल्यांदाच जम्मू आणि काश्मीरमध्ये गेलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी चिनाब नदीवर बांधलेल्या जगातील सर्वात उंच रेल्वे पुलाचे उद्घाटन केले. याप्रसंगी बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, आई वैष्णो देवीच्या आशीर्वादाने आज काश्मीर खोरे देशाच्या रेल्वे नेटवर्कशी जोडले गेले आहे. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत...असे नेहमीच म्हटले जायचे. पण, आता या रेल्वे नेटवर्कमुळे हे सत्यात उतरले आहे. यावेळी त्यांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा संदर्भ देत पाकिस्तानवर दंगली घडवण्याचा आरोप केला. पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले, जम्मू आणि काश्मीर हा भारतमातेचा मुकुट आहे. हा मुकुट एकामागून एक सुंदर रत्नांनी जडलेला आहे. ही वेगवेगळी रत्ने जम्मू आणि काश्मीरची ताकद आहेत. येथील प्राचीन संस्कृती, येथील परंपरा, येथील आध्यात्मिक चेतना, निसर्गाचे सौंदर्य, येथील औषधी वनस्पती ही येथील रत्ने आहेत. पाकिस्तानने याच भूमितील पहलगाममध्ये मानवता आणि काश्मिरीयत या दोन्हींवर हल्ला केला. त्यांचा हेतू भारतात दंगली घडवणे, काश्मीरमधील कष्टकरी लोकांची कमाई थांबवणे होता. आपला शेजारी देश मानवतेच्या विरोधात आहे. पण, जम्मू-काश्मीरमधील तरुणांनी आता दहशतवादाला योग्य उत्तर देण्याचा निर्णय घेतला आहे. ऑपरेशन सिंदूरचा संदर्भ देत पंतप्रधान मोदी म्हणाले की, आज ६ जून आहे. योगायोगाने एक महिन्यापूर्वी याच रात्री पाकिस्तानवर कारवाई करण्यात आली होती. आता जेव्हा जेव्हा पाकिस्तान ऑपरेशन सिंदूरचे नाव ऐकेल, तेव्हा त्यांना त्यांचा लज्जास्पद पराभव आठवेल, अशी प्रतिक्रिया मोदींनी व्यक्त केली.

### चिनाब रेल्वे पूल आयफेल टॉवरपेक्षा उंच!

काश्मीर खोऱ्याला देशाच्या अन्य भागाशी सुलभतेने जोडणारा एक भव्य पूल चिनाब नदीवर बांधण्यात आला आहे. पॅरिसमधील आयफेल टॉवरपेक्षाही त्यांची उंची अधिक आहे. हा रेल्वे पूल ४० किलोग्रॅम टीएनटी स्फोटकांचा स्फोट किंवा ८ रिश्टर स्केलची तीव्रता असलेल्या भूकंपाचा धक्काही सहन करू शकतो. विशेष म्हणजे स्फोटानंतरही या पुलावरून ताशी ३० किलोमीटर वेगाने रेल्वे जाऊ शकते. हा पूल १,३१५ किलोमीटर लांबीचा असून तो ताशी २६० किलोमीटर वेगाने वाहणाऱ्या वाऱ्याचा आघात सहन करू शकतो. या पुलावर एक फुटपाथ आणि एक सायकल मार्गही बनवण्यात आला आहे.

### पुलाची लांबी १३१५ मीटर

चिनाब नदीवरील सर्वात उंच रेल्वे पूल बारामुल्लास उधमपूर-कटरा-काजीगुंडमार्गे जम्मूला जोडणारा आहे. या पुलाची लांबी १३१५ मीटर आहे. त्यामध्ये ४६७ मीटरचा मेन आर्क स्पेस आहे. हा आतापर्यंत बनवलेल्या कोणत्याही ब्रॉड गेज लाईनवरील सर्वाधिक लांबीचा आर्क स्पॅन आहे. हा पूल पॅरिसच्या आयफेल टॉवर (३२४ मीटर) पेक्षा ३५ मीटर उंच आणि कुतुब मीनारपेक्षा सुमारे पाच पट अधिक उंचीचा आहे. हा चिनाब रेल्वे पूल विकासाच्या बाबतीत एक मैलाचा दगड ठरणार आहे.

### ३०,३५० टन स्टीलचा वापर

दिल्लीतून काश्मीरमध्ये ट्रकमधून सामान येत असते. त्यामध्ये सुमारे ४८ तासांपेक्षाही अधिक वेळ जातो. हा पूल सुरू झाल्यावर ट्रेनने मालवाहतूक केली जाऊ शकेल व वेळेत २० ते २२ तासांची घट होईल. या पुलासाठी आतापर्यंत ३०,३५० टन स्टीलचा वापर करण्यात आला आहे. नदीपासून ३५९ मीटर उंचीवर हा पूल आहे. हा पूल १२० वर्षे टिकून राहील असे त्याचे डिझाईन बनवलेले आहे. भारतीय अभियंत्यांच्या कौशल्याचे हा पूल एक प्रतीक बनला आहे.

### वंदे भारत ट्रेन उद्यापासून सुरू होणार आहे

दरम्यान, उत्तर रेल्वे शनिवार, ७ जूनपासून कटरा-श्रीनगर मार्गावर वंदे भारत ट्रेन सेवा सुरू होणार आहे. आयआरसीटीसी वेबसाइटवर तिकीट बुकिंग करता येईल. कटरा आणि श्रीनगर दरम्यान आठवड्यातून ६ दिवस दोन गाड्या धावतील. उत्तर रेल्वेने सांगितले की ट्रेनमध्ये दोन प्रवास वर्ग आहेत. चेअर कारचे भाडे ७१५ रुपये आणि एक्झिक्युटिव्ह क्लासचे भाडे १३२० रुपये आहे. सध्या गाड्या फक्त बनिहाल येथे थांबतील, इतर थांब्यांचा निर्णय नंतर घेतला जाईल.

### १० तासांचा प्रवास सुमारे ३ तासांत पूर्ण होईल

स्वातंत्र्याच्या ७७ वर्षांनंतरही, हिमवर्षावाच्या काळात काश्मीरचा देशाच्या इतर भागांशी संपर्क तुटलेला असतो. राष्ट्रीय महामार्ग-४४ बंद असल्याने, खोऱ्यात जाण्याचा मार्ग बंद आहे. याशिवाय, जम्मू ते काश्मीर रस्त्याने जाण्यासाठी ८ ते १० तास लागत होते. ट्रेन सुरू झाल्यानंतर, हा प्रवास सुमारे ३ तासांत पूर्ण होईल.

## स्वेच्छेने केलेल्या धर्मांतराला आक्षेप नको - मोहन भागवत

नागपूर, दि. ६ प्रतिनिधी

आपल्या सुरक्षेसाठी आपण आत्मनिर्भर झालं पाहिजे. आपल्या 'स्व'वर आपण निर्भर असलं पाहिजे. त्यासाठी आपलं सैन्य, शासन-प्रशासनासोबत समाजाचं बळ असणं आवश्यक आहे , असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी केलं आहे. तसेच स्वइच्छेने केलेल्या धर्मांतराला आक्षेप घेऊ नये, असं मोठं विधान त्यांनी केलं आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने नागपूर येथे कार्यकर्ता विकास वर्ग (द्वितीय)चं आयोजन केलं होतं. विकास आणि पर्यावरण या दोन्ही गोष्टी एकत्रित राहू शकतात. आदिवासी हे आपलेच बांधव आहेत. ते आपल्या समाजाचाच एक भाग आहेत. त्यामुळे त्यांच्या समस्या आपण निश्चितपणे शासनापुढे मांडणार आहोत. त्यासाठी आमची एक कार्यपद्धती आहे. शासन आपलं काम करेल. आमच्या विविध संघटनांच्या माध्यमातून स्वयंसेवकांनी वनवासी भागात खूप काम केलं आहे, असं ते म्हणाले. स्वतःच्या इच्छेने केलेल्या धर्मांतराला कोणताही आक्षेप नसावा. पण जबरदस्ती, आमिष दाखवून किंवा फसवून धर्मांतर होऊ नये. आम्ही कोणत्याही पंथाच्या विरोधात नाही. जबरदस्तीने धर्मांतरित झालेले लोक जर स्वधर्मात परत यायचे ठरवत असतील, तर त्याचे स्वागतच आहे. संघ आणि समाज एकत्र येऊन नक्षलवाद आणि धर्मांतराच्या समस्येचं निराकरण करू शकतात, असंही त्यांनी स्पष्ट केलं.

## एक पाऊल पुढे या, राज ठाकरे १०० पावले पुढे येतील
## युतीसाठी मनसेने जाहीर केली भूमिका

मुंबई, दि. ६ प्रतिनिधी

राज्यात नव्या राजकीय समीकरणाची चर्चा सुरू आहे. गेल्या अनेक वर्षांपासून वेगळं बस्तान मांडलेल्या ठाकरे बंधूंनी आता एकत्र यावं आणि पालिका निवडणुकीवर ठाकरेंचा झेंडा फडकावा अशी मागणी दोन्ही पक्षातील कार्यकर्त्यांकडून जोर धरू लागली आहे. राज ठाकरे यांनी एका मुलाखतीत केलेल्या एका वक्तव्यावरून या चर्चांना सुरुवात झाली. मात्र, या चर्चेत उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी अद्यापही अधिकृत प्रतिक्रिया दिलेली नाही. दरम्यान, या चर्चा थांबाव्यात आणि मनसेची नेमकी भूमिका काय हे सांगण्याकरता मनसे नेते संदीप देशपांडे आणि अविनाश जाधव यांनी आज पत्रकार परिषद घेतली.



"शिवसेना-मनसे संदर्भातील निर्णय राज ठाकरे घेत असतात. यासंदर्भात कोणतीही चर्चा पक्षांतर्गत झाली नाही. आमचं तोंड दुधाने पोळलं गेलं आहे, त्यामुळे आम्ही ताकही फुंकून पितो. जोपर्यंत कोणताही ठोस प्रस्ताव राज ठाकरेंपर्यंत पोहोचत नाही, तोवर आम्ही निर्णय घेणार नाही. ज्यावेळेला येईल, त्यावेळी योग्य तो निर्णय राज ठाकरे घेतील", असं संदीप देशपांडे यांनी स्पष्ट केलं.

"२०१४ आणि २०१७ मधील घटनांचे आम्ही साक्षीदार आहोत. ज्यावेळी आपण युती करावी अशी आमची भावना होती, तेव्हा म्हणजेच २०१४ रोजी बाळा नांदगावकर राज ठाकरेंच्या आदेशाने मातोश्रीवर गेले होते, तेव्हा उद्धव ठाकरेंनी त्यांना भेट दिली नाही. पण सुभाष देसाईंना ते भेटले, तेव्हा राज ठाकरेंना युती करायची आहे, असं त्यांना कळवलं होतं. याला म्हणतात प्रस्ताव. असा कोणताही प्रस्ताव आता आमच्याकडे आलेला नाही. त्यामुळे त्यावर राज ठाकरेंनी कसा निर्णय घ्यायचा आहे?" असा प्रश्न संदीप देशपांडे यांनी विचारला.

## संकेत नाही आता बातमीच देणार- उद्धव

महाराष्ट्राच्या मनात जे आहे ते होणार, आता संकेत देणार नाही, थोड्या दिवसात बातमीच देतो असं थेट वक्तव्य उद्धव ठाकरे यांनी केलं. आपल्या शिवसैनिकांच्या मनात कोणताही संभ्रम नाही, त्यांच्या कार्यकर्त्यांच्या मनातही कोणताच संभ्रम नाही असंही उद्धव ठाकरे म्हणाले. त्यामुळे मनसे आणि शिवसेना ठाकरेंच्या युतीवर दोन्ही नेते सकारात्मक असल्याचे संकेत मिळत आहेत. मनसेच्या या प्रतिक्रियावर उद्धव ठाकरेंनी वक्तव्य केलं. महाराष्ट्राच्या जनतेच्या मनात जे काही आहे ते होणारच असे उद्धव ठाकरे म्हणाले. युतीच्या चर्चांवर आता कोणतेही संकेत देणार नाही, थेट बातमीच देतो असंही ते म्हणाले. उद्धव ठाकरेंचे हे वक्तव्य म्हणजे शिवसेना-मनसे युतीकडे पडलेलं पुढचं पाऊल असल्याची चर्चा आहे.

## सामान्यांपासून 'समृद्धी' दूर का ?
## एसटी बसेसला समृद्धी महामार्गावर परवानगी द्या- आमदार रईस शेख



मुंबई, दि. ६ प्रतिनिधी

राज्याच्या गाजलेल्या 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गावर' आता 'एसटी' बसेस धावतील का? हा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. भिवंडी पूर्वचे समाजवादी पक्षाचे आमदार रईस शेख यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पत्र पाठवून स्पष्ट मागणी केली आहे – "एसटी बसेसला समृद्धी महामार्गावर परवानगी द्या, अन्यथा हा महामार्ग केवळ श्रीमंतांच्या चैनसाठीच उरणार आहे."

आमदार रईस शेख म्हणाले, "७०१ किलोमीटरचा हा महामार्ग म्हणजे राज्याच्या आर्थिक प्रगतीचा मेरुमणी आहे. १० जिल्ह्यांमधून जाणारा, ३९२ गावांना जोडणारा हा महामार्ग सामान्य माणसासाठीच हवा होता. पण आज या महामार्गावरुन महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या – एसटी – बसेसना धावण्यास परवानगी नाही, हे दुर्दैवी आहे." त्यांनी खळबळजनक इशारा दिला – "हा महामार्ग सामान्य जनतेच्या कराच्या आणि सार्वजनिक निधीतून उभारण्यात आला आहे. पण आज त्या सामान्यांनाच या मार्गाचा वापर करता येत नाही. त्यामुळे समृद्धी महामार्ग 'श्रीमंतांची समृद्धी', आणि 'सामान्यांची वंचना' ठरत आहे."

**टोल आणि तिकीट – सामान्यांच्या खिशाला टोचणारे**

आमदार शेख यांनी हा मुद्दा अधिक ठामपणे मांडला. "या महामार्गावर २६ टोल नाके आहेत. एसटी सारखी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था नेहमीच तोट्यात असते. त्यामुळे जर एसटी बसेसना समृद्धी महामार्गावर परवानगी दिली, तर त्यांना टोल माफीही मिळाली पाहिजे. अन्यथा सामान्यांना हा प्रवास परवडणारा ठरणार नाही," असा दावा त्यांनी केला.

**'अटल सेतू', 'कोस्टल रोड'ही सामान्यांसाठी बंदच!**

केवळ समृद्धी महामार्गच नाही, तर 'अटल सेतू' आणि मुंबईचा 'कोस्टल रोड' यावरसुद्धा सार्वजनिक वाहतुकीस बंदी आहे. यावर टीका करताना शेख म्हणाले, "श्रीमंतांच्या वाहनांसाठी रस्ते खुले, पण सामान्यांसाठी बंद – ही धोरणे राज्य सरकारने बदलावी लागतील. अन्यथा ही समृद्धी समाजाच्या फक्त एका वर्गापुरती मर्यादित राहील."

आमदार रईस शेख यांच्या या मागणीला सामान्य प्रवासी वर्गातूनही पाठिंबा मिळू शकतो. आता हे पाहणं महत्त्वाचं ठरेल की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि रस्ते विकास महामंडळाचे प्रमुख एकनाथ शिंदे एसटीच्या मार्गातले अडथळे दूर करतील का? सामान्य माणूस जर 'समृद्धी'वरूनच दूर राहिला, तर ही रचना कशासाठी, असा सवाल आता जोर धरू लागला आहे.

## श्री शिवराज्याभिषेक सोहळा दिनास राष्ट्रीय सणाचा दर्जा द्या: संभाजीराजे छत्रपती

रायगड, दि. ६ प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज यांनी साडेतीनशे वर्षांपूर्वी तत्कालीन राजवटीमध्ये असलेल्या परकीय लोकांना पातशाहींना येथून घालवले. त्यानंतर सार्वभौम साम्राज्याची निर्मिती करून स्वतःचा शिवराज्याभिषेक करून घेतला. हा दिवस आज सर्वांसाठी पवित्र आहे. आपला देश १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र झाला असला तरी शिवराज्याभिषेक दिनाचे महत्त्व ओळखून शासनाने हा दिन राष्ट्रीय सण म्हणून घोषित करावा, अशी मागणी रायगड प्राधिकरणचे अध्यक्ष व माजी खासदार संभाजीराजे छत्रपती यांनी आज केली. किल्ले रायगडावर शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त आयोजित लाखो शिवभक्तांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

प्रतिवर्षाप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा किल्ले रायगडावर तारखेनुसार आज (दि. ६) अखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समिती दुर्गराज रायगड मार्फत आयोजित करण्यात आला होता. गुरूवारपासून (दि. ५) किल्ले रायगडावर विविध सांस्कृतिक शाहिरी तसेच मैदानी खेळाचे प्रात्यक्षिकांचे कार्यक्रम झाले. आज सकाळी सात वाजल्यापासून किल्ले रायगडावर सुरू झालेल्या कार्यक्रमांचा समारोप छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीवर सुवर्णभिषेक करून संभाजी राजे छत्रपती व युवराज शहाजीराजे यांच्या मार्फत करण्यात आला. याप्रसंगी राजदरबारात रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे, पोलीस अधीक्षक आंचल दलाल, पोलीस आयुक्त दराडे, माजी आमदार अनिकेत तटकरे आदीसह पश्चिम महाराष्ट्रातील विविध संस्थांचे प्रमुख पदाधिकारी, शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## ट्रम्प यांच्याशी वाद आणि १५२ अब्ज डॉलर्स पाण्यात

वॉशिंग्टन, दि. ६ वृत्तसंस्था

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनामधून उद्योगपती इलॉन मस्क बाहेर पडल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प आणि इलॉन मस्क यांच्यामध्ये वाद सुरू झाल्याचं पाहायला मिळत आहे. मागील काही दिवसांपासून ट्रम्प आणि मस्क हे एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करत आहेत, त्यामुळे दोघांमधील मतभेद समोर आले असून अमेरिकेच्या राजकीय वर्तुळात याची चर्चा रंगली आहे. यातच आता इलॉन मस्क यांना डोनाल्ड ट्रम्प यांच्या विरोधात बोलणं चांगलंच महागात पडलं आहे.



टेस्लाच्या शेअर्समध्ये मोठी घसरण झाली असून इलॉन मस्क यांचं १५२ अब्ज डॉलर्सचं नुकसान झाल्याचं वृत्त समोर आलं आहे. टेस्लाचे शेअर्स गुरुवारी तब्बल १४ टक्के घसरले असून बाजारमूल्यात १२.६ लाख कोटी रुपयांचं नुकसान झालं आहे. त्यामुळे इलॉन मस्क यांना डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी आधी मैत्री आणि त्यानंतर त्यांच्या विरोधात बोलणं महागात पडलं आहे. तसेच मस्क यांना ट्रम्प यांच्या वादाचा परिणाम मस्क यांच्या टेस्ला कंपनीवर होत असल्याचं दिसून येत आहे.

टेस्लाच्या शेअर्समध्ये गुरुवारी १४ टक्के घसरण झाल्याने त्याचं बाजारमूल्य १५२ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त नुकसान मानलं जात आहे. तसेच गेल्या पाच ट्रेडिंग सत्रांपैकी चार सत्रांमध्ये या शेअरमध्ये घसरण झाली आहे. दरम्यान, टेस्लाच्या शेअर्समध्ये मे महिन्यात २२ वाढ झाली होती. मात्र, मस्क आणि ट्रम्प यांच्यातील वादानंतर या आठवड्यात टेस्लाच्या शेअर्समध्ये जवळपास १८ टक्क्यांची घट झाली. तसेच या वर्षी आतापर्यंत टेस्लाचे शेअर्स जवळपास ३० टक्के घसरले आहेत.

डोनाल्ड ट्रम्प यांच्याबाबत बोलताना इलॉन मस्क यांनी एक मोठं विधान केलं आहे. इलॉन मस्क यांनी म्हटलं की, "माझ्याशिवाय ट्रम्प निवडणूक हरले असते. डेमोक्रॅट्सना प्रतिनिधी सभेत बहुमत मिळालं असतं. रिपब्लिकन पक्षाला सिनेटमध्ये फक्त ५१ किंवा ४९ मतांनी आघाडी मिळाली असती", असं मस्क यांनी म्हटलं होतं.

## गडचिरोलीत माझ्या एवढा फिरलेला दुसरा मुख्यमंत्री कोणीच नाही - फडणवीस

गडचिरोली, दि. ६ प्रतिनिधी

महाराष्ट्रातील नक्षल प्रभावी जिल्हा म्हणून ओळख असलेल्या गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्रीपद मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वीकारले आहे. गडचिरोलीत माझ्या एवढा फिरलेला मुख्यमंत्री दुसरा कोणीच नाही, असे म्हणत मुख्यमंत्री फडणवीस यांनी गडचिरोली जिल्ह्यातील नक्षलवादी भागात आपण स्वत: शेवटच्या टोकापर्यंत दौरे केल्याचं एबीपी माझाशी बोलताना म्हटले. तसेच, लवकरच गडचिरोलीमधून माओवाद संपुष्टात आणू असा दावाही त्यांनी केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत आज गडचिरोलीत १३ आत्मसमर्पित नक्षलवादी युवक-युवतींचा सामूदायिक विवाहसोहळा संपन्न होत आहे. स्वत: देवेंद्र फडणवीस हे नवजोडप्यांना आशीर्वाद देण्यासाठी लग्नसोहळ्याला उपस्थित राहत आहेत. तत्पूर्वी त्यांनी गडचिरोली जिल्ह्याच्या शेवटच्या टोकावर जाऊन पाहाणी केली.

आपण महाराष्ट्राच्या पहिल्या पॉईंटवर आलो आहोत, अगदी आपल्या नजरेत दिसेल एवढ्याजवळ छत्तीसगड आहे. कवंडेच्या पोलीस आऊटपोस्टमुळे या भागातील सिक्युरिटीचा खूप मोठा बॅकलॉग भरून निघाला आहे. हा भाग आजवर सर्व प्रकाराने अनकनेक्टेड होता. मात्र, आता पोलीस इथं आल्यानंतर शासनाच्या सर्व योजना, त्यांचे लाभ लोकांना मिळतील. शासनावरील लोकांचा विश्वास वाढेल आणि संपूर्ण भाग पोलिसांच्या आणि शासनाच्या डॉमिनन्स खाली आला आहे. आता माओवाद्यांना इथे कुठलेही ऑपरेशन्स राबवता येणार नाही, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

माझ्या एवढं गडचिरोलीत फिरणारा दुसरा मुख्यमंत्री महाराष्ट्रात कोणीही नाही, या ठिकाणी विपरीत परिस्थितीत आपले सिक्युरिटी फॉर्सेस चांगलं काम करत आहेत. या सुरक्षा यंत्रणांचा मनोबल वाढवे म्हणून मी अशा आऊटपोस्टवर दुर्गम भागात जात असतो. लवकरच गडचिरोलीमधून माओवाद पूर्णपणे संपुष्टात आणू असा विश्वासही त्यांनी यावेळी बोलून दाखवला. आजवर गडचिरोलीचा विकास आणि विकासाची क्षमता नेत्यांच्या भाषणामध्ये असायची. मात्र, २०१४ नंतर आम्ही प्रत्यक्ष आणि गडचिरोलीत बदल घडवून आणले. मात्र, गडचिरोलीत औद्योगिक विकास करत असताना इथले जल, जंगल आणि जमीन वाचवून आपल्याला विकास करायचा आहे. गडचिरोलीचा नैसर्गिक स्वभाव आपण बदलणार नाही, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी स्पष्ट केले.

इतर आवृत्त्या : पालघर- ठाणे, नाशिक, नागपूर, अकोला, अमरावती, खामगाव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया आणि चंद्रपूर महासागर

# इगतपुरी पंचायत समिती कार्यालयावर धडक बिऱ्हाड मोर्चा

## टाकेद येथील आदिम कातकरी वस्तीची अद्यापही बीडीओकडून दखल नाही

**इगतपुरी ।** इगतपुरी तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत सर्वतीर्थ टाकेद येथील आदिम कातकरी वस्तीतील जवळपास ४८ कुटुंबियांचे प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरकुल गेल्या दोन वर्षांपासून मंजूर आहे. परंतु स्थानिक ग्रामपंचायत व इगतपुरी पंचायत समिती प्रशासनाने जागेच्या अटीमुळे या सर्व लाभार्थ्यांच्या खात्यावर घरकुल अनुदान वर्ग न करता सर्वांना आजपर्यंत लाभापासून वंचित ठेवले आहे. जर ६ जून पर्यंत घरकुलांचा प्रश्न सोडवला नाही आणि या सर्व मंजूर असलेल्या घरकुल लाभार्थ्यांच्या खात्यावर प्रधानमंत्री घरकुल न्यास अभियान अंतर्गत पैसे जमा केले नाही तर येत्या ७ जूनला सर्व ४८ आदिम कातकरी कुटुंबियांसह बिऱ्हाड मोर्चासह कार्यालयात ठिय्या आंदोलन करू असे या संदर्भात सामाजिक कार्यकर्ते राम शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सर्व ग्रामस्थांच्या वतीने इगतपुरी पंचायत समिती गट विकास अधिकारी एम. एस. वळवी यांना मंगळवार ता.१३ मे रोजी दरम्यान निवेदनाद्वारे अल्टीमेटम देण्यात आला होता. यानंतर या निवेदनाला वळवी यांनी पत्रव्यवहार चालू आहे, सात तारखेचा बिऱ्हाड मोर्चा थांबून प्रशासनास सहकार्य करावे, असे ग्रामस्थांची दिशाभूल करणारे पत्र १९ मे रोजी दिले आहे. या पत्राचे उत्तर ग्रामस्थांना मान्य नसून इगतपुरी पंचायत समिती कार्यालयावर सर्व कुटुंबीय बिऱ्हाड मोर्चा धडकणार असल्याचे स्मरणपत्र नुकतेच देण्यात आले आहे. इगतपुरी तालुक्यातील ग्रामपंचायत



> आम्ही राहतो त्याच जागेवर आमची घरे बांधू. शासनाने आमच्या घरकुलांसह जागेचा विषय तात्काळ सोडवावा. आजपर्यंत आमच्या वस्तीची कुणीही प्रत्यक्षात पाहणी केली नाही. बीडीओ अजून पण आमच्या वस्तीत आले नाही. केवळ आश्वासन देवून आमची दिशाभूल करणारे पत्र देऊन आम्हाला न्याय मिळणार नाही. आता सात जूनला बिऱ्हाड मोर्चा घेऊन पंचायत समिती कार्यालयात ठिय्या आंदोलन करू. जोपर्यंत आम्हाला घरकुलांचा पहिला हफ्ता वितरित होत नाही व जागेचा विषय मार्गी लागत नाही, तोपर्यंत बिऱ्हाड मोर्चा माघार घेणार नाही.
>
> **- निवृत्ती हिलम, ग्रामस्थ, आदिम कातकरी वस्ती**

> टाकेद येथील आदिम कातकरी वस्तीतील घरकुल प्रश्नांसाठी अनेकदा संबंधित प्रशासनाला निवेदन पत्रव्यवहार देऊनही आजपर्यंत कुणीच दखल घेतली नाही. गट विकास अधिकारी यांच्याकडून टाकेद येथील कातकरी वस्तीची कोणतीही स्थानिक चौकशी प्रत्यक्ष पाहणी न झाल्याने इगतपुरी पंचायत समिती कार्यालयावर धडक बिऱ्हाड मोर्चा येणार व जोपर्यंत न्याय मिळत नाही तोपर्यंत आंदोलन चालू राहणार. यानंतरच्या होणाऱ्या परिणामास संबंधित प्रशासन जबाबदार असणार.
>
> **- राम शिंदे, सामाजिक कार्यकर्ते टाकेद**

> सात तारखेला इगतपुरी पंचायत समितीवर आमचा सर्व कुटुंबीय बिऱ्हाड मोर्चा येणार म्हणजे येणारच. जोपर्यंत आम्हाला घरकुलांचा पहिला हफ्ता आमच्या बँक खात्यावर जमा होत नाही, तोपर्यंत आम्ही बिऱ्हाड आंदोलन मागे घेणार नाही. त्यानंतरच्या सर्व परिणामास पंचायत समिती प्रशासन जबाबदार असेल.
>
> **- गोदाबाई भोईर, कातकरी वस्ती ग्रामस्थ**



टाकेद बु येथील कातकरी वस्ती ही ग्रामपंचायत गावठाण जागेत प्राथमिक आरोग्य उपकेंद्र परिसरात होती.

सन २००४-०५ साली तत्कालीन ग्रामपंचायत सरपंच उपसरपंच व प्रशासनाने या आदिम कातकरी ग्रामस्थांना इंदिरा घरकुल आवास योजनेचा लाभ देणे कामी येथून स्थलांतरित करून त्यांना गट नंबर १५४ सरकार ,मोफत पडित म्हसनवटा व्यवस्थापन ग्रामपंचायतकडे या सरकारी गटामध्ये स्थलांतरित केले व तत्कालीन इंदिरा आवास योजनेच्या घरकुलांचा लाभ दिला व पूर्वापार ज्या जागेवर आदिम कातकरी समाज बांधव राहत होते, त्या गावठाण जागेवरून आदिम कातकरी बांधवांना स्थलांतरित करून ती जागा गावातील इतरत्र बड्या श्रीमंतांना द्रव्याच्या हव्यासपोटी देण्यात आली. आज त्या जागेवर मोठी बिल्डिंग उभी आहे.

# ओझर येथे महावितरणतर्फे विद्युत सुरक्षा अभियान



**विद्युत सुरक्षा अभियानांतर्गत ग्राहकांना मार्गदर्शन करताना उपकार्यकारी अभियंता संदीप शिंदे व महावितरणचे अधिकारी कर्मचारी.**

**पिंपळगाव बसवंत ।** येथील महावितरण कडून ओझर उपविभागात विविध ठिकाणी विद्युत सुरक्षा सप्ताह अभियान घेण्यात आले. सदर अभियानाचे सारथ्य उपकार्यकारी अभियंता संदीप शिंदे यांनी केले.

महावितरण कडून प्रकाशित महाराष्ट्र -सुरक्षित महाराष्ट्र अंतर्गत विद्युत सुरक्षा अभियान राबविण्यात येत आहे. सदर अभियानात विविध ठिकाणी अधिकारी व कर्मचारी हे विजेच्या अपघातापासून कोणकोणती काळजी घ्यावी याचे मार्गदर्शन गावोगावी ग्राहकांना तथा शेतकऱ्यांना देत आहे. यात प्रामुख्याने वीज वाहिनी खाली गोठा तथा शेड धोक्याचे ठरू शकते, वीज वाहिन्यांजवळ पतंग तथा क्रिकेट सारखे खेळ खेळू नये, वीज वाहिनी खाली ज्वलनशील वस्तूंचा साठा करू नये, धातूंची शिडी, गज तथा तथा सळईची वाहतूक करताना वाहिनीला स्पर्श होणार नाही याची दक्षता घेणे आदी सुरक्षा बाबींची जनजागृती करण्यात येत आहे.

सदर अभियानात घरगुती विद्युत सुरक्षा, परिसर विद्युत सुरक्षा तथा कर्मचारी विद्युत सुरक्षा बाबतीत महावितरणकडून जनजागृती करण्यात येत आहे.

सदर अभियान ओझर, ओझर ग्रामीण, जानोरी, चांदोरी, सायखेडा, म्हाळसाकोरे, आदी ठिकाणी राबवण्यात आले. सदर उपक्रमात उपकार्यकारी अभियंता- संदिप शिंदे, सहाय्यक अभियंता मोहन मुंडे, सुवर्णा मोरे, जितेंद्र वडनेरे, समाधान घुगे, योगेश देशपांडे, संदिप गडाख, ललिता बिरूड, आशा निरगुडे, ज्योती नवाळे अश्विनी शेवाळे, नितीन लोकनार, राहुल पगारे वायरमन अरुण खैरनार, संजय भामरे, तुषार तुंगार, पंढरी जामकर, राजेंद्र शिंदे, कृष्णा मंडलिक, समाधान गुळवे, सचिन खालकर, गोपाल भोर, सचिन जाधव, आतिश दळवी, योगेश शिरसाठ, सुभाष बुवा, रमेश खंदारे, नितीन थेटे, ललित सोनवणे, काशिनाथ गायकवाड, अमोल खाडे, शैलेश मोकळ, प्रशांत सोनवणे, शोभा महाजन, सोनाली भोये, ललिता चव्हाण, कमल वाघमारे, शोभा महाजन आदींनी ठिकठिकाणी जाऊन नागरिकांमध्ये जनजागृती केली. सदर अभियान शुक्रवार सहा जून रोजी संपन्न होईल.

# केन्द्रीय संस्कृत विद्यापीठातर्फे नाशिकमध्ये तीन दिवसीय 'उत्कर्ष महोत्सव २०२५'चे आयोजन



**नाशिक ।** केन्द्रीय संस्कृत विद्यापीठ, नवी दिल्ली, श्री लाल बहादूर शास्त्री राष्ट्रीय संस्कृत विद्यापीठ, नवी दिल्ली आणि राष्ट्रीय संस्कृत विद्यापीठ, तिरुपती यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी "उत्कर्ष महोत्सव" आयोजित केला जातो. यावर्षी हा महोत्सव ८, ९ आणि १० जून २०२५ रोजी नाशिकमध्ये आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती कुलगुरू श्रीनिवास वरखेडी यांनी पत्रकार परिषदेत दिली. व्यासपीठावर 'सकाळ'चे माजी संपादक विश्वास देवकर, लक्ष्मण सावजी उपस्थित होते.

केन्द्रीय संस्कृत विद्यापीठ (पूर्वीचे राष्ट्रीय संस्कृत संस्थान), जे २०२० मध्ये संसदेच्याअधिनियमद्वारे स्थापन झाले आहे. संस्कृत भाषेच्या प्रचार-प्रसारासाठी कार्य करणारीभारतसरकारचीसर्वात मोठीसंस्था आहे. याच्या माध्यमातून भारतभर १२ कॅम्पस, शेकडो महाविद्यालये आणि हजारो गुरुकुल पाठशाळा कार्यरत आहेत. संस्कृत या प्राचीन भाषेतील ज्ञान व विज्ञान स्वरूपाच्या आत्मतत्त्वाचा प्रचार केवळ भारतातच नव्हे तर जागतिक स्तरावरही करणे हा या उत्सवामागील मुख्य उद्देश असल्याचे कुलगुरूंनी सांगितले. या भाषेच्या विकासयात्रेचे प्रमुख विचारवंत आणि प्रेरणास्थान असलेल्या केन्द्रीय संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.श्रीनिवास वरखेडीयांचे असे मत आहे की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात कोविड-१९ काळात भारताने आयुर्वेद, चिकित्सा व योगविज्ञान क्षेत्रात जो आत्मविश्वास दाखवला, त्यावरून भारत विकसित राष्ट्रांवर अवलंबून नाही, हे सिद्ध झाले आहे. आत्मनिर्भर भारताच्या दिशेने २०४७ पर्यंत भारत हा विकसित देश होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. कुलगुरू प्रा. वरखेडी यांच्या नेतृत्वाखाली विद्यापीठालाराष्ट्रीय मूल्यांकन आणि प्रत्यायन परिषद (NAAC) कडून A++ उच्च श्रेणीचे मानांकन मिळाले आहे. त्यांचा संकल्प आहे कीनाशिक परिसरात आयुर्वेद शिक्षणासाठी प्राथमिक ते उच्चस्तरापर्यंत गुरुकुलाची स्थापनाकेली जाईल. यासोबतच शास्त्र विषयांसोबतविविध व्यावसायिक प्रशिक्षण, पीजी डिप्लोमा कोर्सेस, नवीन अभ्यासक्रम व बी.ए. सिव्हिल सर्व्हिसेससाठी संस्कृत माध्यमातून मार्गदर्शन दिले जाईल. विद्यापीठाचे नाशिक कॅम्पस राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०च्या प्रभावी अंमलबजावणीच्या बाबतीत संपूर्ण भारतासाठी आदर्श ठरेल. केन्द्रीय संस्कृत विद्यापीठाने विविध विद्यापीठांशी मल्टी- डिसिप्लिनरी कोर्सेससाठी समन्वयसाधला आहे आणि याशिवाय अनेक अभ्यासक्रमही सुरू आहेत. याबाबत अधिक माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तीन दिवसीय महोत्सवास तीन केंद्रीय संस्कृत विद्यापीठांच्या कुलगुरूंसहदेशभरातील विविध राज्यांतील १८ संस्कृत विद्यापीठांचे कुलगुरू उपस्थित राहणार आहेत. ८जूनला यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे सकाळी १० वाजता "आगामी १० वर्षांची संस्कृत संवर्धन योजना" यावर देशभरातील संस्कृत विद्यापीठांचे कुलगुरू व प्रतिनिधी चिंतन करतील. त्याचे उद्घाटन प्रा. पंकज चांदे, माजी कुलगुरू, कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ करतील. विशेष अतिथी म्हणून प्रा. संजीव सोनवणे, कुलगुरू, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ असतील. ९ जूनला गुरुदक्षिणा सभागृह, कॉलेज रोड, नाशिक येथे डॉ. समीर सोमैया, कुलाधिपती, सोमैया विद्याविहार विद्यापीठ, मुंबई व पद्मश्री प्रा. अभिराज राजेंद्र मिश्रा, कुलगुरू, सम्पूर्णानंद विद्यापीठ हे उपस्थित राहतील. १० जूनला त्याच ठीकाणीप्रा. मुरलीमनोहर पाठक, कुलगुरू, श्री लाल बहादूर शास्त्री विद्यापीठ, प्रा. जी.एस.आर. कृष्णमूर्ती , कुलगुरू संस्कृत विद्यापीठ, तिरुपती उपस्थित राहतील.

# पेठला डीवायएफआयचे विविध मागण्यासाठी तहसील कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन

**पेठ ।** तालुका डीवाय एफआय, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, भाकपा, जनहितवादी महीला संघटनेच्या वतिने जनतेच्या विविध अडीअडचणी व मागण्यांबाबत येथील तहसिल कार्यालया समोर ठिय्या आंदोलन छेडण्यात आले. या आदोंलनात प्रामुख्याने जनतेला भेडसावणा-या विविध प्रश्नांवर चर्चा करून त्यांची सोडवणूक करण्यात यावी या करिता सबंधित विभागांच्या विभाग प्रमुखांशी चर्चा झाली.तालुक्यातील सुरू असलेल्या रस्ते , जलजीवन मिशन योजनेतील कामांची झालेली वाताहत संजय गांधी निराधार योजनेतील लाभार्थ्यांना वेळेवर न मिळणारा लाभ,





वनदावे कामात होत असणारी दिरंगाई, पेठ नगरपंचायतीतील अनागोंदी कारभार आदी विभागातील कामांच्या अनियमिते बाबत ठिय्या आंदोलन छेडण्यात आले. आदोंलना दरम्यान पाऊस सुरू झाल्याने काही काळ आदोंलन कर्त्यांची तारांबळ उडाली नंतर तहसिल कार्यालयातील आवारातील डोम मध्ये ठिय्या दिला.

चर्चा दरम्यान येत्या सात दिवसांत मागण्याची पूर्तता केली जाईल असे आश्वासन प्रशासनाच्या वतिने देवुन दि.१३ जुन रोजी पुन्हा आढावा बैठक घेण्यात यईल त्यानंतर ठिय्या आंदोलन मागे घेण्यात आले.

यावेळी डीवाय एफआयचे तालुका अध्यक्ष कमलाकर बोसारे, जनहितवादी महिला संघटनेच्या अफरोजा शेख, छबिलदास आवारी, तुकाराम मोंढे, मुरलीधर भोये, शाम भोये, पुष्पराज गावीत, राजु शेख, छबु भुरकुड, नारायण दरोडे, मुरलीधर निंबेकर, मुरलीधर जाधव, देवा गवळी, हरिभाऊ, सातपुते , चंदर जाधव, रामदास जाधव, देविदास गायकवाड, आदीसह पदाधिकार व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चारोस्करांची गटविकास अधिकाऱ्यांच्या कार्यालयात धडक

## जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांच्या पत्रावर आक्षेप

**दिंडोरी ।** गाव पातळीवर ग्रामपंचायत हददीतील घरांना क्रमांक देणे आवश्यक असल्याच्या कारणावरून एका एजन्सीला तालुक्यातील प्रत्येक गावात पाठवून नागरीकांकडून त्या बदल्यात ५० रूपये वसुली करण्यासाठी जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या पत्राच्या संदर्भावरुन दिंडोरी गटविकास अधिकाऱ्यांनीच पत्र काढल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. यावरून माजी आमदार रामदास चारोस्कर यांनी आपल्या सहकाऱ्यांसमवेत गटविकास अधिकारी कार्यालयात धडक देत पत्रात दिलेल्या आशयाचे जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांचा नेमका संबंध काय? असा थेट प्रश्न उपस्थित करत असे मोगम आदेश दिंडोरी तालुक्यात चालणार नाही ते पत्र रद्द करा असे खडेबोल दिंडोरी गटविकास अधिकारी भास्कर रेंगडे यांना सुनावले त्यावर संबंधित पत्र तात्काळ मागे घेण्याचे आश्वासन गटविकास अधिकाऱ्यांनी दिले आहे.

गटविकास अधिकाऱ्यांनी पत्र काढताना त्यात ग्रामपंचायत क्षेत्रातील घरांची संख्या जनगणना करणे, कर आकारणी करणे, बी.पी.एल. मतदार यादी बनविणे, शिधा पत्रिका तयार करणे इत्यादी कामसाठी गाव पातळीवर ग्रामपंचायत हददीतील घरांना क्रमांक देणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे परंतु या आशयाचा जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांचा नेमका संबंध काय? असा सवाल यावेळी उपस्थित करण्यात आला. ही सक्ती कशासाठी? ठराविक व्यक्तींच्या एजन्सी कडूनच



आम्ही का घ्यावे? असा सवाल उपस्थित होत असून गटविकास अधिकाऱ्यांनी फक्त सूचना कराव्यात आणि आवश्यक असल्यास गाव स्तरावर कमी खर्चामध्ये जर कोणी काम करून देत असेल तर त्यांच्याकडून आम्ही त्यांच्याकडून बनवून घेऊ. विनाकारण आपल्या हितसंबंधातून नागरिकांच्या माथी एखादी एजन्सी लावून त्यांच्याकडून आर्थिक वसुली करण्याचा प्रयत्न प्रशासनाने करू नये असेही खडसावून सांगितले. यावेळी गटविकास अधिकाऱ्यांनी सदर पत्र मागे घेत त्यासंदर्भात ग्रामसेवकांना सूचना देण्याचे मान्य केले. यावेळी माजी आमदार रामदास चारोस्कर, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे दिंडोरी लोकसभा समन्वयक योगेश बर्डे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष शामराव हिरे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे तालुकाध्यक्ष पांडुरंग गणोरे, माजी उपसभापती वसंत थेटे, राकेश शिंदे, माकपचे तालुकाध्यक्ष रमेश चौधरी, डी. वाय. एफ. वाय. तालुकाध्यक्ष अप्पासाहेब वटाणे आदी उपस्थित होते.

## ➤ महत्त्वाचे

### विधानभवनात विमुक्त जाती, भटक्या जमाती कल्याण समितीची बैठक

**नांदगाव ।** आ. सुहास कांदे यांची विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीवर निवड झाल्यानंतर बुधवारी विधानभवनात राज्याच्या विमुक्त जाती व



भटक्या जमाती कल्याण समितीची प्रारंभिक बैठक पार पडली. सदर बैठकीस राज्याच्या विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीच्या सर्व सदस्य आमदारांनी हजेरी लावली. यावेळी विविध विषयावर चर्चा करण्यात आली. एकूण अकरा टक्के लोकसंख्या असलेल्या विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी राज्याच्या अर्थसंकल्पात पुरेशी तरतूद उपलब्ध होत नाही, यासाठी निधी वाढविण्याकामी राज्याच्या मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांची लवकरच भेट घेऊन निधी मिळविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची समितीचे अध्यक्ष आ. कांदे यांनी सांगितले.

# बालरोग तज्ज्ञांच्या नाशिकॉन परिषदेचे ७ व ८ जूनला नाशिकमध्ये आयोजन

## राज्यस्तरीय परिषदेत ५०० बालरोग तज्ज्ञ होणार सहभागी

**नाशिक ।** येत्या ७ व ८ जून रोजी हॉटेल ट्रिट येथे 'नाशिकॉन २०२५ - द कॉन्फरन्स विथ द डिफरन्स' ही बालरोग तज्ज्ञांची राज्यस्तरीय परिषद आयोजित केली आहे. गेल्या दहा वर्षांपासून या परिषदेचे नाशिकमध्ये आयोजन केले जाते आहे. नाशिक बालरोग तज्ज्ञ संघटनेच्या पुढाकाराने होत असलेल्या या परिषदेच्या यशस्वीतेसाठी परिषदेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.मिलिंद भराडिया, आयोजन समिती अध्यक्षा डॉ. वैशाली भराडिया, नाशिक शाखेचे अध्यक्ष डॉ. सागर भालेराव यांच्यासह संपूर्ण टीम परिश्रम घेत आहे. या परिषदेत राज्यभरातून ५०० पेक्षा जास्त बालरोग तज्ज्ञ सहभागी होणार आहेत.

नाशिक शाखेचे अध्यक्ष डॉ. सागर भालेराव म्हणाले, परिषद भरविण्यासाठी नाशिकमधील सर्व बालरोग तज्ज्ञांनी नोंदणी



केली आहे. यानिमित्त बालरोग तज्ज्ञ एकत्र आल्याने संघटना मजबूत होण्यासाठी मदत होणार आहे. आयोजन समिती अध्यक्षा डॉ. वैशाली भराडिया म्हणाल्या, मुंबई येथील प्रसिद्ध बालरोग तज्ज्ञ डॉ.उमा अली यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. लहान मुलांमध्ये उद्भवणारे आजार व त्यावरील आधुनिक उपचार पद्धती, गुंतागुंतच्या शस्त्रक्रिया, लसीकरण, नवजात अर्भकांची काळजी कशी घ्यावी यासह इतर बाबींवर तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत.

संस्थापक अध्यक्ष डॉ.मिलिंद भराडिया म्हणाले, गेल्या १० वर्षांपासून या परिषदेनिमित्त नाशिक शहराचे नाव भारतभर पोहचते आहे. आत्तापर्यंत ५ ते ६ हजार बालरोग तज्ज्ञांनी या परिषदेनिमित्त नाशिकला भेट दिली आहे. परिषदेचे आयोजन करताना सामाजिक उपक्रम राबविण्याचाही संघटनेचा मानस असतो. यापूर्वी आदिवासी पाड्यावर मदतकार्य पोहचविले असून, यावर्षीही सामाजिक उपक्रम राबविण्याचा मानस आहे.

या परिषदेत डॉ.गौतम कोपिकर सहभागी होणार असून, डॉ. दीपक पारीख हे लहान मुलांच्या त्वचारोगांबाबत महत्वपूर्ण माहिती देणार आहेत. डॉ.नितीन सुराणा म्हणाले, परिषदेमध्ये वेगवेगळ्या विषयावर राष्ट्रीय स्तरावरील तज्ज्ञ मान्यवर मार्गदर्शन करणार आहे. यामध्ये प्रामुख्याने लहान मुलांचे लसीकरण, ॲनेमिया व इतर वाढत चाललेले आजार याबाबत मार्गदर्शन असणार आहे. तसेच डॉक्टरांच्या कलागुणांचा आविष्कार लव यु जिंदगी या कार्यक्रमातून बघावंयास मिळणार आहे.

परिषदेत सायंटिक कमिटीमध्ये डॉ. अमोल मुरकुटे व टीमने सत्रांच्या आयोजनासाठी अथक परिश्रम घेतले आहेत. परिषदेच्या यशस्वीतेसाठी सचिव डॉ.कविश मेहता, डॉ.प्राची बिरारी, डॉ.अतुल बोंडे, डॉ. कदम, डॉ. पगार, डॉ. नितीन मेहकरकर, डॉ. तुषार गोडबोले, डॉ. प्रवीण गडसिंग, डॉ. प्रकल्प पाटील, डॉ. अरुण गचाले, डॉ. राहुल पाटील, डॉ. स्वाती भूतडा, डॉ. शलाका बागुल, डॉ. तृप्ती महात्मे, डॉ. दिपश्री ततार, डॉ. सुशील पारख परिश्रम घेत आहेत.

# बॉलिवूडचे दिग्गज अभिनेते जितेंद्र यांची अंधेरी येथील जमीन विकून 855 कोटींची कमाई

मुंबई, दि. ६ प्रतिनिधी

बॉलिवूडचे दिग्गज अभिनेते जितेंद्र यांनी आजवर अनेक अजरामर सिनेमे केले. पण, आता वयाच्या ८३ व्या वर्षी एकाच रात्रीत जितेंद्र यांचं नशीब पालटलं आहे. वयाच्या ८३ व्या वर्षी एकता कपूर आणि तुषार कपूर यांचे वडील आणि दिग्गज अभिनेत्यानं ८५५ कोटी रुपयांची कमाई केली आहे.

जितेंद्र आणि त्यांच्या कुटुंबानं मुंबईतील अंधेरी येथील एक जमीन ८५५ कोटी रुपयांना विकली आहे. ही जमीन जपानी कंपनी एनटीटी ग्लोबल डेटा सेंटर्सला विकण्यात आली. जितेंद्र यांच्या कुटुंबाच्या दोन कंपन्या, पॅन्थियन बिल्डकॉन प्रायव्हेट लिमिटेड आणि तुषार इन्फ्रा डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्या माध्यमातून हा करार करण्यात आला. हा करार २९ मे २०२५ रोजी रजिस्टर झाला होता आणि त्यात ९,६६४.६८ चौरस मीटर (सुमारे २.३९ एकर) च्या दोन लगतच्या जमिनींचा समावेश आहे. या जमिनीवर सध्या बालाजी आयटी पार्क आहे, ज्यामध्ये तीन इमारती आहेत आणि एकूण बिल्ट-अप क्षेत्रफळ सुमारे ४.९ लाख चौरस फूट आहे.



पूर्वी नेटमॅजिक आयटी सर्व्हिसेस म्हणून ओळखल्या जाणाऱ्या एनटीटी ग्लोबल डेटा सेंटर्सनं ही जमीन खरेदी केली आहे. कंपनी क्लाउड सोल्यूशन्स, होस्टिंग, डेटा व्यवस्थापन, सायबर सुरक्षा आणि ॲप्लिकेशन डेव्हलपमेंट यासारख्या तांत्रिक सेवा पुरवते. या करारावर ८.६९ कोटी रुपये स्टॅम्प ड्युटी आणि ३०,००० रुपये रजिस्ट्रेशन फी आकारण्यात आली आहे.

प्रमुख व्यवसाय आणि मनोरंजन क्षेत्रांमध्ये वसलेलं अंधेरी आता एक प्रमुख कमर्शियल आणि निवासी केंद्र बनलं आहे. अलिकडेच, बॉलिवूड अभिनेता जयदीप अहलावत आणि त्यांची पत्नी ज्योती हुडा यांनी अंधेरी पश्चिम येथे १० कोटी रुपयांना एक अपार्टमेंट खरेदी केलं, ज्याचा कार्पेट एरिया १,९५० चौरस फूट आणि बिल्ट-अप एरिया २,३४१ चौरस फूट आहे.

याव्यतिरिक्त एप्रिलमध्ये बॉलिवूड गायिका अलका याज्ञनिक आणि त्यांची मुलगी सायशा कपूरनंही अंधेरी वेस्टमधील ओबेरॉय स्काय हाईट्समध्ये ११.५ कोटी रुपयांचं एक लग्झरी अपार्टमेंट खरेदी केलेलं. या अपार्टमेंटचं एरिया २,२९७ चौरस फूट आहे. त्यापूर्वी बॉलिवूड संगीतकार आणि गायक अनु मलिक आणि त्यांची पत्नी अंजू मलिकनं सांताक्रूझ वेस्टमध्ये १४.४९ कोटी रुपयांमध्ये दोन अपार्टमेंट विकले होते. गेल्या वर्षी अमिताभ बच्चन यांनी अंधेरी वेस्टमध्ये ८,४२९ चौरस फूटांच्या तीन कमर्शियल प्रॉपर्टी ६० कोटी रुपयांमध्ये खरेदी केल्या होत्या.

# चेंबूर प्रकल्पातील डिफॉल्टर फ्लॅट खरेदीदारांना दिलासा नाही: महारेरा

मुंबई, दि. ६ प्रतिनिधी

देयके चुकवलेल्या (डिफॉल्टर) सहा फ्लॅट खरेदीदारांना रिअल इस्टेट (नियमन आणि विकास) कायद्यांतर्गत त्यांनी मागितलेल्या सवलतीचा अधिकार नाही, असे महारेराने स्पष्ट केले आहे.

सहा फ्लॅट खरेदीदारांपैकी पाच जणांनी चेंबूरमधील निवासी प्रकल्पातून माघार घेण्याच्या इच्छेनुसार त्यांनी भरलेल्या काही रकमेचा परतावा मागितला. अन्य एकाने पैसे भरण्यासाठी अधिक वेळ मागितला. मात्र, गोदरेज डेव्हलपर्सने बुकिंग रक्कम जप्त करण्याची मागणी करून त्यांचे बुकिंग रद्द केले.वाटपधारकांनी जप्तीला आव्हान दिले आणि प्रकल्पातून माघार घेण्याच्या इच्छेच्या कारणास्तव रेरा कायद्याच्या कलम १८ अंतर्गत परतावा मागितला. प्रकल्पातून माघार घेऊ इच्छित होता, असे तक्रार दाखल करणाऱ्या एका खरेदीदाराने महारेरासमोर सांगितले. कोरोना साथीच्या आजारामुळे तो प्रकल्पात मोठी रक्कम गुंतवू शकत नव्हता. त्यामुळे बिल्डरला रक्कम परत करण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी त्याने केली होती.

कोविड-१९ दरम्यान आर्थिक आणि वैयक्तिक नुकसान सहन करावे लागले, ज्याचे परिणाम ते आजही भोगत आहेत, असे अन्य तक्रारदारांचेही म्हणणे होते.

टर्मिनेशन लेटर दिले असल्याने ग्राहक माघार घेऊ इच्छितात, असा युक्तिवाद चार तक्रारदारांचे वकील पुलकित अग्रवाल यांनी केला. तक्रारदाराने दिलेली संपूर्ण रक्कम जप्त करण्यात आली आहे आणि तक्रारदारांना त्यांच्या युनिट्सशी संबंधित सर्व कागदपत्रे परत करण्याचे आदेश देण्यात आले आहेत, असे त्यांनी म्हटले.

विकासकाने रेरा कायद्याचे उल्लंघन किंवा पालन न केल्याचा दावा चुकीचा आहे. खरेदीदार वेळेवर पैसे देण्यात अपयशी ठरले होते, असा बचाव गोदरेजच्या वतीने वकील अभिजीत मांगडे यांनी केला. बांधकाम व्यावसायिकाने ज्या खरेदीदाराशी करार केला होता त्याला पाठवलेली टर्मिनेशन नोटीस महारेराने कायम ठेवली. परंतु कराराच्या अटींनुसार, खरेदीदाराला ६० दिवसांत पैसे परत करण्याचे निर्देश दिले.कायद्याच्या कलम १९(६) अंतर्गत, वाटप करणाऱ्या व्यक्तीला करारात नमूद केलेल्या पद्धतीने वेळेवर पैसे भरण्याचे बंधन आहे. प्राधिकरणाच्या कार्यांपैकी एक म्हणजे वाटप करणाऱ्यांवर टाकलेल्या जबाबदार्यांचे पालन करणे, असे महारेराने म्हटले आहे.

# पालिका निवडणुकीसाठी मुंबई काँग्रेस सक्रिय

मुंबई, दि. ६ प्रतिनिधी

मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्ष सक्रिय झाला असून, खासदार वर्षा गायकवाड यांनी गुरुवारी माजी नगरसेवकांसह पालिका आयुक्तांची भेट घेऊन नागरी समस्यांवर चर्चा केली.

प्रशासन ८२ टक्के नालेसफाईचा दावा करते. प्रत्यक्षात फक्त ३० ते ४० टक्केच नालेसफाई झाली. रस्ते कामेही अर्धवट आहेत. खोदून ठेवलेल्या रस्त्यांमुळे हाल होत आहेत. या कामांची चौकशी व्हावी, अशी मागणी वर्षा गायकवाड यांनी केली. तसेच रुग्णालयात औषधांचा तुटवडा, बेस्टची झालेली दयनीय अवस्था, सर्वसामान्यांवर मालमत्ता करवाढीचा बोजा याकडेही त्यांनी लक्ष वेधले.

गोवंडीतील नव्याने उभारलेल्या शताब्दी रुग्णालयाच्या खासगीकरण प्रस्तावास विरोध करण्यात आला आहे. या आधी बोरिवलीतील भगवती रुग्णालयाचा खासगीकरण प्रस्ताव रद्द करण्यात आलेला आहे. यापुढेही खासगीकरणाला विरोध केला जाणार असल्याचे खासदार गायकवाड यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

# भ्रष्टाचार चौकशी प्रस्ताव तीन महिन्यांत निकाली काढा

मुंबई, दि. ६ प्रतिनिधी

सरकारी अधिकारी आणि कर्मचार्यांविरोधात भ्रष्टाचाराचे खटले दाखल करण्याच्या परवानगीचे प्रस्ताव तीन महिन्यांत निकाली काढणे बंधनकारक करण्यात आले आहे. राज्य सरकारचा हा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात आहे. सरकारी अधिकारी, कर्मचार्यांच्या भ्रष्टाचाराच्या प्रकरणात खटला दाखल करण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून पाठविलेल्या प्रस्तावावर निर्णयच घेतले जात नसल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे अशा प्रकरणांचा तातडीने निपटारा करण्यासाठी संबंधित प्रस्तावावर तीन महिन्यांत निर्णय देण्याचे बंधन घालण्यात आले आहे. सामान्य प्रशासन विभागाने याबाबतचा शासन निर्णय (जीआर) जारी केला आहे.

नव्या निर्देशांनुसार एसीबीने भ्रष्टाचाराची घटना घडल्यानंतर तीन महिन्यांत खटला दाखल करण्याची परवानगी मागणारा प्रस्ताव सादर करावा. एसीबीचा प्रस्ताव आल्यानंतर खटला चालविण्यास परवानगी द्यायची किंवा नाही याचा निर्णय संबंधित प्राधिकृत अधिकार्यांनी तीन महिन्यांत घेऊन एसीबीला कळवायचे आहे. खटला दाखल करण्याची परवानगी मिळाल्यानंतर एसीबीने महिनाभरात न्यायालयात खटला दाखल करायचा आहे. या नव्या व्यवस्थेमुळे संबंधित अधिकारी आणि कर्मचार्यांविरुद्धची प्रकरणे वेगाने निकाली काढली जाणार आहेत.

शासकीय महामंडळे, मंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था आदी ठिकाणच्या अधिकारी, कर्मचारीप्रकरणी निर्णयासाठी संबंधित प्रशासकीय विभागांनी स्वतंत्रपणे सक्षम प्राधिकारी घोषित करावेत, असे सामान्य प्रशासन विभागाने परिपत्रकात म्हटले आहे.

# जातनिहाय जनगणनेचा पंचवार्षिकमध्ये उपयोग नाही

## माजी खासदार हरिभाऊ राठोड यांनी व्यक्त केले मत

मुंबई, दि. ६ प्रतिनिधी

केंद्र सरकारने देशात जातीनिहाय जनगणना प्रक्रिया देशभरात १ मार्च २०२७ पासून सुरु करण्याचे जाहीर केले आहे. ती प्रक्रिया दोन टप्प्यात होणार असून त्यात जातीनिहाय मोजणी केली जाणार आहे. मात्र या जातनिहाय जनगणनेचा सध्याच्या चालू पंचवार्षिकमध्ये कोणताही उपयोग होणार नाही असे मत माजी खासदार हरिभाऊ राठोड यांनी व्यक्त केले आहे.

जनगणनेचा तो 'संदर्भ दिवस' १ मार्च २०२७ च्या मध्यरात्री १२ वाजताचा क्षण। असेल असे जाहीर केले असले तरी सामान्य जनगणना आणि जातीनिहाय

जनगणना यांचे अधिकृत आकडे २०३१ च्या नंतरच मिळू शकतील. म्हणजेच याचा अर्थ असा आहे की, चालू पंचवार्षिक निवडणुकीनंतर हे आकडे उपलब्ध होतील. मात्र तोपर्यंत केंद्राचा कार्यकाळ आणि पंतप्रधान मोदी यांचाही कार्यकाळ संपलेला असेल असे राठोड माध्यमांशी बोलताना म्हणाले. केंद्र सरकारने जातिनिहाय जनगणना करतो असे जाहीर करून खऱ्या अर्थाने विरोधकांच्या 'तोंडाला पाणी पुसले 'असेच म्हणावे लागेल. याचे कारण म्हणजेवसामाजिक न्याय देण्यासाठी २०३१ च्या नंतर जातिगत जनगणनेची आकडे मिळणार असतील तर तोपर्यंत विरोधी पक्षातील मागणी करणारे म्हातारे होतील असेही राठोड यांनी उपहासात्मक म्हटले आहे.

या जनगणना कार्यक्रमाच्या वेळापत्रकानुसार असे स्पष्ट दिसत आहे की, अजूनही ६ वर्ष तरी जातीनिहाय जनगणनेचे अधिकृत आकडे मिळू शकणार नाहीत. या सहा वर्षात कोणत्याही आरक्षणाचे प्रश्न, एस.सी, एस.टी आणि ओबीसी आरक्षणाचे विभाजन, सामाजिक न्याय देण्याच्या दृष्टीने आर्थिक तरतुदीचे प्रश्न किंवा त्याचे नियोजन खऱ्या अर्थाने करता येणार नाही. त्यामुळे सरकारला खरेच न्याय द्यायचा असेल तर सामान्य जनगणनेपासून जातनिहाय जनगणना ही वेगळी करून राज्य सरकारला जातनिहाय जनगणनेचे सर्वच अधिकार द्यावेत. त्यामुळे ६ महिन्यांत देशातील सर्व जातीची आकडेवारी योग्य वेळी मिळू शकेल. अन्यथा जातीनिहाय जनगणनेचा चालू पंचवार्षिक मध्ये कुठलाही उपयोग होणार नाही असे मत आरक्षण अभ्यासक तथा ओबीसी नेते हरिभाऊ राठोड यांनी यावेळी मांडले.

# ९५,२०५ झाडांच्या फांद्यांची छाटणी

मुंबई, दि. ६ प्रतिनिधी

मुंबईत मुसळधार पावसात धोकादायक झाडे व त्यांच्या फांद्या पडण्याच्या घटना दरवर्षीच्या पावसात घडत असतात. अशा झाडांची व फांद्यांची छाटणी मुंबई महापालिकेकडून करण्यात येते. मुंबई शहरात आतापर्यंत सुमारे ९५ हजार २०५ झाडांच्या फांद्यांची छाटणी करण्यात आल्याची माहिती पालिकेच्या गार्डन विभागाकडून देण्यात आली.

मुंबई शहर, पूर्व आणि पश्चिम उपनगरांतील रस्त्यांवर सुमारे १ लाख ८६ हजार २४६ झाडे आहेत. यापैकी ७०७ झाडे ही मृत, धोकादायक आणि वाकलेली व सुकलेल्या अवस्थेत आहेत. अशा झांडांची छाटणी करण्यासाठी महापालिकेकडून वॉर्डनिहाय कंत्राटदारांची नियुक्ती केली जाते. पालिकेच्या गार्डन विभागाकडून मुंबई महानगरांतील १ लाख ४९ हजार ८०१ झाडांचे सर्वेक्षण करण्यात आले होते. यापैकी १ लाख १० हजार ७७१ झाडांच्या फांद्या छाटण्या आल्या आहेत.

# कोरोनाचे राज्यात ९८ तर मुंबईत ३४ नवे रुग्ण

मुंबई, दि. ६ प्रतिनिधी

राज्यात गेल्या दोन दिवसांपासून कोरोनाच्या रुग्णसंख्येत वाढ होत असून दैनंदिन रुग्णसंख्येने शंभरी गाठली आहे. गेल्या २४ तासांत राज्यात ९८ नवीन रुग्ण आढळले आहेत.त्यापैकी मुंबईत ३४, पुणे महापालिकेत ३४, ठाणे महापालिकेत ४, वसई विरार महापालिकेत १, कल्याण डोंबिवली २, पुणे जिल्हा ४, पिंपरी चिंचवडमध्ये १०, सातारा १, सांगली ३, छत्रपती संभाजीनगर १ अशी महापालिकेत रुग्णांची नोंद झाली आहे. नवी मुंबई शहरात गुरुवार ५ जून रोजी नवीन ४ कोरोना रुग्णांची भर पडली आहे. त्यामुळे नवी मुंबईतील कोरोना पॉझिटिव्ह रुग्णांचा आकडा ४० वर पोहचला आहे. ५ जून रोजी आर.टी.सी.पी. आर केलेल्यांची संख्या ३६ असून आतापर्यंत २४९ जणांनी तपासणी केली आहे. आतापर्यंत १६ रुग्ण बरे झाले आहेत. सध्या राज्यात एकूण ५९७ सक्रिय रुग्ण उपचार घेत आहेत. यापैकी ५४८ रुग्ण पूर्णपणे बरे झाले आहेत. मुंबईमध्ये जानेवारीपासून आतापर्यंत एकूण ५७५ रुग्ण आढळले आहेत.

# मनसे पदाधिकारी वैभव दळवींच्या हाती शिवबंधन

मुंबई, दि. ६ प्रतिनिधी

आगामी महापालिका, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मनसे आणि ठाकरे गटाच्या युतीबाबतची चर्चा आता जोर धरू लागली आहे. राज्यातील अनेक ठिकाणचे कार्यकर्ते एकमेकांना भेटत आहेत. कार्यकर्त्यांचे मनोमिलन सुरू झाले असून, नेत्यांचे मनोमिलन कधी होणार, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. परंतु, एकीकडे ठाकरे गट आणि मनसे यांच्या युतीची चर्चा सुरू असतानाच दुसरीकडे मात्र मनसेच्या एका बड्या नेत्याने मातोश्रीवर जाऊन ठाकरे गटात प्रवेश केला. उद्धव ठाकरे यांनी स्वतः या मनसे नेत्याच्या हाती शिवबंधन बांधले.




उद्धवसेनेचे आमदार आदित्य ठाकरे, खासदार संजय राऊत तसेच अन्य महत्त्वाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मनसेशी संभाव्य युतीबाबत अतिशय सकारात्मक पाहायला मिळत आहे. तसेच मनसेचेही अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते ठाकरे गटासोबत एकत्र येताना दिसत आहेत. राजकीय वर्तुळात तसेच या दोन्ही पक्षांमध्ये युतीबाबत बऱ्याच चर्चा होत आहेत. मनसे नेते संदीप देशपांडे आणि अविनाश जाधव यांनी एक पत्रकार परिषद घेऊन ठाकरे गटाशी युती करण्यास मनसे सकारात्मक असल्याचे सांगितले. परंतु, यानंतर अवघ्या काहीच मिनिटांत मनसेचे पदाधिकारी वैभव दळवी मातोश्रीवर पोहोचले आणि त्यांनी त्यांच्या कार्यकर्त्यांसह ठाकरे गटात प्रवेश केला. मुंबई महापालिका निवडणूक कधीही जाहीर केली जाऊ शकते. त्याच पार्श्वभूमीवर ठाकरेंच्या शिवसेनेने संघटनात्मक बांधणी मजबूत करण्यासाठी पावले उचचली आहेत. वैभव दळवींचा पक्षप्रवेश हा त्याचाच भाग असल्याचे बोलले जात आहे.

अंधेरी पूर्वमधील मनसेचे पदाधिकारी वैभव दळवी यांनी अनेक कार्यकर्त्यांसह मातोश्रीवर पोहोचले. या ठिकाणी उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत वैभव दळवी यांना पक्षात प्रवेश देण्यात आला. उद्धव ठाकरे यांनी मनसेतून आलेल्या वैभव दळवी यांच्या हाती शिवबंधन बांधले. वैभव दळवी हे मनसेचे अंधेरी पूर्वचे पदाधिकारी होते. काही दिवसांपासून त्यांनी ठाकरेंच्या शिवसेनेत प्रवेश करण्याची इच्छा व्यक्त केली होती. त्यानुसार त्यांनी त्यांच्या समर्थकांसह उद्धवसेनेत प्रवेश केला. यावेळी ठाकरे गटाचे अनिल परब आणि इतर प्रमुख नेते हजर होते. वैभव दळवी यांच्यासह ठाकरे गटातून शिंदे गटात गेलेल्या सुजाता शिंगाडे यांची उद्धवसेनेत घरवापसी झाली आहे. शिवसेना शिंदे गटात गेलेल्या सुजाता शिंगाडे यांनी पुन्हा एकदा मातोश्रीवर जाऊन उद्धव ठाकरेंची भेट घेतली आणि ठाकरे गटात परतल्या. यावेळी सुजाता शिंगाडे यांनी शिंदे गटातील कारभारावर जोरदार टीका केली.

# अभियांत्रिकीच्या प्रवेशात आता तीनऐवजी चार 'कॅप' फेऱ्या

मुंबई, दि.६ प्रतिनिधी

राज्यातील अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेमध्ये आता तीनऐवजी चार प्रवेश फेऱ्या राबविण्यात येणार आहे. शैक्षणिक वर्ष 2025-26 पासून या नव्या नियमालवलीची अमलबजावणी करण्यात येणार आहे. यामध्ये प्रवेशासाठी महाविद्यालय पसंतीमध्येही यंदा बदल केला जाणार असून पहिल्या, दुसर्या आणि तिसऱ्या फेरीत विद्यार्थ्यांनी महाविद्यालयांची प्रवेशासाठी दिलेली प्राधान्यक्रम अनुक्रमे एक, तीन आणि सहा महाविद्यालय, अशी असणार आहे. याबरोबरच व्यवस्थापन कोट्यातून भरणाऱ्या जागांचे अर्ज सीईटी कक्षाच्या संकेतस्थळावरही उपलब्ध होणार असून या कोट्यातील होणारे प्रवेशही संस्थांना मेरीटनुसारच भरावे लागणार आहेत.

दहावीनंतरचा पॉलिटेक्निक (अभियांत्रिकी पदविका) अभ्यासक्रम, थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशात बदल केल्यानंतर आता अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेतही बदल करण्यात येणार असल्याची माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली. अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेच्या आतापर्यंत तीन फेर्या राबविल्या जात होत्या. मात्र शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून या अभ्यासक्रमांच्या चार फेऱ्या राबविण्यात येणार आहेत. तसेच दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या फेरीसाठी पात्र असलेल्या उमेदवाराने भरलेला पर्याय अर्जामध्ये बदल करण्याची सुविधा मिळणार आहे. मागील फेऱ्यांमध्ये पर्याय अर्ज भरण्यात अयशस्वी ठरलेल्या उमेदवारांना या चौथ्या फेरीमध्ये पर्याय अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे.

कॅप फेऱ्यांची संख्या वाढवून आता चौथी कॅप फेरी समाविष्ट करण्यात आली आहे. यापूर्वी तीन फेर्यांनंतर प्रवेश प्रक्रिया संपुष्टात येत होती. आता चौथ्या फेरीअंती प्रवेश अंतिम करण्यात येणार असून, दुसऱ्या फेरीनंतर अभ्यासक्रमांचा प्रवेश अंतिम ठरणार आहे. आतापर्यंतच्या मर्यादित फेऱ्यांमुळे अनेक विद्यार्थ्यांना खासगी किंवा व्यवस्थापन कोट्यातील महागड्या प्रवेशांचा पर्याय स्वीकारावा लागत होता. चौथ्या फेरीमुळे विद्यार्थ्यांना सीएपी प्रक्रियेद्वारे अधिक संधी उपलब्ध होतील, असे मंत्री पाटील यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

# मीठी नदी घोटाळा : डिनो मोरियाच्या घरासह 15 ठिकाणी ईडीची छापेमारी

मुंबई, दि. ६ प्रतिनिधी

अभिनेता डिनो मोरिया आता ईडीच्या निशाण्यावर आला आहे. मीठी नदी घोटाळा प्रकरणी त्याच्या अडचणी वाढताना दिसत आहेत. मीठी नदी घोटाळा प्रकरणी ईडीने डिनो मोरियाच्या घरासह मुंबईतील १५ ठिकाणी छापेमारी केल्याचे वृत्त समोर आले आहे. एका वृत्तसंस्थेनुसार, ही कारवाई डिनो मोरिया आणि त्याच्या भावाच्या घरासहित मुंबईमध्ये अन्य ठिकाणीही करण्यात आलीय.

काही दिवसांपूर्वी बॉलिवूड अभिनेता डिनो मोरियाची मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखा अधिकाऱ्यांकडून चौकशी झाली या प्रकरणात त्याचा भाऊ सँटिनोचे देखील नाव समोर आले आहे. त्याचीही चौकशी सुरु आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी केतन कदमच्या फोनमधून डिनो आणि सँटिनोचे नाव पोलिसांना मिळाले होते.

तब्बल ६५ कोटींच्या घोटाळा प्रकरणात त्याला आर्थिक गुन्हे शाखेने समन्स पाठवून चौकशीसाठी हजर राहण्यास सांगितले होते. यामध्ये त्याचा भाऊ सँटिनोला देखील बोलावण्यात आलं होतं. या प्रकरणाचा मुख्य आरोपी केतन कदमशी दोघांनी फोनवर अनेकदा बातचीत केल्याचे समोर आले आहे.

या घोटाळा प्रकरणी बीएमसीला ६५ कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा आरोप आहे. बीएमसीचे काही अधिकारी आणि काही लोकांविरोधात ईडीचे प्रकरण हे मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखा च्या एफआयआरमधून समोर आले. हे एफआयआर मीठी नदीतून गाळ काढण्यासंबंधित तथाकथित तपासासाठी दाखल करण्यात आले होते. या प्रकरणात बीएमसीला ६५ कोटींचे नुकसान झाल्याचा आरोप आहे.

# रेल्वेच्या पॉड हॉटेलला पसंती



मुंबई, दि.६ प्रतिनिधी

जुलै २०२२ मध्ये सीएसएमटी रेल्वे स्थानकात पॉड हॉटेल सुरू करण्यात आले. यानंतर अवघ्या काही दिवसांत हे अत्याधुनिक पॉड हॉटेल प्रवाशांच्या पसंतीस उतरले. या हॉटेलची पसंती आजही कायम असून सध्या प्रतिदिन ३५-४० प्रवासी या ठिकाणी आराम करत असून, महिन्याला ११०० ते १२०० प्रवासी या ठिकाणी आपली नियोजित मेल-एक्स्प्रेस गाडी येईपर्यंत मुक्काम करतात. यातून दोन लाखांहून अधिक उत्पन्न मिळत असल्याचे हॉटेल व्यवस्थापनाकडून सांगण्यात आले. सीएसएमटी स्थानकातून सर्वसाधारण लोकलसोबत लांब पल्ल्याच्या गाड्या मोठ्या संख्येने ये-जा करतात. या गाड्यांमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना बऱ्याच वेळेला गाडीची वाट बघण्यासाठी अथवा पुढील नियोजनासाठी थांबायचे असल्यास मोठ्या प्रमाणात गैरसोयीला सामोरे जावे लागत होते. यावर उपाययोजना म्हणून पश्चिम रेल्वेपाठोपाठ मध्य रेल्वेवर देखील छत्रपती

शिवाजी महाराज टर्मिनस स्थानकात आलिशान असे पॉड हॉटेल जुलै २०२२ मध्ये सुरू करण्यात आले. या हॉटेलमध्ये प्रवाशांचा वावर वाढला असून प्रतिदिन या हॉटेलमध्ये ३५ ते ४० प्रवाशांची नोंदणी होताना दिसत आहेत. रेल्वेचा पीएनआर नंबर तपासून आवश्यक प्रक्रिया पूर्ण करत प्रवाशांना हॉटेल देण्यात येत आहे.

कॅप्सूल हॉटेल म्हणून ओळखले जाणारे हे पॉड हॉटेल उपनगरी रेल्वे मार्गावरील दुसरे हॉटेल आहे. यापूर्वी १७ नोव्हेंबर २०२१ रोजी पश्चिम रेल्वेच्या मुंबई सेंट्रल रेल्वे स्थानकावर पहिले पॉड हॉटेल उघडण्यात आले. सीएसएमटी स्थानकात लांब पल्ल्यांच्या गाड्या पकडण्यासाठी दीड-दोन तास आधीच प्रवासी स्थानकात दाखल होतात. गाडी चुकू नये म्हणून लवकर आलेले प्रवासी एक तासासाठी या ठिकाणी आराम करत असल्याचे हॉटेल व्यवस्थापन टीमने सांगितले.

# 'परिवहन महामंडळा'च्या जागांचा 'पीपीपी' पद्धतीने विकास करून उत्पन्न वाढवा - परिवहन मंत्री

मुंबई, दि.६ प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या विविध शहरांमध्ये बसस्थानक व बस आगार परिसर स्वरुपात जागा आहेत. अशा जागांचा विकास करून महामंडळ उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण करू शकते. पब्लीक प्रायव्हेट पार्टनरशीप (पीपीपी) पद्धतीने अशा जागांचा व्यावसायिक स्वरूपात विकास करण्यात यावा. यामधून महामंडळाचे उत्पन्न वाढविण्यात यावे, अशा सूचना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिल्या.

एस.टी महामंडळाच्या मध्यवर्ती कार्यालयातील सभागृहात महामंडळाच्या जागांचा व्यावसायिक स्वरूपात विकास करण्यासंदर्भात बैठकीचे आयोजन करण्यात आले. बैठकीस महामंडळाचे महाव्यवस्थापक (स्थापत्य) श्री.दिनेश महाजन, वास्तुविषारद श्री. लहीवाल आदी उपस्थित होते.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, 'एसटी'च्या राज्यातील जागांचा विकास करताना स्थानिक परिस्थिती, व्यावसायिक लाभ आदी बाबी लक्षात घेण्यात याव्यात. या जागांच्या विकासासाठी अ, ब आणि क असे वर्गीकरण करून त्यांचे एक पॅकेज करावे. ज्यामध्ये शहरी, निमशहरी आणि ग्रामीण जागांचा समावेश असावा. पॅकेजमधील मालमत्तेचे मूल्य त्याच पॅकेजमध्ये असावे. राज्यात 72 पॅकेजेसमधून एसटी बसस्थानक, आगार आदींचा विकास करण्यात येणार आहे. पॅकेजमध्ये कामांबाबत सुधारणा करायची असल्यास सुधारणा करून घ्याव्यात. या कामाला गती देवून तातडीने या संदर्भातील कार्यवाही पूर्ण करावी, असे निर्देशही परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले.

# ५० वर्षांच्या बंदिस्त भविष्यासाठी आशेचा किरण

## जुहू वायरलेस परिसरातील १००० कुटुंबांच्या पुनर्विकासाचा मार्ग मोकळा होणार?

मुंबई, दि. ६ प्रतिनिधी

जुहू सर्कल परिसरातील ७५ वर्षांहून अधिक जुन्या इमारती आणि झोपडपट्ट्यांचा पुनर्विकास तब्बल ५० वर्षांपासून संरक्षण कायद्यात अडकून राहिला आहे. पण आता या नागरिकांच्या डोळ्यांतील आशेचा किरण पुन्हा उजळू लागला आहे. उत्तर पश्चिम मुंबईचे खासदार रविंद्र वायकर यांनी हा विषय थेट केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्यासह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि केंद्रातील अन्य मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिला आहे. विशेष म्हणजे, संरक्षण मंत्र्यांनी या बाबतीत लक्ष घालण्याचे लेखी आश्वासन दिले आहे.

या परिसरातील जुहू वायरलेस केंद्र १९७६ साली संरक्षण अधिनियम १९०३ अंतर्गत अधिसूचित करण्यात आले. या अधिनियमानुसार, वायरलेस केंद्राच्या ५०० मीटर परिघात कोणतेही नवीन बांधकाम, वाहतुकीचे प्रकल्प किंवा सार्वजनिक उपक्रम प्रतिबंधित आहेत. या भागात यापूर्वीपासूनच असलेल्या सुमारे २०० इमारती व १००० कुटुंबांना त्यामुळे आजपर्यंत कोणतीही पुनर्विकास सुविधा मिळालेली नाही.

या इमारतींवर आता धोका लटकत आहे, आणि नागरिक भीतीच्या छायेत जगत आहेत. याशिवाय, या वायरलेस केंद्राचा वापर सध्या बंद असून ती जागा भग्नावस्थेत आहे. इतकंच नव्हे तर, येथे सार्वजनिक समारंभ आणि लग्नसोहळ्यांसाठी मोठ्या प्रमाणात ध्वनीप्रदूषण व इतर नियमभंग होत असताना, गरजूंना मात्र बांधकामावर निर्बंध आहेत, ही परिस्थिती संतापजनक आहे, असं खासदार वायकर यांनी आपल्या पत्रात नमूद केलं आहे.

आज भारत अंतराळ आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात प्रवेश करत असताना, अशा जुन्या संरचनांवर आधारित निर्बंध कायम ठेवणं अयोग्य आहे, असे त्यांचे मत आहे. वायरलेस तंत्रज्ञान आता अधिक सुलभ व सुरक्षित पद्धतीने विकसित होऊ शकतं, त्यामुळे १९०३ मधील जुने कायदे नव्या युगात पुनरावलोकनास पात्र आहेत, असा ठाम सूर त्यांनी व्यक्त केला.

जुहू वायरलेस बाधित रेसिडेंटल असोसीएशनने देखील या बाबतीत सातत्याने पाठपुरावा केला आहे. आता केंद्रीय संरक्षण मंत्री यांच्या आश्वासनामुळे या उलथवलेल्या भविष्यास नवसंजीवनी मिळू शकते.

खासदार वायकर यांच्या हस्तक्षेपामुळे जुहू परिसरातील हजारो कुटुंबांचे पुनर्विकासाचे स्वप्न प्रत्यक्षात उतरण्याची आशा निर्माण झाली आहे. पुढील निर्णय लवकर घेतला जातो की नाही, याकडे आता संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

# युतीचा चेंडू शिवसेनेच्या कोर्टात!

**राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येण्याच्या गेल्या काही दिवसांपासून जोरदार चर्चा सुरू आहेत. ठाकरे गटाचे नेते संजय राऊत हे सुद्धा मनसे आणि शिवसेनेच्या युतीवर रोज बोलत आहेत. त्यामुळे राज्यात या युतीची जोरदार चर्चा सुरू असतानाच मनसे नेत्यांनी आज पत्रकार परिषद घेऊन युतीबाबतची भूमिका स्पष्ट करतानाच ठाकरे गटासमोर सर्वात मोठी अट ठरली आहे. आम्हाला दोनवेळेचा अनुभव आहे. त्यामुळे आम्ही ताकही फुंकून पित आहोत. ठाकरे गटाला आमच्यासोबत युती करायची असेल तर आमच्याकडे रितसर प्रस्ताव द्या किंवा उद्धव ठाकरेंनी राज ठाकरे यांना फोन करावा. त्यानंतर राज ठाकरे काय तो निर्णय घेतील, अशी अटच मनसेने ठेवली आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे हे आता राज ठाकरेंना फोन करणार का? अशी चर्चा सुरू झाली आहे.**

---------------------

मनसे नेते संदीप देशपांडे आणि अविनाश जाधव यांनी आज पत्रकार परिषद घेऊन थेट शिवसेनेच्याच कोर्टात युतीचा चेंडू टोलवला आहे. युतीचा निर्णय राज ठाकरे घेत असतात. ठाकरे गटासोबत जाण्याबाबत कोणतीही चर्चा पक्षांतर्गत झाली नाही. आमचं तोंड दुधाने पोळलं गेलं आहे, त्यामुळे आम्ही ताकही फुंकून पितोय.

जोपर्यंत राज ठाकरेंकडे ठोस प्रस्ताव येत नाही तोपर्यंत निर्णयापर्यंत आम्ही पोहोचू शकत नाही. प्रस्ताव आल्यावर राज ठाकरे योग्य निर्णय घेतील. अमित ठाकरे यांनीही काल तेच सांगितलं. म्हणून आम्ही आज पत्रकार परिषद घेतली आहे, असं संदीप देशपांडे म्हणाले.

२०१४ आणि २०१७ च्या घटनांचा मी साक्षीदार आहे. जेव्हा युती करावी अशी आमची भावना होती, तेव्हा बाळा नांदगावकर मातोश्रीवर गेले होते. उद्धव ठाकरेंनी त्यांना भेट दिली नाही.

सुभाष देसाई त्यांना भेटले. युती करावी असा राज ठाकरे यांचा निरोप आहे, असा निरोप घेऊन बाळा नांदगावकर मातोश्रीत गेले होते. याला म्हणतात प्रस्ताव. तसा कोणताही प्रस्ताव आता ठाकरे गटाकडून आमच्याकडे आला नाही. जोपर्यंत प्रस्ताव येत नाही, तोपर्यंत राज ठाकरे कसा निर्णय घेऊ शकतात? असा सवाल संदीप देशपांडे यांनी केला.

**महापालिकेची तयारी सुरू**

पूर्वी ही युती करण्यासाठी शिवसेनेवाले पडद्यामागे सकारात्मक होते. पण त्यांनी एक पाऊल पुढे टाकलं नाही. उद्धव ठाकरेंचा आधी फोन येऊ द्या, निर्णय घेण्याचा अधिकार राज ठाकरेंचा आहे ना?, असं सांगतानाच आमची महापालिकेची तयारी सुरू आहे. जेव्हा प्रस्ताव येईल तेव्हा राज ठाकरे निर्णय घेतील, असंही त्यांनी स्पष्ट केलं.



**ठिक आहे, परिवर्तन होत आहे**

संजय राऊत हे राज ठाकरे यांच्या घराला कॅफे म्हणून हिणवायचे. मात्र, आज राऊत यांनी आमच्यासाठी राज ठाकरे यांचं घर हे दुसरं घर आहे, असं विधान केलं. त्यावरून संदीप देशपांडे यांनी राऊत यांना टोले लगावले.

पुस्तक लिहिल्यानंतर राऊत यांच्या विचारात परिवर्तन झालं असेल तर स्वागत करतो. परिवर्तनही संसार का नियम आहे, असं गीता सांगते. त्यांनी गीता वाचली असेल तर स्वागत आहे. कॅफे हे राऊतच म्हणाले होते. घरही तेच म्हणत आहेत. परिवर्तन होत आहे, असा चिमटा देशपांडे यांनी काढला.

दरम्यान, अविनाश जाधव यांनीही यावर प्रतिक्रिया दिली आहे. दोन्ही भावांकडे एकमेकांचा नंबर आहे. हेच काल अमित ठाकरे यांनी सांगितलं. अख्ख्या शिवसेनेला मनसे सोबत युती हवी असेल तर उद्धव ठाकरेंकडे राज ठाकरेंचा नंबर आहे.

मराठी माणूस आणि महाराष्ट्राच्या हिताच्या गोष्टी घडणार असेल तर उद्धव ठाकरे यांनी राज ठाकरेंना एक कॉल करावा. कॅमेऱ्यासमोर जे नेते बोलत आहेत. त्यांनी उद्धव ठाकरेंना सांगावं की राज ठाकरेंशी बोला. मी खात्रीने सांगतो, तुम्ही एक पाऊल पुढे या साहेब १०० पावलं पुढे येतील. २०१४ आणि २०१७ चा आम्हाला वेगळा अनुभव आहे. कॅमेऱ्यासमोर काय युती होते का?, असा सवाल अविनाश जाधव यांनी केला.

मुळात एक प्रश्न उभा राहतो तो हा की, राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांना मनापासून एकमेकांशी युती करायची आहे का? राज ठाकरे यांच्या मनसेचा मुंबई महानगरपालिका, राज्यातील अन्य स्थानिक स्वराज्य संस्था तसेच विधानसभेत प्रभाव किती? याचा विचार केल्यास गेल्या काही वर्षात मनसेला गळतीच लागल्याचे दिसते.

या दोन्ही पक्षांमध्ये युती झाली तर दुसऱ्या फळीतील नेते, पदाधिकारी, कार्यकर्त्यांची गोची होईल. तिकीट वाटपात अनेकांचे पत्ते कट होतील. अन्य राजकीय पक्षांना त्यांचे एकत्र येणे धोकादायक ठरू शकते. त्यामुळे येत्या काळात उबाठा शिवसेना आणि मनसे यांची युती होईलच, असे ठामपणे सांगता येत नाही. आता मनसेने चेंडू शिवसेनेच्या कोर्टात टोलवला आहे. बघुया काय होते ते?

■ ■ ■

## त्याग आणि बलीदानाचा सण
# ईद अल-अजहा

ईद-उल-अजहा किंवा बलिदानाची ईद हा एक मुस्लिम सण आहे. हा सण जगभर साजरा केला जातो. या दिवशी कुराणमधील बळीची घटना साजरी केली जाते. याच दिवशी अल्लाच्या आज्ञेचे पालन करण्यासाठी पैगंबर इब्राहिमांनी आपला मुलगा इस्माईलचा बळी देण्याच्या इच्छेचा सन्मान केला.

इब्राहिम आपल्या मुलाचे बलिदान देत होते, तथापि, अल्लाहने त्यांना एक कोकरू प्रदान केले जो त्यांनी त्यांच्या मुलाच्या जागी बळी द्यायचे होता कारण त्यांनी अल्लाहच्या नावाने स्वतःच्या मुलाचे बलिदान देण्याची इच्छा दर्शविली होती. या हस्तक्षेपाच्या स्मरणार्थ प्राण्यांचा विधीपूर्वक बळी दिला जातो.

त्यांच्या मांसाचा काही भाग प्राणी अर्पण करणारे कुटुंब वापरतात, तर उर्वरित मांस गरीब आणि गरजूंना वाटले जाते. मिठाई आणि भेटवस्तू दिल्या जातात, लहान मुलांना भेटवस्तू किवा पैसे दिले जातात आणि विस्तारित कुटुंबातील सदस्यांना भेट दिली जाते आणि त्यांचे स्वागत केले जाते. या दिवसाला कधीकधी महान ईद देखील म्हटले जाते. हा सण कुबार्नीचा सण किंवा पवित्र हज यात्रेचा सण म्हणूनही ओळखला जातो.

बलिदानाचा सण हिजरीच्या शेवटच्या महिन्यात, झु-अल-हज मध्ये साजरा केला जातो. जगभरातील मुस्लिम या महिन्यात सौदी अरेबियातील मक्का येथे एकत्र येऊन हज साजरा करतात.

या दिवशी ईद-उल-अजहाही साजरी केली जाते. खरे तर हा हजचा एक भाग आणि मुस्लिमांच्या भावनांचा दिवस आहे. जगभरातील मुस्लिमांचा एक गट मक्का येथे हज करतो, जो उर्वरित मुस्लिमांसाठी आंतरराष्ट्रीय भावनांचा दिवस बनतो. ईद-उल-अजहा चा शाब्दिक अर्थ त्यागाची ईद आहे, या दिवशी एखाद्या प्राण्याचा बळी देणे हा एक प्रकारचा प्रतीकात्मक बलिदान आहे.

हज आणि त्याच्याशी संबंधित विधी हजरत इब्राहिम आणि त्यांच्या कुटुंबाने केलेल्या कायार्ची प्रतिकात्मक पुनरावृत्ती आहे. हजरत इब्राहिम यांच्या कुटुंबात त्यांची पत्नी हाजरा आणि मुलगा इस्माईल यांचा समावेश होता.

असे मानले जाते की हजरत इब्राहिमला एक स्वप्न पडले होते ज्यात ते आपला मुलगा इस्माईलचा बळी देत होते, हजरत इब्राहिम आपल्या दहा वर्षाच्या मुलगा इस्माईलला देवाच्या मार्गावर बलिदान देण्यासाठी निघाले. देवाने त्याच्या देवदूतांना पाठवून इस्माईल ऐवजी एका प्राण्याचा बळी देण्यास सांगितले, असा उल्लेख पुस्तकांमध्ये आहे.

वास्तविक इब्राहिमकडून मागितलेला खरा त्याग हा त्याचाच होता, तो म्हणजे स्वतःला विसरून जा, म्हणजे आपले सुख-सुविधा विसरून स्वतःला मानवतेच्या सेवेत पूर्णपणे झोकून द्या. मग त्यांनी आपला मुलगा इस्माईल आणि आई हाजरा यांना मक्केत स्थायिक करण्याचा निर्णय घेतला. ण मक्का त्याकाळी वाळवंट होता, त्यांना मक्केत स्थायिक केल्यानंतर ते स्वतः मानवसेवेसाठी बाहेर पडले. अशाप्रकारे वाळवंटात स्थायिक होणे हा त्याचा आणि त्याच्या संपूर्ण कुटुंबाचा त्याग होता.

इस्माईल मोठा झाल्यावर एक काफिला तिथून निघून गेला आणि इस्माईलचा त्या काफिल्यातील एका तरुणीशी विवाह झाला, त्यानंतर वंश सुरू झाला. ज्यांना इतिहासात इस्माईल किंवा वानू इस्माईल म्हणून ओळखले जाते.

हजरत मुहम्मद साहेब यांचा जन्म याच घराण्यात झाला. ईद-उल-अजहाचे दोन संदेश आहेतः पहिला, कुटुंबातील ज्येष्ठ सदस्याने स्वार्थाच्या पलीकडे जाऊन मानवी उन्नतीसाठी स्वतःला गुंतवून घेतले पाहिजे. ईद-उल-अधा एका लहान कुटुंबात कसा नवीन अध्याय लिहिला गेला याची आठवण करून देतो. या दिवशी मशिदींमध्ये मोठ्या संख्येने मुस्लिम एकत्र येतात. लाखो मुस्लिम पांढरे कुर्ता घालून ईदगाह किंवा मोठ्या मशिदीत ईदची नमाज अदा करतानाचे दृश्य खूप आनंददायी असते. नमाज अदा केल्यानंतर उंट, बकरी, खेचर, मेंढ्या इत्यादी चार पायांच्या प्राण्यांची कुर्बानी दिली जाते.

या दिवशी मुस्लिम त्यांचे नवीन किंवा आवडते कपडे घालतात. महिला शॉर्टब्रेड कुकीजसह विशेष पदार्थ बनवतात. त्या कुटुंब आणि मित्रांसोबत एकत्र येतात. या दिवशी ईदची नमाज एकत्रितपणे अदा केली जाते. नमाज जमवण्यात महिलांचा सहभाग समुदायानुसार वेगवेगळा असतो.

यात दोन भाग असतात, पहिल्या भागामध्ये सात तकबीर तर दुसऱ्या भागामध्ये पाच तकबीर असतात. शिया मुस्लिमांसाठी, सलात अल-ईद पाच दैनंदिन प्रार्थनेपेक्षा वेगळी असते कारण दोन्ही ईदच्या नमाजांसाठी इश्ना किंवा इकामा स्पष्टपणे केला जात नाही.

नमाजानंतर इमाम उपदेश देतात. नमाज आणि उपदेशांच्या शेवटी, मुस्लिम एकमेकांना मिठी मारुन ह्ईद मुबारकह्ल म्हणत शुभेच्छा देत भेटवस्तूंची देवाणघेवाण करतात. अनेक मुस्लिम याप्रसंगी त्यांच्या गैरमुस्लिम मित्रांना, शेजारी, सहकारी आणि वर्गमित्रांना त्यांच्या ईद उत्सवात आमंत्रित करतात जेणेकरून त्यांना इस्लाम आणि मुस्लिम संस्कृतीची चांगली ओळख करून दिली जाते.

इस्लामिक मान्यतेनुसार, बकरी ईदची नमाज ही दोन रकातची नमाज आहे, जी अजान आणि इकमतशिवाय जमावाने अदा केली जाते. या नमाजात अधिक तकबीर आहेत, सहसा पहिल्या रकातमध्ये ६ आणि दुसऱ्या रकातमध्ये ५, जरी वेगवेगळ्या इस्लामिक पंथांमध्ये ही संख्या थोडी वेगळी असू शकते.

नमाजानंतर इमाम प्रवचन देतो, जे ऐकणे सुन्नत मानले जाते. मुस्लिमांना या दिवशी चांगले कपडे घालण्याचा, सुगंधी अत्तर लावण्याचा आणि मोकळ्या मैदानात किंवा मोठ्या मेळाव्यात नमाज अदा करण्याचा सल्ला दिला जातो. ईद-उल-अजहा दरम्यान लोकांना मांस वाटणे, ईदच्या पहिल्या दिवशी ईदच्या नमाजपूर्वी आणि ईदच्या तीन दिवसांत नमाजानंतर तकबीर म्हणणे हे या महत्त्वाच्या इस्लामिक सणाचे आवश्यक भाग मानले जातात.

ईदगाह किंवा मशीद नावाच्या खुल्या वक्फ मैदानावर मोठ्या मेळाव्यात ईदची नमाज अदा करण्यासाठी पुरुष, महिला आणि मुले यांनी त्यांचे उत्तम कपडे परिधान करावेत अशी अपेक्षा असते. ज्यांना परवडणारे श्रीमंत मुस्लिम त्यांचे सर्वोत्तम हलाल पाळीव प्राणी, सहसा गाय, कुर्बानी देऊ शकतात, परंतु प्रदेशानुसार उंट, बकरी किंवा मेंढी, इब्राहीमच्या एकुलत्या एका मुलाची बलिदान देण्याच्या इच्छेचे प्रतीक म्हणून.

बलिदान दिले जाणारे प्राणी ज्याला अधिया म्हणतात, ज्याला पर्शियन-अरबी शब्द कुबार्नी देखील म्हणतात, विशिष्ट वय आणि गुणवत्तेचे मानक पूर्ण करावे लागतात अन्यथा तो प्राणी अस्वीकार्य बलिदान मानला जातो.

एकट्या पाकिस्तानमध्ये २.० अब्ज अमेरिकन डॉलर्सपेक्षा जास्त किमतीचे अंदाजे दहा दशलक्ष प्राणी ईदच्या दिवशी बलिदान दिले जातात. बलिदान दिलेल्या प्राण्याचे मांस तीन भागांमध्ये विभागणे पसंत केले जाते. एक तृतीयांश कुटुंबात अबाधित राहते आणि एक तृतीयांश नातेवाईक, मित्र आणि शेजाऱ्यांना दिले जाते आणि उर्वरित एक तृतीयांश गरीब आणि गरजूंना दिले जाते. आज या प्रसंगी सर्व मुस्लिम बंधू आणि भगिनींना ईद-उल- अजहाच्या हार्दिक शुभेच्छा!



प्रविण बागडे
नागपूर. 9923620919
pravinbagde@gmail.com

■ ■ ■

# हुंडा.. अवास्तव अपेक्षा !

लग्न म्हंटल की दोन परिवाराचे ऋणानुबंध जे पती पत्नीच्या नात्याला मान्यता देते ... ही पवित्र बंधने निर्माण होतांना किंवा जोडली जाताना काही अघोषीत अपेक्षा ह्या वधू वर पक्ष्यांच्या असतातच... तोही एक प्रकारची हुंडा मागण्याची सोय काही मध्यस्थी नातेवाईक यांच्या माध्यमातून होतेच की...

मुलांच्या मुलीकडे अपेक्षा जसे सुंदर देखणी, घरंदाज, नोकरीवाली, किंवा खाजगी जॉब असणारी, किंवा घरदार सांभाळणारी अशा प्रकारच्या अनेक मागण्या किंवा अपेक्षा असतातच .... तशाच मुलींच्याही अपेक्षा असतात. मग मुलगा सरकारी नोकरी वाला असावा, तो वेल सेटल असला पाहिजे, स्वतःच घर दार, गाडी, घोडी, शेती असली की आपली मुलगी अगदी सुखात .. खाजगी नोकरी असेल तर पॅकेज मोठे व पुन्हा स्वतःचं घर दार आलेच, मुलगा पुण्यात सारख्या मेट्रो सिटी मध्ये सेट असावा, सुंदर गोरापान असला पाहिजे यासारख्या अनेक वास्तव अवास्तव अपेक्षा आज समाजात फार वाढल्या आहेत.

शिवाय दोघेही सेट होण्याचे ठिकाणही जोडले जाऊन लग्न जोडणारी मंडळी जशी खरेदी विक्री सारखी गोळा बेरीज करण्यात मग्न होतात त्याच बरोबर लग्न मोठं दिमाखदार, भव्य दिव्य करावं जेणेकरून सर्वत्र उदो उदो व्हावा... त्यात भर म्हणे अहेर पद्धती बंद... (पैशाचे पाकिटे चालतील!) ते घेण्यासाठी यादी घेऊन बसणारी मंडळी असतात. असो तेही मान्य. मात्र पैशांची उधळपट्टी, अवास्तव खर्च मग प्री वेडींग फोटो शूट, पासून तर अगदी लग्न संपन्न होईपर्यंत वेगवेगळ्या इव्हेंट प्रमाणे दिखाऊपणा असणारी पुष्कळ लग्न आज प्रत्येक समाजात पोकळी निर्माण करीत आहेत.

खर्च करण्यावर काही मर्यादा नाही. इतका खर्च करूनही नवविवाहित दाम्पत्य काही सुखात नांदत नाही, ताण तणाव, मारहाण, आत्महत्या व दोन्ही परिवाराची राखरांगोळी होऊन जो समाज आपल्या कार्यक्रमामध्ये सहभागी होऊन मौज मजा करतो तेव्हा मात्र तो भांडण तंटा न सोडवता सहानुभूती न देता आपली उलट बदनामी करून मजा पाहतो.

आजकाल समाज नातेवाईक, हे काय म्हणतील? दिखाऊ प्रतिष्ठा व सोसिअल मीडिया यांच्या नादात कर्जबाजारी होऊन कुटुंबातील लोकांच्या अक्षरशः नाकी नऊ येतात. मुळात लग्न थाटात करण्यासाठी मनाई नाही, मात्र १०० ते २०० मोजक्या लोकात शिस्तबद्ध, नेटके, उधळपट्टी न करता केल्यास लग्नाची तीच पुंजी भविष्यात आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी कामी येईल किंवा तोच पैसा दोघांना उद्योग धंदा यासाठी वापरता येईल

प्रतिष्ठा जपायची असेल तर अनाथ आश्रम, वृद्धाश्रम किंवा सामाजिक उपक्रम यासाठी वापरल्यास अधिक पुण्य, आशिर्वाद, आत्मिक समाधान मिळेल यात शंका नाही. अहो, तुम्ही सोन्याच्या ताटात जरी लोकांना जेवण घातले तरी ते त्यात कमीपणा, उणीवा असतीलच, लोकं टीका करतील. छोट्या गोष्टीची कमतरता भासली की थट्टा उडवतील. हा समाज कुठलाही असो तो नाव ठेवण्यात माग पुढें पाहत नाही.

कुठल्याही पालकांना आपल्या घरी थाटात लग्न व्हावे हे जरी वाटत असले तरी अवास्तव अपेक्षांमुळे आज अनेक तरुण तरुणी लग्न जुळण्याच्या प्रतीक्षेत आहेत. गावोगावी उत्तम सुशिक्षित, संस्कारी, निर्व्यसनी मुलं आहेत पण कुणाला नोकरी नाही, कुणाजवळ शेती नाही, घर नाही, कुटुंब नाही म्हणून लग्न जुळत नाही.

लग्न जुळवंतांना मुलगा स्वतःच्या कमाईवर उभा असणारा निर्व्यसनी, मेहनती व स्वकष्टाने, जिद्दीने उभारी घेणारा असला की त्याचे कडे शेती नोकरी नसली तरी चालेल. मात्र तो आपकमाई वर उभा राहणारा असावा, बाप कमाईवर, प्रॉपर्टी पाहून लग्न करणारी नसावी. तसेच शेती असली तरी लग्न झाल्यावर मुली शेतीत जात नाही. म्हणून शेती हा विषय लग्नाचा केंद्रबिंदू नसावा, निव्वळ प्रॉपर्टी काही कामात येत नाही.

तसेच मुलींच्या पालकांच्या अवास्तव अपेक्षा पण नसाव्यात. आपली मुलगी सुखात संसार करावी असं वाटत असेल तर होतकरू मेहनती जिद्दी, संस्कारी, निर्व्यसनी मुलं मिळाली की ते दोघे स्वतःच्या जिद्दीने महाल उभा करतील, जगण्यासाठी संपत्ती किंवा शेतीच काही उपयोगी पडत नाही.

काही लग्न जुळवणारी मंडळी शेती घर नोकरी पाहून संबंध जोडतात. पण मुलगाच व्यसनी निघाला तर भवितव्य काय? मुलींना चांगले संस्कार, शिक्षण, जाणीव असली की त्या घर चांगल्या चालवतील. मात्र लग्नाच्या संबंधात मागणी हुंडा, गाडी, सोनं, प्रॉपर्टी मागणे म्हणजे कितीही सुखी असला तरी भीक मागणे आहे असंच मी समजतो ....

आई बाप आपला काळजाचा तुकडा सोपवतो त्या मुलीला अन्य मागण्या करणारी लालची लोकं स्वतःलाही मुलगी आहे हेच विसरतात व मोठया मोठया गप्पा मारताना दिसतात. लग्नाच्या बैठकीत जणू श्रीमंतीची चर्चा व अवास्तववादी मागण्या वाढीस लागतात. त्यातून खऱ्या होतकरू तरुणी, तरुण यांची लग्न जुळण्याऐवजी तुटू लागतात.

आपल्या श्रीमंतीचे पोवाडे घरीच मिरवा, मात्र कुण्या गरीब कुटुंबातील तरुणीच्या आई बापाला फासावर काही चढवू नका किंवा आपल्या श्रीमंतीच्या मोहात होतकरू तरुणाला अडकवू नका, जो खरा मेहनती असेल तो हुंडा व अवास्तव अपेक्षा काही ठेवत नाही. स्वकष्टाने स्वतःचे साम्राज्य उभा करतो. त्याला मोह हा प्रॉपर्टीचा नसतो, म्हणून घर टिकण्यासाठी समाजातील दोन्ही कुटुंब एकमेकांना समजून गुण्यागोविंदाने नांदतील हीच साधारणपणे अपेक्षा असावी. बाकी मोह माया काही कामाची नाही...

कामापूरता पैसा स्वतःच्या कष्टाने कमवावा तो सासरच्या मंडळींना का मागावा? भीक मागून काही स्वाभिमान जगवता येत नसतो, इज्जतीने जगायचे तर स्वतःच्या मनगटावर जगावे. गाडी पाहिजे, लग्न धुमधडाक्यात पाहिजे, सोनंही पाहिजे, घरही पाहिजे, हिस्साही पाहिजे मग काय हातात बांगडी घालून जगणेच म्हणावे लागेल.



उमेश ज्ञानेश्वर ईखे
कृष्णा विहार, नागपूर.
9518571138

काही सो कॉल्ड उच्चशिक्षित, गर्विष्ठ श्रीमंत मंडळी समाजाचे वातावरण बिघडवीत आहेत. त्यांचाच मुळे आज लग्न एका सेलेब्रिटी इव्हेंट सारखी झाली आहेत ते पाहून इतर मंडळी ही त्याला साजेशी लग्न कर्ज काढून शेती विकून करतात. भविष्य काही पहात नाही. ज्यांच्या जवळ पैसे आहेत, त्यांनी करावेत लग्न मोठी मोठी. मात्र गरीब कुटुंबातील मंडळींना हीन भावनेने पाहू नये. लग्न ही शेवट पर्यंत निभावली जावीत.

कुटुंब म्हटलं की भांड्याला भांड लागणारच. मात्र त्याचं द्वेषात, रूपांतर न होण्या साठी काही लुड बुड करणारी मंडळी यांनीही थांबलं पाहिजे. घर तोडण्या ऐवजी कुटुंब जुळुन राहील इतकं तरी समजदार राहावं.

लग्न तुटलं की प्रॉपर्टी कामात पडत नाही शेवटी पती पत्नी हेच समीकरण कुटुंब व्यवस्थेचा आधार आहे मग पैसा पोडगी काही सुखाची शाश्वती देत नाही, जीवन जगताना अपेक्षा ह्या स्वतःकडून असाव्यात त्या इतरांच्या कडून नको. आज अनेक लग्न हुंड्यासाठी तुटतात त्याला दोन्ही कडच्या अवास्तव अपेक्षा व मध्यस्थी करणारे लोक यामुळे बरीच कुटूंब उध्वस्त झाली आहेत. काही कोर्टात चकरा मारतात, तर काही स्वतःला संपवून कायमचं दुःख कुटुंबातील लोकांना देतात.

वास्तविक लग्नाची आचारसंहिता जैन, ब्राम्हण, ख्रिश्चन व काही अनेक समाजाच्या सारखी असली पाहिजे. थोडक्यात लग्न व जमलेली राशी ही भविष्याची गुंतवणूक ही आजची गरज आहे.

सर्वांना काही सरकारी नोकऱ्या मिळणार नाही. शेवटी नोकरी ही कुठलीही असो किंवा बिझनेस असो मेहनतीला पर्याय नाही. चांगली मुलं, मुली ही ओळखता आली पाहिजे, निव्वळ रूप पैसा शेती काही कामात येतं नाही. निर्विवाद पणे कुठलेही व्यसन नसणारी मुलं ही काही सोन्यापेक्षा कमी नाहीत.

ॲडजस्ट करण्यापेक्षा समजावून घराचा गाडा चालवला तर अनेक लग्न जुळून राहून कौटुंबिक न्यायालयात पायरी चढण्याची वेळचं येणार नाही. नाहीतर स्वतःचे कुटूंब उध्वस्त करण्यास आपणच जवाबदार राहू. यात राहू केतूचा काही दोष नाही.

आपल्या आई वडील आजोबांनी काही पूजा कुंडल्या भटजी यांना दाखवून लग्न जोडली नाही किंवा केली नाही, ह्या रेशीमगाठी स्वतःच्या मनाने सद्सद्विवेक बुद्धिने जोडून कुणाच्या सांगण्याने घर तोडली नाही वा कलहही घरापर्यंत असला तरी घरीच निपटून मूलंबाळ सेट केली व आनंदाची बोळवण केली तेव्हा नव्हता फोन. हेही मानावेचं लागेल

संत तुकडोजी महाराज ग्रामगीता या पवित्र ग्रंथात लिहून आपणास सावधान करून गेले

*विवाहादि संस्कार आवश्यक।*
*परि खर्च न व्हावा अधिक।*
*त्यांचे स्वरूप जाणोनि तात्विक ।*
*आचरावे सर्वदा।*

■ ■ ■ ■

# आरसीबीचे ऐतिहासिक जेतेपद!

इंडियन प्रीमियर लीग अर्थात आयपीएलच्या अठराव्या हंगामाची नुकतीच सांगता झाली. मंगळवारी झालेल्या रोमहर्षक अंतिम सामन्यात रजत पाटीदारच्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू अर्थात आरसीबी संघाने श्रेयस अय्यरच्या पंजाब सुपर किंग्स संघाला सहा धावांनी नमवत पहिल्यांदाच आयपीएल ट्रॉफीवर नाव कोरत इतिहास रचला.

आरसीबीने अठराव्या वर्षी हे ऐतिहासिक विजेतेपद मिळवून १८ वर्षाची प्रतीक्षा संपवली. गेली १८ वर्ष आरसीबीचे आजी - माजी खेळाडू, प्रशिक्षक, सपोर्ट स्टाफ आणि आरसीबीचे चाहते ज्या क्षणाची वाट पाहत होते तो क्षण आला आणि आरसीबीचा महान खेळाडू विराट कोहली भावूक झाला.

आरसीबीच्या विजयावर शिक्कामोर्तब झाल्यावर विराट कोहलीच्या डोळ्यातून आनंदाश्रु वाहू लागले. लहान मुलासारखा विराट रडू लागला. कधी जमिनीत तोंड खुपसून तर कधी आपल्या आजी माजी सहकाऱ्यांच्या गळ्यात पडून तर कधी आपल्या पत्नीच्या गळ्यात पडून तो रडू लागला. विराटला इतके भावूक झाल्याचे याआधी कधी पाहिले नाही.





मैदानावर नेहमी आक्रमक राहणारा विराट पहिल्यांदाच इतका भावूक झाला आणि त्याने आपल्या आनंदाश्रुंना वाट मोकळी करून दिली. अर्थात हे आनंदाश्रु होते १८ वर्ष पाहिलेले स्वप्न साकार झाल्याचे. हे फक्त आनंदाश्रु नव्हते तर त्यामागे त्याने केलेली मेहनत, जिद्द आणि त्याची हार न मानण्याची वृत्ती. आपल्या संघाला आयपीएलचे विजेतेपद मिळवून द्यायचेच असा चंग त्याने बांधला पण त्यात त्याला यश येत नव्हते.

यावेळी मात्र त्याला त्यात यश आले आणि विराट सोबतच मैदानावरील आणि आणि टीव्ही, मोबाईलवर सामना पाहणाऱ्या करोडो क्रिकेट प्रेमींनी एकच जल्लोष केला. जो तो विराट कोहलीचे आणि आरसीबी संघाचे कौतुक करू लागला. घराघरात आणि सोशल मीडियावर आरसीबी संघाचे अभिनंदन करण्याची स्पर्धा सुरू झाली. अर्थात आरसीबी संघांसाठी हे विजेतेपद सोपे नव्हते कारण अंतिम सामन्यात पोहचलेले दोन्ही संघ हे तुल्यबळ होते. दोघांनीही साखळी सामन्यात चांगली कामगिरी करून पॉईंट टेबलवर पहिले आणि दुसरे स्थान पटकावले होते त्यामुळे अंतिम सामना रंगतदार होणार यात कोणालाही शंका नव्हती.

पहिली फलंदाजी करताना आरसीबीने अपेक्षेप्रमाणे चांगली फलंदाजी करत १९० धावा काढल्या. विराट कोहली, रजत पाटीदार, जितेश शर्मा यांनी चांगली फलंदाजी केली मात्र पंजाबच्या गोलंदाजांनी त्यांना २०० धावा काढून दिल्या नाहीत. अर्शदीप सिंग आणि काईल जेमिन्सन यांनी प्रत्येकी तीन गडी बाद केले. १९१ धावांचा पाठलाग करताना पंजाबने चांगली सुरुवात केली प्रियांश आर्य आणि प्रभसिमरन सिंग यांनी चांगली सलामी दिली. दोघांनीही पहिल्या गाड्यांसाठी ४३ धावा काढल्या. जॉस इंग्लिसने २३ चेंडूत ३९ धावा काढून सामन्यात रंगत आणली मात्र श्रेयस अय्यर पुन्हा एकदा आरसीबी विरुद्ध फ्लॉप ठरला. अवघी १ धाव काढून तो माघारी फिरला. तिथेच सामना आरसीबीच्या बाजूने झुकला. अखेरच्या षटकात नेहाल वढेरा आणि शशांक सिंग यांनी झुंज दिली पण ती अपुरी ठरली. पंजाबचा संघ १८४ धावाच काढू शकला आणि आरसीबीने सहा धावांनी विजय मिळवला. आरसीबीच्या या विजयात त्यांच्या गोलंदाजांचे मोलाचे योगदान होते.

त्यांनी अतिशय शिस्तबद्ध मारा केला. भुवनेश्वर कुमार आणि कृणाल पांड्याने प्रत्येकी दोन बळी घेतले.त्यांच्या अचूक माऱ्याने पंजाबच्या फलंदाजांना वेगाने धावा काढता आल्या नाहीत. कृणालाने तर चार षटकात अवघ्या सतरा धावा देत दोन गडी बाद केले म्हणूनच त्याला प्लेअर ऑफ द मॅच हा पुरस्कार देण्यात आला.

आरसीबीच्या इतर गोलंदाजांनीही चांगली गोलंदाजी केली आणि आपल्या संघाला विजयी करत संघातील खेळाडूंसह चाहत्यांना जल्लोष करण्याची संधी निर्माण करून दिली. ऐतिहासिक विजेतेपद मिळवणाऱ्या आरसीबी संघाचे मनापासून अभिनंदन!



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

■ ■ ■



# दररोज करा या पानांचे सेवन

आपण आपल्या आहारात फळे आणि भाज्यांचा समावेश करतो, परंतु काही खास हिरव्या पानांचे महत्त्व दुर्लक्षित करतो. खरं तर, काही कच्ची पाने अशी असतात जी पोषक तत्वे, फायबर, अँटीऑक्सिडंट्स आणि डिटॉक्सिफायिंग गुणधर्मांनी समृद्ध असतात.

हे केवळ तुमची रोगप्रतिकारक शक्ती वाढवत नाहीत तर पचनापासून ते त्वचेच्या आरोग्यापर्यंत सर्वकाही सुधारतात. आरोग्यतज्ञांच्या मते, या हिरव्या पानांचा वापर शतकानुशतके भारतात आयुर्वेद आणि घरगुती उपचारांमध्ये केला जात आहे. तुळस असो, कढीपत्ता असो किंवा शेवग्याची पाने असो या सर्वांचे स्वतःचे फायदे आहेत. ते सॅलड, ज्यूसमध्ये किंवा थेट चावूनही खाऊ शकतात.

विशेष म्हणजे त्यांचे कोणतेही दुष्परिणाम नाहीत आणि ते नैसर्गिकरित्या शरीराला विषमुक्त करण्यास मदत करतात.

**तुळशीची पाने :** दररोज सकाळी रिकाम्या पोटी ४-५ तुळशीची पाने चावल्याने सर्दी, खोकला आणि घसा खवखवणे यासारख्या समस्या टाळता येतात. याशिवाय, यामुळे मानसिक आरोग्य तसेच पचन सुधारते.

**कढीपत्त्याची पाने :** कढीपत्ता केवळ चवीसाठीच चांगले नाही तर ते आरोग्यासाठीही उत्तम आहे. त्यात फायबर, लोह आणि व्हिटॅमिन सी असते जे पचनसंस्था मजबूत करते आणि रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवते. ते कच्चे चावणे किंवा रिकाम्या पोटी पाण्यासोबत घेणे खूप फायदेशीर आहे.

**शेवग्याची पाने :** शेवग्याची पाने किंवा मोरिंगा पाने हे पौष्टिकतेचा खजिना आहेत. त्यात प्रथिने, लोह, कॅल्शियम आणि व्हिटॅमिन ए असते जे शरीराला ऊर्जा देते, हाडे मजबूत करते आणि त्वचा चमकदार बनवते. तुम्ही ते सॅलडमध्ये खाऊ शकता किंवा ज्यूस बनवून पिऊ शकता.

**कोथिंबीर आणि पुदिना :** कोथिंबीर आणि पुदिना यासारख्या हिरव्या पानांमध्ये व्हिटॅमिन ए, सी आणि के असते जे त्वचेला उजळवते आणि पचन सुधारते. ते कच्चे खाल्ल्याने किंवा स्मूदीमध्ये मिसळल्याने शरीर ताजेतवाने आणि थंड होते. विशेषतः उन्हाळ्यात, ही पाने नैसर्गिक शीतलक म्हणून काम करतात.

**पालक :** पालकामध्ये लोह आणि फायबर भरपूर प्रमाणात असते, जे अशक्तपणा रोखते आणि पोट देखील स्वच्छ ठेवते. ते शरीराला आतून मजबूत करते आणि उर्जेची पातळी वाढवते.

■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### माझी माती..?

माझी माती माझा देश
वरीष्ठ पातळीवरून
कृतीत यायला पाहीजे
भाऊ हा संदेश ... !
तर हमखास - -
आम जनता आचरणात
आणेल हा -
अनमोल उपदेश ..!

कारण
जैसा देश वैसा भेष
यथा राजा तथा प्रजा
हा संसाराचा -
नियम आहे ना राजा . !

# पोलिसांनी बनावट कीटकनाशकच्या रॅकेटचा पर्दाफाश



**नागपूर, ६ जून :** बनावट कीटकनाशकांच्या रॅकेटमधील प्रमुख आरोपींपैकी राजू चेचानी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राजेंद्र चेचानी याला तेलंगणा पोलिसांनी एका कारवाईदरम्यान अटक केली. स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांच्या सहकार्याने केलेल्या या कारवाईत पोलिसांनी २ मे २०२५ रोजी राजस्थानातील चित्तोडगड जिल्ह्यातील बस्सी गावातील फार्महाऊसवरून राजू याला अटक केली.

या कारवाईमुळे भारतातील कृषी क्षेत्राला असलेला बनावट कीटकनाशकांचा वाढता धोका उघडकीस आला आहे. या अशा लोकांकडून बनावट कीटकनाशकांच्या माध्यमातून निष्पाप शेतकऱ्यांना वारंवार फसवले जाते. एकदम खऱ्या ब्रँडसारखी पॅक केलेली ही बनावट रसायने शेतीसाठी अत्यंत हानिकारक असतात. त्यांच्या वापरामुळे तसेच त्यातील घातक घटकांमुळे अनेकदा पिकांचे नुकसान होते आणि उत्पादनात घट होते. नुकत्याच झालेल्या या अटकेमुळे अशा प्रकाराला आळा बसेल अशी आशा व्यक्त होते आहे. अनेक राज्यांमध्ये पसरलेल्या बनावट कृषी रसायनांची ही पुरवठा साखळी तुटेल, अशी अपेक्षा आहे.

चेचानीवर आरोप आहे की, तो सात वर्षांहून अधिक काळ असा अवैध व्यवसाय आणि बेकायदेशीर नेटवर्क चालवत होता. ११ हून अधिक राज्यांमध्ये असलेल्या सहकाऱ्यांच्या माध्यमातून त्याने संपूर्ण भारतात बनावट कीटकनाशके तयार आणि वितरित केली. दिल्ली, हरियाणा, राजस्थान, पंजाब, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, गुजरात, तेलंगणा, आंध्र प्रदेश आणि कर्नाटक येथे कार्यरत असलेल्या सहकाऱ्यांच्या विस्तृत नेटवर्कद्वारे प्रतिष्ठित कृषी रसायन कंपन्यांचे लेबल लावलेली बनावट उत्पादने त्याने पुरवली.

प्राथमिक तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, बस्सी येथे चेचानीचे महेश्वरी सीड्स अँड पेस्टिसाइड्स नावाने एक दुकान आहे. नियमांचे उल्लंघन करत पॅकेजिंग मटेरियल आणि तयार बनावट उत्पादनांचा तो कथितरित्या प्रमुख पुरवठादार असल्याचे समजते.

हैदराबादमधील नियमबाह्य काम करणाऱ्या ई राजेशच्या गोदामात जुलै २०२४ मध्ये बनावट कीटकनाशके सापडल्यानंतर कीटकनाशक कायद्यांतर्गत एलबी नगर पोलीस ठाण्यात नोंदवलेल्या एफआयआर क्रमांक ८३१/२०२४ च्या आधारे ही अटक करण्यात आली आहे.

अधिक तपासात अन्य राज्यांमध्ये चेचानीविरुद्ध दाखल केलेले अनेक गुन्हे उघडकीस आले आहेत. यामुळे त्याच्या कारभाराची व्याप्ती आणि तसेच नियमबाह्य कामांमध्ये असलेला त्याचा समावेश अधोरेखित होतो आहे.

# एईएसएलला महाराष्ट्रात मिळाला १,६६० कोटींचा ट्रान्समिशन प्रकल्प

**गोंदिया, ६ जून :** भारतातील सर्वात मोठी खाजगी ट्रान्समिशन आणि वितरण करणारी कंपनी आणि जागतिक स्तरावर कार्यरत असलेल्या अदानी समूहाचा भाग असलेली अदानी एनर्जी सोल्युशन्स लिमिटेड (एईएसएलला), हिने महाराष्ट्रात १,६६० कोटींचा आंतरराज्यीय ट्रान्समिशन प्रकल्प मिळविला असल्याची माहिती आज दिली.

या प्रकल्पामध्ये ३,००० मेगा व्होल्ट-अँपिअर्स (एमव्हीए) क्षमतेचे सबस्टेशन्स आणि इतर संबंधित ट्रान्समिशन इंफ्रास्ट्रक्चर उभारण्याचा समावेश आहे. या प्रकल्पामुळे एईएसएलचं एकूण ट्रान्समिशन नेटवर्क २६,६९६ सर्किट किलोमीटर (सीकेएम) आणि ट्रान्सफॉर्मेशन क्षमतेसह ९३,२३६ एमव्हीएवर पोहोचेल. एईएसएल हा प्रकल्प जानेवारी २०२८ पर्यंत पूर्ण करणार आहे.



हा प्रकल्प विशेष उद्देशासाठी स्थापन करण्यात आलेल्या कंपनी (स्पेशल पर्पज वेहिकल - एसपीव्ही) डब्ल्यूआरएनईएस तळेगाव पावर ट्रान्समिशन लिमिटेड च्या अंतर्गत येतो. या प्रकल्पामुळे रायगड भागातील हायड्रो पंप्ड स्टोरेज प्रकल्पांमधून निर्माण होणारी १.५ गीगावॅट ग्रीन ऊर्जा मुंबई आणि आसपासच्या भागांमध्ये पोहोचवता येणार आहे. आज एईएसएलला या प्रकल्पाचे औपचारिक हस्तांतरण करण्यात आले.

हा आंतरराज्यीय ट्रान्समिशन प्रणाली (इंटर स्टेट ट्रान्समिशन सिस्टीम - आयएसटीएस) प्रकल्प टॅरिफ बेस्ड कॉम्पेटिटिव्ह बिडिंग (टीबीसीबी) यंत्रणेद्वारे जिंकण्यात आला असून, आरईसीपीडीसीएल(आरईसी पॉवर डेवलपमेंट अँड कंसल्टंसी लिमिटेड) या संस्थेने या निविदा प्रक्रियेचे समन्वयक म्हणून काम पाहिले.

या नवीन ऑर्डरमुळे एईएसएलच्या ट्रान्समिशन ऑर्डरबुकची एकूण किंमत आता सुमारे ६१,६०० कोटी झाली आहे. वेबसाइट सीएमएस कंटेंट अपडेटसाठी कृपया अदानी सर्विसनाउ पोर्टल (https://adani.service-now.com) वर तिकीट उघडा.

## जागतिक पर्यावरण दिनी प्लास्टिक कचरा आणि पर्यावरणीय जबाबदारीबद्दल जनजागृती करत आहेत झी टीव्ही वरील कलाकार!

**मुंबई, ६ जून :** जागतिक पर्यावरण दिन २०२५ हा 'प्लास्टिक प्रदूषण संपवणे' या अत्यंत महत्त्वाच्या संकल्पनेसह साजरा करण्यासाठी अख्खे जग एकत्र येत असताना झी टीव्हीवरील लोकप्रिय कलाकार केवळ त्याबद्दल चिंता व्यक्त करत नाहीयेत, तर त्यांच्या दैनंदिन जीवनात त्यांनी केलेल्या सजग बदलही शेअर करत आहेत. झी टीव्हीवरील जमाई नं. १ मधील सिमरन कौर, भाग्य लक्ष्मी मधील ऐश्वर्या खरे, कुमकुम भाग्य मधील शक्ती आनंद, सरु मधील मोहक मटकर, वसुधा मधील सचिन पारिख आणि जागृति एक नयी सुबह मधील आर्य बब्बर हे कलाकार प्लास्टिक कचऱ्यावर आणि पर्यावरणीय जबाबदारीवर अर्थपूर्ण चर्चा घडवून आणत आहेत. त्यांच्या ऑन-स्क्रीन अभिनयाबरोबरच त्यांच्या ऑफ-स्क्रीन प्रभावामुळे, या कलाकारांच्या मते बदलाची खरी सुरुवात ही वैयक्तिक जबाबदारीने होते. पुन्हा वापरता येणारी पाण्याची बाटली वापरणे असो किंवा सेटवर अधिक शाश्वत पर्याय निवडण्यासाठी इतरांना प्रेरित करणे असो, त्यांच्या कृती आपल्याला आठवण करून देतात की खरा प्रभाव छोटी, पण सातत्यपूर्ण पावले उचलण्यातून येतो.

जमाई नं. १ मध्ये रिद्धीची भूमिका साकारत असलेली सिमरन कौर म्हणाली, जागतिक पर्यावरण दिन मला नेहमीच क्षणभर थांबून विचार करण्यास प्रवृत्त करतो. पण यंदा 'प्लास्टिक प्रदूषण संपवणे' ही संकल्पना मला खूपच वैयक्तिक स्तरावरील वाटत आहे. लहानपणी समुद्रकिनाऱ्यावर चालत असताना शंख-शिंपले गोळा करताना, पायांवर फेसाळणाऱ्या लाटा जाणवत घेणे, त्या आठवणी आजही जिवंत आहेत. पण आज त्याच किनाऱ्यावर प्लास्टिक कचऱ्याचे ढीग दिसतात. ही स्थिती फारच दुःखद आहे. मी माझ्या जीवनशैलीत छोट्या पण सजग सवयी अंगीकारल्या स्वतःची पाण्याची बाटली बाळगणे, प्लास्टिक स्ट्रॉ आणि पिशव्यांचा वापर न करणे तसेच शाश्वत पॅकेजिंग निवडणे. सेटवरही मी प्लास्टिक-मुक्त पर्याय मागते.

भाग्य लक्ष्मी मध्ये लक्ष्मीची भूमिका साकारणारी ऐश्वर्या खरे म्हणाली, प्लास्टिक सर्वत्र आहे आपल्या घरात, समुद्रात आणि अगदी आपण श्वास घेतो त्या हवेतसुद्धा. काही वर्षांपूर्वी एका समुद्रकिनाऱ्याच्या स्वच्छतेच्या मोहिमेत भाग घेतला आणि तिथे एक कासव प्लास्टिकच्या तुकड्यांमध्ये अडकलेले पाहिले ते माझ्या डोळ्यांसमोर अजूनही आहे. तेव्हापासून मी प्लास्टिकचा वापर कमी करण्याचा निश्चय केला. मी कायम माझा री-यूजेबल किट मेटल कटलरी, स्टील स्ट्रॉ आणि फोल्ड होणारा कप बाळगते. हे आता माझ्या जीवनशैलीचा भाग झालंय. मी पॅकबंद स्नॅक्स टाळते आणि प्रवासासाठी भरपूर पाणी सोबत घेते.

कुमकुम भाग्य मध्ये करणची भूमिका साकारणारा शक्ती आनंद म्हणाला, एक अभिनेता म्हणून माझा वेळ सतत प्रवासात जातो शूटिंग, इव्हेंट्स, प्रवास आणि तेव्हा लक्षात येते की सिंगल-यूज प्लास्टिक किती सहज आपल्या जीवनात शिरले आहे. जेव्हा आपण सजग होतो, तेव्हाच त्याचे अस्तित्व जाणवते. या जागतिक पर्यावरण दिनी मी माझा प्लास्टिकचा वापर कमी करण्याचा संकल्प केला आहे. आता मी माझी पाण्याची बाटली, स्वतःची कटलरी आणि मेटल स्ट्रॉ बाळगतो, आणि कापडी पिशवीसुद्धा नेहमी सोबत ठेवतो. सेटवर मी इतरांना शाश्वत पर्याय निवडण्यासाठी प्रोत्साहित करतो.

जागृति एक नयी सुबह मध्ये कलिकांत ठाकूरची भूमिका साकारणारा आर्य बब्बर म्हणाला, मागच्या वर्षी एका ट्रेक दरम्यान जेव्हा मी एका डोंगरशिखरावर पोहोचलो, तेव्हा तिथे असावी तशी निर्मळ हवा आणि नैसर्गिक सौंदर्य नसून, प्लास्टिकच्या पिशव्या आणि बाटल्यांनी भरलेली जमीन पाहून धक्का बसला. त्या गोष्टीने माझ्यावर खोल प्रभाव टाकला. तेव्हापासून मी सिंगल-यूज प्लास्टिकला पूर्णपणे निरोप दिला. प्लास्टिकच्या बाटल्या, पिशव्या, स्ट्रॉ काहीही वापरत नाही. घरी मी कंपोस्ट होणारे कचरा पिशव्या वापरतो, आणि प्रवासात प्लास्टिकच्या बाटल्यांऐवजी सॉलिड शॅम्पू बार वापरतो. आयुष्य एकदम बदलणं कठीण आहे, पण विचारपूर्वक निवडी करणे शक्य आहे.

## डीएसपी म्युच्युअल फंडातर्फे आयटी आणि आरोग्यसेवा क्षेत्रांवर आधारित इंडेक्स फंड योजना सादर

**नागपूर, ६ जून :** डीएसपी म्युच्यूअल फंडाने डीएसपी निफ्टी आयटी इंडेक्स आणि डिएसपी निफ्टी हेल्थकेअर इंडेक्स फंड हे दोन नवीन फंड गुंतवणूकदारांसाठी आणले आहेत. व्यापक स्वरुपातील शेअरबाजाराच्या तुलनेत लवचिकतेसाठी ओळखल्या जाणाऱ्या क्षेत्रांमध्ये सहभागी होण्यासाठी गुंतवणूकदारांना मार्ग प्रदान करणे, हे या फंडांचे उद्दिष्ट आहे.

माहिती तंत्रज्ञान (आयटी) आणि आरोग्यसेवा (हेल्थकेअर) यासारख्या बचावात्मक क्षेत्रांनी ऐतिहासिकदृष्ट्या व्यापक शेअर बाजाराच्या तुलनेत अल्पबीटा दर्शविला आहे. याचाच अर्थ बाजारात मंदी असताना अथवा आर्थिक संकटे किंवा भू-राजकीय घटनांचा या दोन क्षेत्रांवर अत्यल्प परिणाम झालेला आहे. उदाहरणार्थ, जागतिक वित्तीय संकट (जानेवारी - ऑक्टोबर २००८) आणि कोविड-१९ साथीच्या काळात (जानेवारी - मार्च २०२०), निफ्टी हेल्थकेअर आणि निफ्टी आयटी निर्देशांकांत माफक घसरण झाली आणि त्यांनी वेगाने उसळी मारत व्यापक निफ्टी ०० निर्देशांकाच्या तुलनेत जोरदार कामगिरी बजावलेली आहे.

डीएसपी म्युच्युअल फंडचे सीएफए आणि पॅसिव्ह इन्व्हेस्टमेंट्स अँड प्रोडक्ट्सचे प्रमुख अनिल घेलानी नवीन फंडांच्या शुभारंभप्रसंगी बोलताना म्हणाले, डीएसपी निफ्टी आयटी इंडेक्स फंड आणि डीएसपी निफ्टी हेल्थकेअर इंडेक्स फंड योजनांमुळे गुंतवणूकदारांना वाढ तसेच लवचिकता एकत्रित करणाऱ्या क्षेत्रांमध्ये सहभागी होण्यासाठी संतुलित दृष्टिकोन प्रदान होतो. सध्याच्या अनिश्चित बाजार वातावरणात आयटी आणि हेल्थकेअर सारख्या संरक्षणात्मक क्षेत्रांमध्ये कमी घसरण झालेली आहे. त्यामुळे या क्षेत्रांत आकर्षक परतावा प्रदान करण्याची क्षमता आहे.

डीएसपी म्युच्यूअल फंडाच्या पॅसिव्ह फंड विभागाचे बिझनेस हेड गुरजीत कालरा याप्रसंगी टिप्पणी करताना म्हणाले, माहिती तंत्रज्ञान आणि आरोग्यसेवा यासारख्या कमी-बीटा क्षेत्रांचा आपल्या गुंतवणूकीत धोरणात्मक समावेश करून, गुंतवणूकदार अधिक लवचिक आणि कार्यक्षम पोर्टफोलिओ तयार करू शकतात. त्यामुळे त्यांना परतावा वाढण्यास त्याचबरोबर शेअरबाजारातील जोखीम प्रभावीपणे व्यवस्थापित करण्यास मदत होऊ शकते. सध्या व्यापक निर्देशांकांमध्ये बचावात्मक क्षेत्रांचे प्रतिनिधित्व कमी झालेले आहे. निर्देशांकात कमी मूल्य असलेली आयटी आणि आरोग्यसेवेसारखी क्षेत्रे पुढील वर्षात शेअरबाजारापेक्षा चांगली कामगिरी करतात, हे इतिहास दर्शवितो. आमचा शिस्तबध्द अप्रत्यक्ष गुंतवणूक व्यवस्थापन दृष्टिकोनाचा उद्देश या क्षेत्रांचा अतिशय बारकाईने मागोवा घेणे हा आहे. त्यामुळे कमी अस्थिरता राखताना संरचनात्मक वाढ मिळवण्यास गुंतवणूकदारांना मदत होते.

## टोयोटा किर्लोस्कर मोटरने सस्टेनेबल रिसोर्स मॅनेजमेंट ड्राईव्ह या थीमखाली एन्व्हायर्नमेंट मंथ २०२५ ची सुरुवात केली

**बेंगळुरू, ६ जून :** टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने आज एन्व्हायर्नमेंट मंथ २०२५ अर्थात पर्यावरण महिना ची सुरुवात केली असून, सस्टेनेबल रिसोर्स मॅनेजमेंट ड्राईव्ह या थीमच्या माध्यमातून टिकावूपणा (सस्टेनेबिलिटी) या दिशेने आपली वचनबद्धता पुन्हा अधोरेखित केली आहे. हा उपक्रम टोयोटा एन्व्हायर्नमेंटल चॅलेंज २०५० आणि ग्लोबल थीम इन्हानसिंग अवेयरनेस टूवर्ड्स रियलायजिंग टोयोटा ग्लोबल व्हिजन २०५० सोबत सुसंगत आहे. या मोहिमेचा उद्देश कंपनी आणि तिच्या मूल्यसाखळीत (व्हॅल्यू चेन) शाश्वततेची संस्कृती(सस्टेनेबिलिटी कल्चर) अधिक बळकट करणे आहे. यावर्षीचा एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे झिरो-बेस थिंकिंग या धोरणाचा अवलंब ज्यामध्ये सर्व संसाधनांचे मूल्यमापन नव्याने करून, केवळ खरे मूल्य निर्माण करणारीच संसाधने कायम ठेवली जातात. यामुळे रिफ्युज, रिसायकल (सर्क्युलर इकॉनॉमी), रियूज आणि रिड्यूस (4R) यामार्गे दीर्घकालीन टिकाऊ कार्यक्षमतेला चालना मिळते.

प्रत्येक वर्षी जून महिन्यात साजरा केला जाणारा टोयोटाचा ग्लोबल एन्व्हायर्नमेंट मंथ महत्त्वाच्या पर्यावरणीय समस्यांवर कृती करण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून काम करतो. २०२५ मधील आवृत्ती ही जनजागृती आणि सहभाग वाढवण्याच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांवर आधारित आहे, शिवाय भारतात टीकेएमच्या २५ वर्षांच्या यशस्वी प्रवासाचा टप्पाही साजरा केला जात आहे. यंदाचा थीम आहे जर्नी टू ग्रीन @25 जी त्यांच्या प्रमुख पर्यावरणीय कामगिरीचे प्रतिनिधित्व करते.

या प्रसंगी टीकेएमचे एक्झिक्युटिव्ह व्हाइस प्रेसिडेंट व डायरेक्टर-मॅन्युफॅक्चरिंग, बी. पद्मनाभा म्हणाले, टीकेएममध्ये पर्यावरण संवर्धन ही केवळ कॉर्पोरेट धोरणाचा भाग नसून, ती आमच्या कामकाजात खोलवर रुजलेली मूल्य आहे. पर्यावरण महिना हा केवळ कॅलेंडरवर येणारा कार्यक्रम नसून, आपल्या मूल्यसाखळीतील प्रत्येक व्यक्तीला हरित भविष्यासाठी कृती करण्यास प्रवृत्त करणारे आवाहन आहे. झिरो-बेस थिंकिंग आम्हाला केवळ लहान सुधारणा न करता कायमस्वरूपी प्रभाव निर्माण करणारे परिवर्तनात्मक उपाय स्वीकारण्यास प्रवृत्त करते. प्रत्येक उपक्रम केवळ भागधारकांना सहभागी करून घेत नाही तर शाश्वत जीवनशैली आणि हरित नवकल्पनांची सखोल समज पुरवतो.

## अदानी एअरपोर्ट्सकडून पुढील टप्प्याच्या वाढीसाठी ७५० दशलक्ष डॉलर्सचा जागतिक वित्तपुरवठा सुनिश्चित

**अहमदाबाद, ६ जून :** भारतातील सर्वात मोठा खासगी विमानतळ संचालक (एअरपोर्ट ऑपरेटर) आणि अदानी एंटरप्रायझेस लिमिटेडचा उपघटक असलेल्या अदानी एअरपोर्ट्स होल्डिंग्स लिमिटेड (एएएचएल) ने आंतरराष्ट्रीय बँकांच्या गटाकडून एक्सटर्नल कमर्शियल बोरोविंग्स (ईसीबी) च्या माध्यमातून ७५० दशलक्ष डॉलर्स उभारले आहेत. या व्यवहाराचे नेतृत्व फर्स्ट अबू धाबी बँक, बार्कलेज पीएलसी आणि स्टँडर्ड चार्टर्ड बँक यांनी केले.

या निधीचा वापर विद्यमान कर्जाच्या पुनर्वित्तासाठी, पायाभूत सुविधांच्या सुधारणेसाठी आणि सहा विमानतळांच्या (अहमदाबाद, लखनऊ, मंगलुरू, जयपूर, गुवाहाटी आणि तिरुअनंतपुरम) क्षमतेच्या वाढीसाठी केला जाणार आहे. तसेच, संपूर्ण विमानतळ नेटवर्कवर नॉन-एरोनॉटिकल व्यवसाय जसे की रिटेल, एफ अँड बी (फूड अँड बेव्हरेज), ड्युटी फ्री आणि इतर सेवा यांचा विस्तारही यातून करण्यात येईल.

एएएचएल ने वित्तीय वर्ष २०२४२५ मध्ये ९४ दशलक्ष प्रवाशांची सेवा केली असून सध्या त्यांची एकूण क्षमता ११० दशलक्ष प्रवाशी इतकी आहे. २०४० पर्यंत ही क्षमता टप्प्याटप्प्याने वाढवून ३०० दशलक्ष प्रवाशी प्रतिवर्ष करण्याचं उद्दिष्ट आहे. या योजनेचा भाग म्हणून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ लवकरच कार्यान्वित होणार असून, पहिला टप्पा २० दशलक्ष प्रवाशांच्या क्षमतेसह सुरु होईल आणि पुढील टप्प्यांमध्ये ती क्षमता वाढवून ९० दशलक्षपर्यंत नेण्यात येईल, ज्यामुळे मुंबई परिसरातील विमान सेवा पायाभूत सुविधा लक्षणीयरित्या वाढणार आहेत.

एएएचएलचे मुख्य कार्यकारी अधिकारी अरुण बंसल म्हणाले, जागतिक वित्तीय संस्थांनी दाखवलेला विश्वास हे भारताच्या विमानतळ पायाभूत सुविधांच्या दीर्घकालीन मूल्य आणि क्षमतेचं प्रतीक आहे. एएएचएलने आपल्या संपूर्ण विमानतळ नेटवर्कवर टेक्नॉलॉजीचा वापर करत ग्राहकांना अनन्यसाधारण अनुभव देण्यासाठी शाश्वततेला आणि स्थानिक समाजाशी जुळवून घेण्याला प्राधान्य देत आपली वाटचाल करत आहे. आमचा प्रवास सुरूच आहे आणि गेटवे टू गुडनेस म्हणून आम्ही ग्राहककेंद्रित उपाय देण्यास आणि सेवा व शाश्वततेमध्ये जागतिक स्तरावर उदाहरण ठरतील अशा दर्जेदार पायाभूत सुविधा निर्माण करण्यास कटिबद्ध आहोत.

या व्यवहारासाठी इंग्लिश लॉ कॉंसिल(कायदेशीर सल्लागार) म्हणून लॅथम अँड वॉटकिंस एलएलपी आणि लिंकलेटर्स एलएलपी यांनी काम केलं, तर इंडियन लॉ कॉन्सिल म्हणून सिरील अमरचंद मंगलदास आणि टीटी अँड ए कार्यरत होते.

## पुष्पा इम्पॉसिबलमध्ये कायद्याच्या प्रवेश परीक्षेची तयारी करणाऱ्या पुष्पाच्या स्वप्नामध्ये संदेहाचे विघ्न



**मुंबई, ६ जून :** सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत चिकाटी, हिंमत आणि दुसरी संधी यांचे महत्त्व सांगणाऱ्या कथानकाने प्रेक्षकांना खिळवून ठेवले आहे. प्रेक्षकांनी पाहिले की, पुष्पा (करुणा पांडे) अखेरीस कायदा शिकण्याचा आपला नवा ध्यास पूर्ण करण्याचे ठरवते. पण, नेहमीप्रमाणे तिच्या प्रवासातील पावलागणिक तिच्या समोर भावनिक, वैयक्तिक आणि नैतिक आव्हाने उभी राहतात.

पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत पुष्पाची भूमिका जिवंत करणारी अभिनेत्री करुणा पांडे म्हणते, हे कथानक पुष्पाच्या जीवनातील एक महत्त्वाचा टर्निंग पॉइंट आहे. कायदा शिकणे ही केवळ तिची महत्त्वाकांक्षा नाही, तर स्वतःचा आवाज शोधण्याचा आणि सत्याच्या बाजूने उभे राहण्याचा तिचा हा प्रयत्न आहे. हा भावनिक प्रवास साकारताना मी आनंद अनुभवत आहे कारण यामधून पुष्पाचे खरे रूप व्यक्त होते निडर, प्रामाणिक आणि नवीन शिकण्यासाठी सदैव तयार- मग तिचे वय आणि परिस्थिती काहीही असो. परीक्षेच्या पेपर चोरीच्या घटनेत तिच्या सचोटीची परीक्षा होते. सोपा मार्ग न स्वीकारता सत्याचा मार्ग स्वीकारण्याच्या तिच्या निवडीमुळेच ही गोष्ट नेहमी प्रभावी होते.

## जमाई नं.१ साठीच्या एका वनटेक भावनिक दृश्यामध्ये सिमरन कौरला कोसळले रडू




**मुंबई, ६ जून :** झी टीव्हीवरील लोकप्रिय नाट्य जमाई नं.१ आपल्या हायव्होल्टेज कथानक आणि भावनिकदृष्ट्या भरलेल्या क्षणांसह प्रेक्षकांचे मनोरंजन करत आहे. आता एका नवीन ट्विस्टमध्ये हे कथानक आणखी एक नाट्यमय वळण घेत असून नील (अभिषेक मलिक) ला सायली (सोनल वेंगुर्लेकर) ने दाखल केलेल्या धक्कादायक छेडछाडीच्या गुन्ह्यासाठी चुकून अटक करण्यात येते. त्या सगळ्या गोंधळात नीलच्या समर्पित पत्नी रिद्धीची भूमिका करणाऱ्या सिमरन कौरने आपल्या पतीचा निरागसपणा सिद्ध करण्यासाठी आणि सत्य उघडकीस आणण्यासाठी अतिशय शक्तीशाली आणि हृदय पिळवटून टाकणारा अभिनय केला.

ह्या दृश्याला सिमरनच्या वास्तविक भावुकपणाने खरोखरीच वेगळे बनवले. आपल्या प्रेमासाठी उभ्या असलेल्या स्त्री चा असहाय्यपणा, क्रोध आणि अगतिकता दर्शवण्यासाठी सिमरनने आपल्या भावविश्वात खोल उडी मारली. हे भावनिक दृश्य केवळ एका टेकमध्ये चित्रीत करण्यात आले. अशा प्रकारच्या दृश्यासाठी ही दुर्मिळच गोष्ट आहे कारण अशा दृश्यांसाठी प्रचंड असुरक्षिततेची भावना आणि भावनिक खोलीची गरज भासते. अभिनयासाठी आपल्या मेथॉडिकल दृष्टीकोनासाठी मानल्या जाणाऱ्या सिमरनने एकांतात तयारी केली आणि आपल्या व्यक्तिरेखेच्या भावनिक द्वंद्वाला जाणून घेण्यासाठी स्वतःला एका खोलीत डांबून घेतले आणि ह्या दृश्याबद्दल खोलात जाऊन विचार केला.

सिमरन म्हणाली, ज्याक्षणी मी कथानक वाचले, मला ठाऊक होते की हे दृश्य आव्हानात्मक आणि तरीही खास असणार आहे. मला त्याचा केवळ अभिनय करायचा नव्हता. माझ्या व्यक्तिरेखेला काय वाटत असेल हे मला जाणून घ्यायचे होते. ते सोपे नव्हते. दृश्याचे चित्रीकरण करण्याआधी मी स्वतःला खोलीत डांबून घेतले, माझी स्क्रिप्ट वाचली, शांतपणे बसले आणि स्वतःला परिस्थितीचे गांभीर्य समजून घेऊ दिले. आपले ज्या व्यक्तीवर प्रेम आहे त्यावर अशा प्रकारचा भयंकर गुन्हा दाखल केल्यानंतर आपल्याला कसे वाटेल हे मी जाणून घेतले. त्या परिस्थितीवर आपले काहीच नियंत्रण असू शकत नाही. तेव्हाच भावनिकदृष्ट्या मला उध्वस्त झाल्यासारखे वाटले आणि मी त्या दृश्यामध्ये स्वतःला वाहून घेतले. मला आनंद आहे की टीमने केवळ एका टेकमध्ये ते दृश्य छान टिपले. एक कलाकार म्हणून अशा प्रकारचे क्षण तुमच्या मर्यादांची परीक्षा घेतात आणि तुम्हांला प्रचंड समाधानही प्रदान करतात.

सिमरनच्या जबरदस्त अभिनयाने जमाई नं.१ मध्ये सच्चाईचा आणखी एक स्तर आणला त्यामुळे ही मालिका प्रेक्षकांनी आता पाहायलाच हवी. आगामी भागांमध्ये हे पाहणे प्रेक्षकांसाठी रोचक ठरेल की नीलच्या नावावरील हा डाग पुसण्यासाठी रिद्धी कशी लढेल. सत्य उघडकीस आणण्यामध्ये ती यशस्वी होईल की सायली आणि कांचन (पापिया सेनगुप्ता) ह्या या जोडीमध्ये दरी निर्माण करण्यात यशस्वी होतील?

## शब्दकोडे क्रमांक २१३०




**आडवे शब्द :-**
१) शोभिवंत
५) हाडवैरी, फार जुना आणि मोठा शत्रू
९) चंद्र
१२) हात
१३) फाजील, बडबडी, लोचट स्त्री
१६) आत्तापर्यंत
१८) मृत्युदेवता
१९) सुटकेचा मार्ग
२१) नातेवाईक
२२) एक जुनी लेखणी प्रकार
२४) दादला
२६) समतल
२८) हाट, मंडई
३०) संन्यासाचे निवासस्थान
३१) शक्यता
३२) डोंगराचा तुटलेला उभा कडा
३४) प्रभात
३६) सातू
३७) अंतःकरण
३८) मज्जाव
३९) सैन्याचा मुक्काम, बूड
४०) फिकीर, काळजी
४२) गोलमटोल
४५) हिंदुंचे दोन महानग्रंथ
४९) लापशी, क्षीर
५१) थाटमाट, छानदारपणा
५२) सवय, अभ्यास,
५३) देवाशी केलेला करार
५४) माफ
५५) चौक
५७) सैन्याचा मालपुरवठा
५९) शपथ
६०) फळांच्या रसाचे पेय
६२) स्वतःबद्दल कमीपणाची भावना
६५) घाण
६६) सरहद्द
६७) वर्ष, साल
६८) ठोकाठोकी, हाणामारी
७०) वजन
७२) नोकरी
७३) कावळा
७५) रविवासर
७६) मसाल्यातील एक पदार्थ
७७) कर्ज देणारा

**उभे शब्द :-**
१) प्रशाला
२) निकट
३) पालखी, मेणा
४) मालक
५) संगत
६) आगबोट
७) नोकर,
८) शत्रुत्व
१०) जनाबाई
११) खोडकर, दुष्ट, खट्याळ
१४) अति परिश्रमामुळे अंगातून येणारा घाम
१५) कहाणीतील ऐसपैस गाव
१६) छाती
१७) सनई, चौघडा वगैरे ठेवण्याची बंदिस्त जागा
१९) हार
२०) गंध
२१) शिक्षा
२३) पंकज
२५) पहिला ऋतू
२७) एकाग्र नजर
२८) किंचित वक्रता
२९) हस-या चेहऱ्याचा
३३) दरवेश, फकिरांचा एक पंथ
३५) मृत्यू, वेळ
३६) सामान
३८) अभिप्राय
४०) लोकनाट्य
४१) अंगावर येणारा काटा
४३) रत्न
४४) पद्धतशीर
४६) चर्चा
४७) निष्ठूर, भावना नसलेला
४८) भूदल
५०) राखणदार
५६) कर्णेंद्रिय
५८) युद्ध
५९) सारख्या वजनाचे
६०) बातमी
६१) मुस्लीमांचा एक सण
६३) एक ज्वालाग्रही खनिज पदार्थ
६४) भीती
६७) फुरसत
६९) मनुष्य
७१) सूर्याचे एक नाव
७३) आजच्या आधीचा दिवस
७४) चोरी करणारा

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



## आज का अंदाज

शनिवार ७ जून २०२५

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ४ | ६ | ९ | २ | ६ | ७ | ८ |
| १२० | ११२ | १२३ | १३५ | ११० | १५० | ११५ | १२५ |
| २५६ | २५७ | २२२ | ३८८ | २०० | ४५७ | २५० | २६० |
| ३४६ | ३५६ | ३३० | ४५० | ५७० | ५५६ | ५५७ | ४५७ |
| ३४ | ४२ | ६३ | ९३ | २१ | ६२ | ७३ | ८२ |
| ३६ | ४५ | ६५ | ९४ | २६ | ६३ | ७४ | ८४ |
| ३० | ४८ | ६८ | ९८ | २९ | ६० | ७० | ८० |

**७ जून : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| ३२ | ४१ | ६३ | ८३ |
| ३४ | ४६ | ६४ | ८५ |
| ३९ | ४० | ६८ | ८७ |

**अपर मुख्य सचिव तथा विशेष कार्य अधिकारी (अ.व रि.), महसूल व वन विभाग, मुख्य इमारत, पहिला मजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**

**क्र.अपिल-२०२३/प्र.क्र.२९७/ज-८, प्र.क्र.३६४ (०८/२०२४/अवपु**

**अर्जदार :- मो. शकील वल्द मो. सुलेमान शा व इतर**

विरुध्द

**गैरअर्जदार :- उपसंचालक भूमी अभिलेख, नागपूर प्रदेश, नागपूर व इतर**

दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ कलम २० नुसार पक्षकार पर्यायी मार्गाचे अवलंब गैरअर्जदार- **श्रीमती शाहीस्ता जवजे प्यारे साहेब, १) रा.पवन नगर कामठी कलमना रोड मस्जिद नागपूर २) रा. लाल शाळा जवळ, मेहबूबशा तकीया, मोमीनपूरा, नागपूर** उक्त नमूद पक्षकार सुनावणी वेळी हजर झाले नाही, नमूद पत्यावर राहत नसल्याने किंवा अपूर्ण पत्तामुळे नोटीस परत आली. म्हणून वर्तमान पत्राद्वारे सुनावनी नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे.

ऊक्त अपिल प्रकणात मुंबई मंत्रालय येथे नमूद अधिकारी यांचे कार्यालया मध्ये दिनांक २४/०६/२०२५ रोजी सुनावणी ठेवली आहे.ऊक्त नमूद पक्षकाराने सुनावेळी दस्तावेज (ओळखपत्र) सह उपस्थित राहवे.अन्यथा आपले काहीही मनने नाही असे समजून पुढील प्रक्रिया कार्यान्वित करण्यात येईल.याची नोद घ्यावी.

**(संतोष कुमार)**
**अप्पर मुख्य सचिव तथा वि.का.अ.**
**(अ.व.रि.)**

## राशीभविष्य

**मेष :** कार्यक्षेत्रात नवीन भागीदार मिळतील.वाहन खरेदी करण्याची योजना यशस्वी होईल. आज कामाच्या ठिकाणी चढ-उतार येतील. कामाच्या ठिकाणी अनावश्यक वाद होऊ शकतात.

**वृषभ :** घाईघाईत पैसे गुंतवू नका. मालमत्तेशी संबंधित खरेदी-विक्रीसाठी तुम्हाला धावपळ करावी लागेल. महत्वाचं काम पूर्ण होण्याची शक्यता आहे. आज तुम्हाला आरोग्याच्या किरकोळ समस्या सतावतील.

**मिथुन :** आजचा दिवस तुमच्यासाठी आनंददायी, फायदेशीर आणि प्रगतीशील असेल. कोणतेही महत्त्वाचे काम पूर्ण होईपर्यंत ते उघड करू नका. अन्यथा, काम बिघडू शकते. तुमच्या भावनांना सकारात्मक दिशा द्या.

**कर्क :** तुम्हाला काही अनावश्यक कामासाठी प्रवास करावा लागू शकतो. मन इकडे-तिकडे भटकत राहील. स्वत:वर विश्वास ठेवा. आज तब्येत थोडी नरम असेल. आरोग्याशी संबंधित समस्या उद्भवू शकतात.

**सिंह :** व्यवसायात अनावश्यक अडथळ्यांमुळे तुम्ही अस्वस्थ व्हाल. आज बराच संघर्ष करावा लागेल. आज घराबाबत काही समस्या जाणवू शकते. आज आर्थिक बाबींमध्ये विचार करून निर्णय घ्या.

**कन्या :** आज तुम्हाला छान बातमी मिळू शकेल. नातेवाईक आणि जवळच्या मित्रांच्या मदतीने कामाच्या क्षेत्रातील अडचणी कमी होतील. समाजातील उच्चपदस्थ लोकांशी संपर्क वाढतील.

**तुळ :** कुटुंबात तणाव निर्माण होऊ शकतो. राग आणि कठोर शब्दांवर नियंत्रण ठेवावे. अन्यथा भांडणे गंभीर वळण घेऊ शकतात. तुम्हाला नोकरीच्या संधी मिळतील. तुमची दिनचर्या शिस्तबद्ध ठेवा.

**वृश्चिक :** तुमच्या कामाच्या पद्धतीत सकारात्मक बदल करण्याचा प्रयत्न करा. निरुपयोगी वादात अडकू नका. तुम्हाला परीक्षा किंवा स्पर्धेशी संबंधित काम, अभ्यास करण्याची इच्छा होणार नाही.

**धनु :** आज वाहन सुविधा वाढतील. व्यवसायाचा विस्तार होईल. नोकरीचा शोध पूर्ण होईल. सरकारी प्रशासनाच्या मदतीने कोणत्याही महत्त्वाच्या कामातील अडथळे दूर होतील.

**मकर :** तुमच्या खाण्यापिण्याच्या सवयींवर नियंत्रण ठेवा. आज तुमचे आरोग्य चांगले राहील. आरोग्याशी संबंधित कोणत्याही समस्या येण्याची शक्यता कमी असेल. खाण्यापिण्याच्या बाबतीत संयम बाळगा.

**कुंभ :** आज तुम्हाला जवळचा मित्र भेटू शकतो. कोणतेही प्रलंबित काम पूर्ण होऊ शकते. न्यायालयीन प्रकरणांमध्ये वेळेवर काम करा. तुरुंगात असलेल्या लोकांना तुरुंगातून सुटका मिळू शकते.

**मीन :** शारीरिक आरोग्याकडे अधिक लक्ष देण्याची आवश्यकता असेल. आज तुम्हाला जुन्या कर्जातून दिलासा मिळेल. व्यवसायात उत्पन्न चांगले राहील. पैशाअभावी प्रलंबित काम पूर्ण होईल.

# भायखळा कारागृहाच्या पुनर्विकासालाही गती देणार - गृह राज्यमंत्री योगेश कदम

मुंबई, दि. ६ प्रतिनिधी

मुंबईतील आर्थर रोड कारागृहाचा पुनर्विकास करण्यासाठी नव्या संकल्पनेतून ग्रीन एनर्जीचा वापर, सुरक्षेची काटेकोर यंत्रणा, तसेच सर्व कैद्यांसाठी स्वतंत्र कोठड्या असलेले बहुमजली आधुनिक कारागृह उभारण्यात यावे, असे निर्देश गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी आज मंत्रालयात दिले. पुनर्विकासासाठी महापालिकेकडून वाढीव चटई निर्देशांक (FSI) बाबत नियम शिथील करून प्रस्ताव सादर करण्याचेही निर्देश त्यांनी यावेळी दिले.

राज्यमंत्री कदम यांच्या अध्यक्षतेखाली आर्थर रोड कारागृहाच्या पुनर्विकासासाठी आयोजित बैठकीत गृह विभागाच्या प्रधान सचिव राधिका रस्तोगी, पोलीस गृहनिर्माण महामंडळाच्या डीजी आणि एमडी अर्चना त्यागी, सहसचिव धपाटे, तसेच नगर विकास व कारागृह प्रशासनाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

कदम यांनी स्पष्ट केले की, नवीन कारागृह आराखडा सादर करताना जागतिक दर्जाच्या सुरक्षा उपाययोजना व जागतिक मॉडेल्सचा अभ्यास अनिवार्य आहे. यात पुरुष, महिला, तृतीयपंथी, न्यायाधीन आणि शिक्षा भोगणाऱ्या कैद्यांसाठी स्वतंत्र व सुरक्षित कोठड्यांचा समावेश असावा. आर्थर रोडप्रमाणेच भायखळा कारागृहासाठीही स्वतंत्र पुनर्विकास आराखडा तयार करण्यात यावा, असेही निर्देश त्यांनी यावेळी दिले.

राज्यमंत्री कदम यांनी भविष्यातील गरज लक्षात घेता मानखुर्द येथे प्रस्तावित २२ एकर जागेची पाहणी करून त्या जागेवर कारागृहासाठी आरक्षण ठेवण्याची कार्यवाही तातडीने करण्यात यावी, असे स्पष्ट आदेश दिले. या संपूर्ण पुनर्विकास प्रक्रियेमुळे राज्यातील कारागृह व्यवस्थापन अधिक सुरक्षित, आधुनिक आणि पर्यावरणपूरक होण्याची दिशा निश्चित झाली आहे.

# महाराष्ट्राचा इतिहास गौरवाच्या गुलालाने माखला असला; तरी गद्दारीच्या शेणाने तो माखलेला आहे - इतिहासकार डॉ. विश्वास पाटील

मुंबई दि. ६ प्रतिनिधी

इतिहासाचे जुने संदर्भ सांगितल्यावर वाद होतात. मात्र, जुने संदर्भ मृदंड नाहीत. हे संदर्भ स्फूर्तीच्या झळाका आहेत. त्याचा इतिहास नव्या पिढीला खुणावतो आहे. महाराष्ट्राचा इतिहास गौरवाच्या गुलालाने माखला असला; तरी गद्दारीच्या शेणाने तो माखलेला असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ लेखक, इतिहासकार डॉ. विश्वास पाटील यांनी येथे केले.



मराठी मालिका सिनेमा, नाटकात काही पुस्तकात शंभूराजांची केलेली बदनामी सर्व सरासर झूट आहे. शंभूराजे पकडले गेले तेव्हा त्यांच्यासोबत त्यांच्या धर्मपत्नी, धर्मगुरू, सरदार अशी अनेक मंडळी होती. त्यामुळे शंभूराजे बेसावध होते म्हणून ते पकडले गेले. हा खोटा इतिहास आहे. इतिहासाच्या कसोटीवर त्याचा अभ्यास होणे गरजेचे आहे असेही विश्वास पाटील म्हणाले.

वांद्रे ( पश्चिम ) येथील नॅशनल लायब्ररी तर्फे छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित नाते जीवा शिवाचे या व्याख्यानाचे गुरुवारी ६ जून रोजी आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख व्याख्याते म्हणून विश्वास पाटील बोलत होते. यावेळी नॅशनल लायब्ररीचे अध्यक्ष ॲड.दीपक पडवळ, प्रमुख कार्यवाह प्रमोद महाडिक, ज्येष्ठ साहित्यिक अशोक बेंडखळे आदी मान्यवर उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्माचा इतिहास सुद्धा वेदनेचा इतिहास आहे. राजांचा जन्म झाला तेव्हा पाळणा बांधायला सुद्धा स्वराज्याची स्वतःची जमीन नव्हती. १६८० नंतर १६८९ पर्यंत औरंगजेबाने आक्रमणे केली. या आक्रमणात ३१ सरदार ५ लाख सैनिक आणि ४ लाख जनावरे होती. एवढा मोठा सेना समुद्र हा केवळ संभाजी महाराजांनी रोखला होता. म्हणूनच स्वराज्याची लखलखती तलवार म्हणजे संभाजी महाराज होते. संभाजी राजांनी जवळपास ११३ ते ११४ लढाया जिंकला आहेत. बाणावरच्या लढाईत त्यांचा पराभव झाला. मात्र, युद्ध सराव करून त्यांनी पुन्हा ही लढाई जिंकली होती.

औरंगजेबाला नमोहरम करून मुंड्या डोक्याने फिरायला संभाजी राजे यांनी भाग पाडले आहे.

कठीण काळात येसूबाईंना रायगडाची सूत्र देऊन महाराष्ट्राची धुरा एका पराक्रमी स्थितीला देण्याचे पहिले काम शंभूराजे यांनी केले आहे. देहू आळंदीतील पालखीला संरक्षण देण्यास पहिलं काम संभाजी राजे यांनी केले. अशा शूर शंभूराजांचा पराभव करणे सचोटीच्या मार्गाने शक्य होणारे नाही हे औरंगजेबाला कळले होते. म्हणूनच त्यांनी कटकारस्थानी रचून संभाजींना गाठले.

मराठी मालिका सिनेमा, नाटकात, काही पुस्तकात शंभूराजांची केलेली बदनामी सर्व सरासर झूट आहे. शंभूराजे बेसावध होते म्हणून ते पकडले गेले हा खोटा इतिहास आहे. त्याचा इतिहासाच्या कसोटीवर अभ्यास होणे गरजेचे असल्याचे मत ही डॉ. विश्वास पाटील यांनी यावेळी व्यक्त केले.

महाराष्ट्राचा इतिहास गौरवाच्या गुलालाने जरी माखला असला तरी गद्दारीच्या शेणात तो माखलेला आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि शंभूराजे या पिता-पुत्राच्या जीवन चरित्रातून जीवनाची सार्थकता होते. एखाद्या अद्भुत विहिरी सारखे हे चरित्र आहे. या खोल विहिरीत उतरल्यावर नवीन नवीन माणिक मोती हाती लागतात तसा याचा अभ्यास आहे असेही पाटील यांनी यावेळी सांगितले.

## महत्त्वाच्या बातम्या

### माजी खासदार डी. एस. अहिरे राष्ट्रवादीत

मुंबई, दि. ६प्रतिनिधी

धुळ्यातील माजी खासदार डी. एस. अहिरे यांच्यासह सिंदखेडचे काँग्रेस तालुकाध्यक्ष शामकांत सनेर, भाजपाचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस सुनील नेरकर आदींनी गुरुवारी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, शिव शाहू फुले आणि डॉ. आंबेडकरांच्या मार्गदर्शनानुसार महाराष्ट्र वाटचाल करत आहे. त्यामुळे महिलांना मानसन्मान आणि प्रतिष्ठा मिळवून देण्याचे काम राष्ट्रवादी काँग्रेस करत आहे. २०२९ मध्ये आपल्या महाराष्ट्रातून ९६ महिला आरक्षित जागेतून आमदार होणार आहेत. तसेच देशात खासदारांच्या ५४३ जागा असून तेथेही एक तृतीयांश महिला खासदार होणार आहेत. महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत संधी दिली. पुरुषासोबत महिलांना वागणूक, संधी आणि मानसन्मान देणारे देश जगात पुढे आहेत. आमच्या पक्षात नवा-जुना वाद नाही. ज्याच्यामध्ये कर्तृत्व, नेतृत्व आहे. ज्याच्यामध्ये समाजातील सर्व घटकांना बरोबर घेऊन जाण्याची क्षमता आहे, त्याला संधी मिळाली पाहिजे.

### महाज्योतीची पायलट प्रशिक्षण योजना बंद

मुंबई, दि. ६प्रतिनिधी

दोनशे तास व्यावसायिक प्रशिक्षणासाठी मुलांना भारताबाहेर पाठविण्यास पालक राजी नसल्यामुळे महाज्योतीची पायलट प्रशिक्षण योजना बंद करण्यात येत आहे. इतर मागासवर्ग कल्याण मंत्री अतुल सावे यांनी ही माहिती दिली.

महाज्योतीच्या माध्यमातून इतर मागासवर्गीय (ओबीसी) समाजातील उच्चशिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. सध्या राज्यातील ७५ विद्यार्थ्यांना उच्चशिक्षणासाठी शिष्यवृत्ती देऊन परदेशात दरवर्षी पाठवण्यात येते. मात्र, ज्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला आहे आणि ज्यांचे शिक्षण अद्याप पूर्ण झाले नाही अशाच विद्यार्थ्यांना गुणवत्तेच्या आधारवर ही शिष्यवृत्ती देण्यात येत असते.

महाज्योतीच्या वतीने दरवर्षी २० विद्यार्थ्यांची पायलट (वैमानिक) प्रशिक्षणासाठी निवड करण्यात येते. नागपूर फ्लाईंग क्लबच्या वतीने त्यांना व्यावसायिक पायलट प्रशिक्षण देण्यात येते. या प्रशिक्षणादरम्यान विद्यार्थ्यांना दोनशे तास व्यावसायिक प्रशिक्षणासाठी भारताबाहेर जावे लागते. परंतु, हे प्रशिक्षण घेण्यास अनेक विद्यार्थी टाळाटाळ करतात, तर काही पालकांकडून परवानगी मिळत नाही. त्यामुळे प्रशिक्षणात अडथळा निर्माण होत आहे. ही अडचण सातत्याने येत असल्याने आता सुरू असलेल्या बॅचचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर नव्याने पायलट प्रशिक्षण अभ्यासक्रमासाठी कोणाचीही नोंदणी करण्यात येणार नाही. हा अभ्यासक्रम बंद करण्यात येणार असल्याचे सावे यांनी स्पष्ट केले.

### चोरट्याचा पाठलाग करताना डॉक्टर पती-पत्नी जखमी

मुंबई, दि. ६प्रतिनिधी

नांदेड येथे जाताना एक्स्प्रेसमध्ये बॅग खेचून पळणाऱ्या चोरट्याचा पाठलाग करताना डॉक्टर पती-पत्नी जखमी झाल्याची घटना भांडुप रेल्वे स्थानकादरम्यान घडली. पळून गेलेल्या आरोपीविरुद्ध कुर्ला रेल्वे पोलिसांनी गुन्हा नोंदवून त्याचा शोध सुरु केला आहे. डॉक्टर दाम्पत्य पनवेल येथे राहत असून बुधवारी ते नांदेडला नातेवाईकाकडे जात होते. लोकमान्य टिळक टर्मिनस स्थानकातून त्यांनी नांदेड एक्स्प्रेस पकडली. एस चार कोचमधून प्रवास करताना एका चोरट्याने डॉक्टरची पर्स चोरी करण्याचा प्रयत्न करताच तिच्यासह तिच्या पतीने त्याला पकडण्याचा प्रयत्न केला. याच प्रयत्नात चोराने तिला लोकलमधून खाली खेचले. त्यामुळे तिच्या पतीने धावत्या एक्स्प्रेसमधून उडी घेतली होती. त्यात त्यांचा हात कोपरापासून तुटून वेगळा झाला. ते दोघेही पती-पत्नी जखमी झाल्याने त्यांना तातडीने फोर्टीज रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

### पालिका मुख्य रुग्णालयांत तापाची ओपीडी

मुंबई, दि. ६प्रतिनिधी

मुंबईत पावसाळा सुरू होताच व्हायरल फिव्हर, इन्फ्लूएंझा आणि इतर संसर्गजन्य आजारांनी ग्रस्त असलेल्या रुग्णांची संख्या वाढू लागल्याने मुंबई महापालिकेने (बीएमसी) त्यांच्या प्रमुख रुग्णालयांमध्ये विशेष 'फिव्हर ओपीडी' सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. नायर रुग्णालयात फिव्हर ओपीडी सुरू झाली असून, ७ जूनपासून सायन रुग्णालयात ओपीडी सुरू होईल. त्यानंतर केईएम रुग्णालयातही लवकरच ही सेवा सुरू केली जाईल. कूपर रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. सुधीर मेढेकर म्हणाले की, एका आठवड्यात कूपर हॉस्पिटलमध्ये फिव्हर ओपीडी सुरू होईल. केईएम रुग्णालयाच्या अधिष्ठाता डॉ. संगीता रावत म्हणाल्या की, रुग्णांची संख्या वाढल्यास आम्ही लवकरच फिव्हर ओपीडी सुरू करणार आहोत. नायर रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. शैलेश मोहिते यांनी सांगितले की, रुग्णालयात पावसाळी आपत्कालीन परिस्थितीसाठी ३० बेड राखीव आहेत.

**ओपीडी ४ ते ८ वाजेपर्यंत**

फिव्हर ओपीडी दररोज दुपारी ४ ते रात्री ८ वाजेपर्यंत सुरू राहील. यामुळे रुग्णांना तपासणी आणि उपचारांसाठी अधिक वेळ मिळेल. महापालिकेच्या या उपक्रमामुळे पावसाळ्यात संसर्गजन्य आजारांवर नियंत्रण ठेवण्यास मदत होईल.

### दहावीची गुणपत्रिका डिजीलॉकरवर

मुंबई, दि. ६प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इयत्ता दहावी) परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर आता या गुणपत्रिका डिजीलॉकरमध्येही उपलब्ध करण्यात आल्या आहेत. पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळामार्फत घेण्यात आली होती. या परीक्षेला १५ लाख ४६ हजार ५७९ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले होते त्यापैकी १४ लाख ५५ हजार ४३३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत व त्यांची एकूण उत्तीर्णतेची टक्केवारी ९४.१० आहे. या सर्व विद्यार्थ्यांची गुणपत्रिका 'डिजीलॉकर' या केंद्र सरकारच्या ॲपवर उपलब्ध करून देण्यात आली आहे. ज्या विद्यार्थ्यांनी 'अप्पार-आयडी' आधीच अचूकरीत्या नोंदवली आहे, त्यांच्या गुणपत्रिका थेट डिजीलॉकर खात्यात पाठवण्यात आलेल्या आहेत. ज्या विद्यार्थ्यांची अप्पार-आयडी उपलब्ध नाही, त्यांनी परीक्षेचे वर्ष व बैठक क्रमांक टाकून 'डिजीलॉकर ॲप'मध्ये गुणपत्रिका मिळवावी. सर्व विभागीय मंडळांनी संबंधित मुख्याध्यापक, विद्यार्थी आणि पालकांनी आवश्यक ती नोंद घ्यावी, असे आवाहन शिक्षण मंडळाकडून करण्यात आले आहे.

### गिरणी कामगारांचा २२ जूनला मेळावा

मुंबई, दि. ६प्रतिनिधी

गिरणी कामगारांचा वांगणी व शेलू येथील घरांना विरोध आहे. याप्रकरणी मुंबई येथे २२ जूनला मेळावा घेण्यात येणार आहे, अशी माहिती सर्व श्रमिक संघटनेच्या गिरणी कामगार विभागाचे अध्यक्ष बी. के. आंब्रे यांनी दिली. गिरणी कामगारांना मुंबईतील गिरण्याच्या जागेवर घरे देण्याची मागणी असून या मेळाव्यात पावसाळी अधिवेशनात करण्यात येणाऱ्या आंदोलनाची दिशा ठरविण्यात येणार असल्याचे आंब्रे यांनी सांगितले.

# पिंपरी-चिंचवड शहरातील प्रकल्प पूर्ण होण्यासाठी कार्यवाही करा -विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे

मुंबई, दि. ६ प्रतिनिधी

पिंपरी - चिंचवड महानगरपालिका अंतर्गत अनेक पायाभूत सुविधा प्रकल्प सुरू असून अण्णासाहेब मगर स्टेडियम व सिटी सेंटर भवन हे प्रकल्प पूर्ण होण्यासाठी कार्यवाही करावी, असे आदेश विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी दिले.



विधानमंडळ येथे विधानसभा उपाध्यक्ष श्री.बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक झाली. यावेळी ते बोलत होते. यावेळी पिंपरी- चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंग, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण(पीएमआरडीए) चे अतिरिक्त आयुक्त दीपक सिंगला, पुणे मेट्रोचे कार्यकारी संचालक श्रावण हर्डीकर दूरदृष्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते.

मेट्रो मार्गाचा विस्तार पिंपरी चिंचवड ते निगडी येथेपर्यंत केला जाणार असून या जवळपास साडेचार किलोमीटर लांबीच्या मेट्रो प्रकल्पाचा खर्च 910 कोटी रुपये आहे या मार्गावर तीन स्थानक प्रस्तावित आहेत. तसेच भक्ती शक्ती ते चाकण प्रस्तावित मेट्रो मार्गासाठी केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठवण्यात आला आहे.

मोरवाडी मेट्रोस्थानकाच्या जवळ दुचाकी वाहनांच्या पार्किंगची अडचण दूर करण्यात यावी व यासाठी पार्किंगसाठी देण्यात आलेल्या जागेचा विकास केल्या जावा, अशा सूचना विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी केल्या.

यावेळी पिंपरी चिंचवड महानगर विकास आराखड्याबाबत सादरीकरण करण्यात आले. यात अनेक पायाभूत सुविधा प्रकल्प प्रस्तावित केले आहेत. यामध्ये सार्वजनिक वाहतूक, जल व्यवस्थापन, कचरा व्यवस्थापन, शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक सुविधा यांचा समावेश आहे याची माहिती देण्यात आली.

# आपत्ती काळात जनसंपर्क अधिकाऱ्यांनी माध्यमांना वस्तुनिष्ठ माहिती द्यावी - अपर जिल्हाधिकारी अमृत नाटेकर



मुंबई, दि. ६ प्रतिनिधी

आपत्तीच्या काळात जनतेपर्यंत वस्तुनिष्ठ व खरी माहिती पोहचणे अधिक गरजेचे असते. यासाठी आपत्ती काळात घडणाऱ्या सर्व घटना, आपत्ती व्यवस्थापन व मदत कार्याची वस्तुनिष्ठ माहिती संबंधित यंत्रणांकडून घेऊन प्रसारमाध्यमांद्वारे माध्यमातून नागरिकांपर्यंत पोहचविण्याची जनसंपर्क अधिकाऱ्यांवर मोठी जबाबदारी असते. आपत्तीच्या काळात जनसंपर्क अधिकाऱ्यांनी अधिक सतर्क राहून प्रसार माध्यमांना वस्तुनिष्ठ माहिती द्यावी, असे आवाहन मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरणाचे (एमएमआरडीए) अपर जिल्हाधिकारी अमृत नाटेकर यांनी केले.

यंदाच्या पावसाळ्यातील आपत्ती व्यवस्थापनाच्या अनुषंगाने माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्यावतीने मुंबईतील सर्व यंत्रणा व विभागांच्या जनसंपर्क अधिकाऱ्यांची बैठक मंत्रालयात झाली. यावेळी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे संचालक (प्रशासन) हेमराज बागुल, संचालक (वृत्त व जनसंपर्क) डॉ. गणेश मुळे यांच्यासह विविध विभागाचे जनसंपर्क अधिकारी उपस्थित होते.

अपर जिल्हाधिकारी अमृत नाटेकर म्हणाले, नैसर्गिक आपत्ती संदर्भात कोणतीही अचूक पूर्वसूचना मिळत नसते. अशा वेळी यंत्रणांमध्ये, विभागांमध्ये समन्वय असणे आवश्यक आहे. आपत्तीपूर्व तयारी, तातडीचा प्रतिसाद आणि समन्वय महत्त्वाच्या असून या काळात माहितीचा अचूक प्रसार आणि जनतेपर्यंत सकारात्मक संदेश पोहोचविणे गरजेचे असते. जनसंपर्क अधिकाऱ्यांनी आपत्ती संदर्भातील माहिती प्रसारित करण्यापूर्वी तिची खातरजमा करूनच प्रसारित केली पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.

आपत्कालीन परिस्थितीत समन्वय, संवाद आणि संवेदनशीलता यावर भर द्यावा असे सांगून संचालक (प्रशासन) हेमराज बागुल म्हणाले, आपत्ती काळात जनसंपर्क अधिकाऱ्यांनी वस्तुनिष्ठ माहिती देण्याबरोबरच जनतेच्या मनात विश्वास निर्माण करावा. चुकीची माहिती आणि विसंवाद शासनाची प्रतिमा मलीन करू शकते. त्यामुळे संस्थांची प्रतिमा जपण्यास प्राधान्य द्यावे, असेही श्री. बागुल म्हणाले.

आपत्तीच्या वेळी प्रशासनाच्या प्रत्यक्ष कृती आणि मदतकार्याची वस्तुनिष्ठ माहिती लोकांपर्यंत पोहोचवण्याच्या कामाबरोबरच आपत्ती काळात पसरवल्या जाणाऱ्या अफवांचे खंडन करण्यास जनसंपर्क अधिकाऱ्यांनी प्राधान्य द्यावे, असे संचालक ( वृत्त व जनसंपर्क) डॉ. गणेश मुळे यांनी सांगितले. श्री.मुळे म्हणाले, आपत्ती परिस्थितीत स्थानिक, राज्य व केंद्रीय यंत्रणा तत्काळ मदत कार्यात सहभागी होतात. या यंत्रणांकडून वस्तुनिष्ठ माहिती घेवून ती समाजमाध्यमे, वृत्तपत्रे, दूरचित्रवाणी व रेडिओ यांसारख्या माध्यमांच्या सहाय्याने जनतेपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी जनसंपर्क अधिकाऱ्यांनी पार पाडावी.

# नाट्य परिषदेचे पुरस्कार जाहीर

## नीना कुलकर्णी व सुरेश साखळकर यांना जीवनगौरव पुरस्कार

मुंबई, दि. ६ प्रतिनिधी

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या वतीने नाटककार गोविंद बल्लाळ देवल यांच्या स्मृतिदिनाप्रीत्यर्थ १४ जून रोजी रंगभूमीवरील उल्लेखनीय कार्याबद्दल रंगकर्मींना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. यंदा ज्येष्ठ अभिनेत्री नीना कुलकर्णी आणि ज्येष्ठ अभिनेते सुरेश साखळकर यांची जीवनगौरव पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. हा पुरस्कार सोहळा १४ जून रोजी दुपारी ४ वाजता यशवंत नाट्य मंदिरात होणार आहे. या सोहळ्यात नाट्यपरिषद मुंबई कार्यकर्ता पुरस्कारासाठी महेश कापडोसकर, शाखा कार्यकर्ता पुरस्कारासाठी सागर मेहेत्रे, एकपात्री पुरस्कारासाठी विक्रांत शिंदे, निवेदक पुरस्कारासाठी संतोष लिंबोरे (पाटील), गुणी रंगमंच कामगार सतीश काळबांडे, नाट्यसमीक्षक पुरस्कारासाठी अनिल पुरी, बालरंगभूमीवरील उल्लेखनीय कार्यासाठी मीनल कुलकर्णी यांची निवड करण्यात आली.

सर्वोत्कृष्ट प्रायोगिक संस्था पुरस्कारासाठी विजय नाट्य मंदिर (नाशिक), व्यवस्थापक अजय कासुर्डे, रंगभूमीव्यतिरिक्त केलेल्या विधायक कार्यासाठी विद्याधर निमकर, विष्णू मनोहर, प्रसाद कार्ले, लोककलावंत पुरस्कारासाठी डॉ. गणेश चंदनशिवे, भावेश कोटांगले, शाहीर राजेंद्र कांबळे, आसराम कसबे, कामगार रंगभूमीवरील लेखक पुरस्कारासाठी डॉ. चंद्रकांत शिंदे यांना सन्मानित करण्यात येणार आहे.

नाट्य निर्मात्यांना आणि नाट्य व्यवस्थापकांना सहकार्य केल्याबद्दल दीनानाथ मंगेशकर नाट्यगृहाच्या प्रशासकीय अधिकारी वृषाली शेट्ये यांना आणि ५१ वर्ष प्रायोगिक रंगभूमीवर कार्यरत असणाऱ्या अनुराग,

कल्याण या संस्थेला विशेष पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. प्रायोगिक नाट्य पुरस्कारासाठी सर्वोत्कृष्ट प्रायोगिक संगीत नाटक संगीत आनंदमठ (संस्था कल्पक ग्रुप, पुणे), प्रायोगिक नाटक मीडिया (संस्था रुद्रेश्वर, गोवा), प्रायोगिक नाटक दिग्दर्शक मुकुल ढेकळे (मून विदाऊट स्काय), पुरुष कलाकार यशवंत चोपडे (ब्लॅक इक्वेशन), अभिनेत्री पूनम सरोदे (सं. नाटक : वेटलॉस) प्रायोगिक संगीत नाटक गायक अभिनेता अभिषेक काळे ( संगीत अतृप्ता) प्रायोगिक संगीत नाटकातील गायक अभिनेत्री अनुष्का आपटे (संगीत आनंदमठ), प्रायोगिक नाटक लेखक डॉ. सोमनाथ सोन वळकर ( द फिलिंग पॅरोडॉक्स) यांची निवड करण्यात आली.

# मीडियात नाही, दोघा भावांनी समोरासमोर बोलावे - अमित ठाकरे

मुंबई, दि. ६ प्रतिनिधी

राजकारणात काही नात्यांना विसरणं कठीण असतं, आणि 'ठाकरे विरुद्ध ठाकरे' हे त्यातलंच एक उदाहरण. गेल्या काही आठवड्यांपासून राज आणि उद्धव ठाकरे पुन्हा एकत्र येतील का, यावर चर्चांचा भडिमार सुरु आहे. या पार्श्वभूमीवर आता मनसे नेते अमित ठाकरे यांनी दिलेल्या थेट प्रतिक्रियेमुळे या चर्चांना पुन्हा एकदा हवा मिळाली आहे.

“मिडियात चर्चा करून काही साध्य होणार नाही. राज आणि उद्धव ठाकरे यांनी थेट एकमेकांशी बोलले पाहिजे,” असा स्पष्ट सल्ला अमित ठाकरे यांनी दिला आहे.

राज ठाकरे यांनी काही दिवसांपूर्वी दिलेल्या मुलाखतीत “एकत्र येण्याबाबत विचार व्हायला हवा” असा संकेत दिला होता. त्यावर उद्धव ठाकरे यांनीही सकारात्मक प्रतिसाद दिला होता. यामुळे मुंबई महापालिकेसाठी ठाकरे कुटुंबात ‘राजकीय युती’ होणार का? असा प्रश्न उपस्थित झाला होता.

मात्र दरम्यान, उद्धव ठाकरे परदेश दौऱ्यावर गेले आणि चर्चा काहीशा थंडावल्या. पण आता या चर्चेला अमित ठाकरे यांच्यामुळे पुन्हा जिवंततेची झळाळी मिळाली आहे.

अमित ठाकरे म्हणाले, “कोरोना काळात उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना, राज ठाकरे यांनी स्वतः फोन करून त्यांच्या प्रकृतीची चौकशी केली होती. आम्ही तुमच्यासोबत आहोत, असं त्यांनी सांगितलं होतं. त्यामुळे नात्यांचं हे बंध अजूनही तुटलेलं नाही. पण या सगळ्यावर मीडियात चर्चा करून काही होणार नाही. दोघा भावांनीच समोर बसून बोलावं.” त्यांनी पुढे नमूद केलं की, “राजकीय भांडणांवर फिनिशिंग टच फक्त दोघेच देऊ शकतात.”

दरम्यान, आदित्य ठाकरे यांनीही युतीबाबत आशावाद व्यक्त केला आहे. “मराठी माणूस आणि महाराष्ट्राच्या हितासाठी जर कोणी आमच्यासोबत यायला इच्छुक असेल, तर आम्ही त्यांना सोबत घेऊन लढायला तयार आहोत,” अशी प्रतिक्रिया आदित्य ठाकरे यांनी दिली.



**शिवसैनिकांकडून घाटकोपर पूर्वेकडील राजावाडी विभागात वृक्षारोपण करण्यात आले.यावेळी महाराष्ट्र राज्य शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सेनेचे राज्य सचिव सचिन भांगे,महाराष्ट्र संघटक प्रकाश वाणी,शाखासंघटक चंद्रकांत हळदणकर,सागर बनसोडे व इतर सदस्य उपस्थित होते.**

# दृढ निश्चय करून काम केले तर निश्चितच यशस्वी व्हाल – परेश भागवत

मुंबई, दि. ६ प्रतिनिधी

महावितरणच्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने ‘शुन्य अपघात महावितरण, शुन्य अपघात महाराष्ट्र’ ही संकल्पना घेऊन दि. १ ते ६ जून २०२५ या कालावधीत संपूर्ण राज्यात विद्युत सुरक्षा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. आज दि. ५ जून २०२५ रोजी वसुंधरा दिवस म्हणून साजरा करण्यात आला. वसुंधरा दिवसाचा औचित्य साधून पर्यावरणपुरक उपक्रम म्हणून वृक्षारोपण करण्यात आले. त्यानंतर, कर्मचाऱ्यांची रॅली काढण्यात आली. यावेळी मुख्य अतिथी म्हणून, कार्यकारी संचालक (मा सं) श्री. परेश भागवत, भांडूप परिमंडलचे मुख्य अभियंता, श्री. संजय पाटील, मुख्य महाव्यवस्थापक (मा सं) श्री. भूषण कुलकर्णी, महाव्यवस्थापक श्री. राजेंद्र पांडे व इतर वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.




महावितरण मध्ये राज्यभर आज वसुंधरा दिवस साजरा करण्यात आला . वसुंधरा दिवस हा पर्यावरणविषयक कार्यक्रमांना पाठबळ देण्यासाठी एक पाया आहे. कार्यकारी संचालक (मा सं) श्री. परेश भागवत व भांडूप परिमंडलाचे मुख्य अभियंता, श्री. संजय पाटील यांनी वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाबाबत माहिती दिली. त्यानंतर, कर्मचारी /अधिकाऱ्यांची रॅली काढण्यात आली. या रॅलीच्या माध्यमातून वीज सुरक्षा व वीज बचत बाबत जनजागृती करण्यात आली. त्यानंतर,नेरूळ विभागातील कर्मचाऱ्यांनी नेरूळ रेल्वे स्थानक जवळ एक सुंदर पथनाट्य सादर केले. या पथनाट्यद्वारे त्यांनी विजेपासून होणारे अपघात कसे टाळावे व त्यातून संरक्षण कसे करावे याबद्दल माहिती दिली.

महावितरणचा कणा असलेले महावितरणचे कर्मचारीवर्ग महावितरणसाठी खूप महत्वाचे आहेत याचा एक प्रमाण म्हणून महावितरण वाशी मंडळातर्फे दिव्यांग कर्मचाऱ्यांना मॉडिफाइड स्कूटर देण्यात आल्या. जेणेकरून त्यांचा दैनंदिन प्रवास थोडा अधिक सोयीस्कर होण्यास मदत होईल.

विजेपासून सुरक्षा हे प्रत्येक कर्मचाऱ्यांची स्वतःची जबाबदारी आहे . आपल्यासाठी व आपल्या कुटुंबासाठी सुरक्षा बाळगून काम करणे आवश्यक आहे . आपण जर दृढ निश्चय करून काम केले तर नक्कीच यशस्वी होऊ”, असे महावितरणचे कार्यकारी संचालक (मा सं ) श्री. परेश भागवत यांनी सांगितले.

“रोजच्या कामातून काही वेगळी संकल्पना मुख्य कार्यालयांनी या सुरक्षा साप्ताहच्या माध्यमातून मांडली आहे . अशा कार्यक्रमामुळे अधिकारी व कर्मचाऱ्यांना एक नवीन उर्जा मिळते. परंतु, कर्मचाऱ्यांनी हे लक्षात घेणे गरजेचे आहे कि आपल्या दैनंदिन कामात सुरक्षा विषयक मुलभूत गोष्टींचा सराव करणे आवश्यक आहे”, असे भांडूप परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. संजय पाटील यांनी सांगितले.

या कार्यक्रमाला यशस्वीपणे पार पडण्यासाठी वाशी मंडळाचे अधीक्षक अभियंता श्री. दीपक पाटील व मंडळातील सर्व कार्यकारी अभियंता व त्यांच्या चमूनी विशेष मेहनत घेतली.

याशिवाय, ठाणे व पेण मंडळात अधीक्षक अभियंता श्री. युवराज मेश्राम व श्री धनराज बिक्कड यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणे मंडळात बाईक रॅलीचे आयोजन करून सुरक्षा विषयी जनजागृती करण्यात आली.

# बालांगण



# हा आहे दोन्हीतला फरक





रस्त्यावरून प्रवास करताना आपल्याला फ्लायओव्हर आणि ओव्हरब्रिज असे शब्द अनेकदा ऐकायला मिळतात. बऱ्याच वेळा आपण हे दोन शब्द एकच समजतो आणि फरक न जाणून घेता त्यांचा वापर करतो. पण तुम्हाला माहिती आहे का की, उड्डाणपूल आणि ओव्हरब्रिज या शब्दांचा अर्थ वेगवेगळा असून वेगवेगळ्या गरजांनुसार ते बांधले जातात? चला, आज याविषयी जाणून घेऊ या.

**✲ उड्डाणपूल म्हणजे काय?**

उड्डाणपूल हा एक प्रकारचा पूल असून तो रस्ते किंवा रेल्वे रुळांवर बांधला जातो. त्याचा मुख्य उद्देश कोणत्याही अडथळ्याशिवाय वाहतूक एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेणे हा असतो. वर्दळीच्या चौकातून बरीच वाहने येत-जात राहतात. अशावेळी उड्डाणपूल बांधला तर काही वाहने खाली रस्त्यावरुन धावतात आणि काही वाहने उड्डाणपूलावरून जातात. यामुळे चौकात वाहतूक कोंडीची समस्या बऱ्याच प्रमाणात कमी होते. उड्डाणपूल सहसा लांब पल्ल्याच्या वाहतुकीसाठी बांधले जातात. ते शहरांमध्ये किंवा बाहेरील भागात असू शकतात. वाहने जलद आणि सुरक्षितपणे जाऊ शकतील, अशाप्रकारे त्याची रचना केली जाते.

**महत्त्वाचे काही...**

**✲ ओव्हरब्रिज म्हणजे काय?**

ओव्हरब्रिज हा देखील एक प्रकारचा पूलच आहे, परंतु त्याचे मुख्य काम पादचाऱ्यांना किंवा कमी वेगाने जाणाऱ्या वाहनांना रस्ता किंवा रेल्वे मार्गावरून मार्ग उपलब्ध करून देणे हे असते. तुम्ही अनेकदा रेल्वे स्थानकांजवळ पादचाऱ्यांसाठी बांधलेले पूल पाहिले असतील. ते ओव्हरब्रिज असतात.

ओव्हरब्रिजचा उद्देश सुरक्षितता सुनिश्चित करणे हा असतो. हे पूल वर्दळीचे रस्ते किंवा धोकादायक रेल्वे रुळ ओलांडण्याचे टाळण्यासाठी कामी येतात. ओव्हरब्रिज सामान्यतः उड्डाणपुलांपेक्षा लहान असतात आणि पादचाऱ्यांना आणि सायकलस्वारांना सामावून घेण्यासाठी डिझाइन केलेले असतात.

# ताप आलाय?



मित्रांनो, वातावरणातल्या बदलांमुळे विविध आजार डोकं वर काढतात. या दिवसात तर फ्लूच्या रूग्णांच्या संख्येत वाढ होते. फ्लू म्हणजे नेमकं काय हे जाणून घेऊया. इन्फ्लूएंझाला 'फ्लू' असं म्हटलं जातं. ताप, थंडी, खोकला, अंगदुखी, डोकेदुखी अशी याची लक्षणं असतात. इन्फ्लूएंझा विषाणूमुळे या विकाराची लागण होते. या फ्लूविरोधात लस उपलब्ध आहे. सहा महिन्यांपेक्षा जास्त वयाचे कोणीही ही लस घेऊ शकतात. रोगप्रतिकारक्षमता कमी असल्याने लहान मुलांना हा विकार होण्याची शक्यता जास्त असते. त्यामुळे तुम्हा मुलांनी ही लस टोचून घ्यायला हवी. नऊ वर्षांपेक्षा मोठ्या मुलांना एकदा दिलेली लस पुरते पण त्यापेक्षा लहान मुलांना दोनदा लस द्यावी लागते. पाच वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांना फ्लू होण्याची शक्यता सर्वात जास्त असते. तसंच मधुमेह, अस्थमा किंवा इतर गंभीर आजार असलेल्या मुलांना फ्लू होऊ शकतो.

फ्लू हा साथीचा आजार आहे. हा विषाणू हवेच्या माध्यमातून पसरतो. फ्लू झालेल्या व्यक्तीच्या शिंकण्यातून किंवा खोकल्यातून हा विषाणू हवेत पसरतो आणि श्वासावाटे निरोगी व्यक्तीच्या शरीरात प्रवेश करतो. त्यामुळे खोकल्यानंतर किंवा शिंकल्यानंतर हात स्वच्छ धुवून घ्यायला हवेत.

**आरोग्य जपा**

पण फ्लू झाला तरी काळजी करायचं कारण नाही. औषधोपचार आणि थोड्या विश्रांतीनंतर तुम्ही बरे होता. फ्लूचं निदान झालं तर डॉक्टरांनी दिलेली औषधं वेळेवर घ्या. आराम करा. भरपूर पाणी प्या. ताजी फळं आणि हिरव्या भाज्या खा. फारच बरं वाटत नसेल, श्वास घ्यायला त्रास होत असेल तर आई-बाबांना सांगा.

# पोटात कावळे का ओरडतात?



छोट्या दोस्तांनो, कधीकधी अचानक तुमच्या पोटातून आवाज येता का? पोटात गुडगुड वाजते का? थोडक्यात पोटात कावळे ओरडतात का? खरंतर सगळ्यांनाच कधी ना कधी हा अनुभव येत असतो. म्हणूनच यामागील कारण आज जाणून घेऊ या.

मुलांनो, पोटातून येणारा हा आवाज भूक लागल्याचे लक्षण आहे. पोट रिकामे असते तेव्हा स्नायू आकुंचन पावतात. यामुळे आतील वायू आणि पचन द्रव बाहेर काढता येतो. स्नायूंच्या या हालचालीमुळे पोटातून आवाज येतो. या प्रक्रियेला 'पेरिस्टॅलिसिस' म्हणतात. ही हालचाल नेहमीच सुरू असली तरी पोट रिकामे असताना आवाज अधिक मोठा येतो. रिकाम्या पोटी स्नायू आकुंचन पावतात तेव्हा या हालचालीमुळे निर्माण होणारा आवाज मोठ्याने बाहेर येतो. यामध्ये भूक लागण्याचे संप्रेरक 'घ्रेलिन' देखील भूमिका बजावते. घ्रेलिन भूकेचा हार्मोन असून तो शरीराला अन्नाची गरज असल्याचे संकेत देतो. स्वाभाविकच पोट रिकामे होताच या हार्मोनची पातळी वाढते. यामुळे पोटाचे स्नायू जलद आकुंचन पावतात. म्हणूनच गुरगुरण्याचा आवाज अधिक मोठा होतो.

**हे होते कशामुळे?**

हा आवाज कमी करण्याचा एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे काहीतरी खाणे. खाल्ल्याने हा आवाज ताबडतोब कमी होतो. अर्थात पोटाच्या स्नायूंची हालचाल सुरूच राहते.

# संवाद वाढवा, मैत्र जोडा



छोट्या मित्रांनो, अनेकांना नवीन व्यक्तीशी बोलताना थोडेसे घाबरायला होते. आजूबाजूला कोणी अनोळखी असेल तर अस्वस्थ वाटते आणि संभाषण सुरू करण्यास अडचण येते. तुम्हालाही असे होते का? होत असेल तरी घाबरु नका. ही एक सामान्य समस्या आहे आणि काही सोप्या टिप्सच्या मदतीने तुम्ही हा संकोच दूर करू शकता. चला जाणून घेऊ या.

मुलांनो, गोड हास्य हा कोणाशीही संभाषण सुरू करण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे. तुम्ही एखाद्या अनोळखी व्यक्तीकडे बघून हसता तेव्हा मैत्रीपूर्ण असल्याचे दाखवता. तुम्ही त्यांच्याकडे लक्ष देत आहात आणि तुम्हाला त्यांच्याशी बोलायचे आहे, हे या कृतीतून तुम्ही दाखवता आणि संभाषण सुकर होते.

तुम्ही छोटासा प्रश्न विचारूनही सहजपणे संभाषण सुरू करू शकता. प्रश्न विचारल्याने समोरच्या व्यक्तीला बोलावेसे वाटते आणि तुमची भीतीही कमी होते. तुम्हाला चांगले बोलायचे असेल तर आधी चांगले ऐकले पाहिजे. म्हणूनच कोणी तुमच्याशी बोलत असेल तर ते काय म्हणत आहेत याकडे लक्ष द्या. संबंधित प्रश्न विचारा. यावरून या व्यक्तीला आपल्या बोलण्यात खरोखर रस आहे आणि तुम्ही ते महत्त्वाचे मानता, असे समोरच्या व्यक्तीला कळते. लक्षपूर्वक ऐकल्याने संभाषण सुरू राहते आणि मैत्री वाढते.

**कसे वागावे?**

सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे आत्मविश्वासाचा तुमच्या संभाषणावर खूप मोठा प्रभाव पडतो. त्यामुळेच थोडे घाबरले असाल तरी आनंदी दिसण्याचा प्रयत्न करा आणि तुमचा स्वतः वर विश्वास आहे हे दाखवा. सरळ उभे राहा, स्पष्ट बोला. आवाज उत्साही ठेवा. लक्षात ठेवा, प्रत्येकजण कधी ना कधी अनोळखी असतो आणि बहुतेक लोकांना नवीन लोकांना भेटणे आणि त्यांच्याशी बोलणे आवडते. तेव्हा तुम्हीही मैत्रीसाठी हात पुढे करा.

# पर्यावरण रक्षणासाठी...



छोट्या दोस्तांनो, बांधकाम करण्यासाठी विटा लागतात. पण सिमेंट-काँक्रिटच्या विटांमुळे पर्यावरणाचं नुकसान होऊ शकतं. म्हणूनच आता पर्यावरणपूरक म्हणजे इको-फ्रेंडली विटा तयार करण्यात आल्या आहेत. 'इंडियन स्कूल ऑफ डिझाइन अँड इनोव्हेशन'मधल्या शास्त्रज्ञांनी बरंच संशोधन करून या विटा तयार केल्या आहेत. या विटा तयार करण्यासाठी माती, सिमेंट, चारकोल आणि ऑरगॅनिक लुफ्फा फायबरचा वापर करण्यात आला आहे. या विटांमध्ये सिमेंट असलं तरी काँक्रिटच्या विटांच्या तुलनेत त्याचं प्रमाण बरंच कमी आहे. 'ग्रीन चारकोल ब्रिक्स' असं नाव या विटांना देण्यात आलं आहे. या विटांमध्ये हवा खेळती रहाण्यासाठी छोट्या पोकळ्या तयार करण्यात आल्या आहेत. या पोकळ्या पाण्याच्या टाकीप्रमाणे काम करतात. या पोकळ्यांमुळे विटांमध्ये पाणी साठून रहातं आणि विटांचं तापमान कमी होतं. यामुळे घरात थंडावा जाणवतो. विटांच्या पृष्ठभागावर थोड्या प्रमाणात चारकोलचा वापर करण्यात आला आहे. हे चारकोल हवेतलं नायट्रेट शोषून घेऊन हवा शुद्ध करतं.

**माहिती आहे?**

या विटा खूप हलक्या आहेत. तसंच त्या अगदी पटकन नष्टही होऊ शकतात. त्यामुळे बांधकामासाठी या विटांचा वापर होणं गरजेचं आहे. वातावरणात कार्बन डाय ऑक्साइडचं प्रमाण वाढत चाललं आहे. यामुळे जागतिक तापमानवाढीची समस्या निर्माण होते. सिमेंटमुळे कार्बनच्या उत्सर्जनात वाढ झाली आहे. सध्याच्या काळात प्रत्येकानेच पर्यावरणाचं रक्षण करणं गरजेचं आहे.

# गुणकारी अंजीर



मुलांनो, खाण्याच्या चुकीच्या सवयी आणि अयोग्य जीवनशैलीमुळे अनेकजण अनेक प्रकारच्या आजारांना बळी पडतात. आजार जडल्यास डॉक्टरांकडे जावे लागते. औषधे घ्यावी लागतात. हे टाळण्यासाठी तुम्ही आत्तापासून आहाराकडे लक्ष द्यायला हवे. निरोगी राहण्यासाठी तुम्ही सुका मेवा खायला हवा. तुमच्यापैकी अनेकांना तो आवडतही असेल. मुलांनो, सुकामेवा खाण्याचे बरेच लाभ मिळतात. पण तुम्हाला माहिती आहे का, की एक असेही ड्रायफ्रूट आहे हे भिजवलेले पाणी प्याल्यास अनेक समस्यांपासून मुक्तता मिळू शकते. हो, आपण अंजीरांबद्दल बोलत आहोत. अंजीरमध्ये पोटॅशियम, मॅग्नेशियम, कॅल्शियम, व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन बी, व्हिटॅमिन के, फायबर, प्रथिने, जस्त आणि लोह यासह अनेक पोषक घटक आढळतात. म्हणूनच अंजीर पाण्यात भिजवून ते पाणी पिल्यास शरीराला अनेक महत्त्वपूर्ण घटक मिळतात.

अंजीरचे पाणी पिल्याने पचनसंस्था चांगली कार्य करते. यामुळे अन्न सहज पचते. हे पाणी डिटॉक्स ड्रिंकसारखे काम करते. दररोज सकाळी रिकाम्या पोटी अंजीर भिजवलेले पाणी प्यायल्याने दिवसभर ऊर्जावान वाटू शकते. त्यात नैसर्गिक साखर असल्यामुळे विशेष लाभ होतो.

**माहिती आहे?**

# घरीच बनवा फळांची बास्केट



छोट्या दोस्तांनो, फळांची बास्केट तुम्ही घरीही बनवू शकता. कल्पकतेचा वापर करून फळांची ही बास्केट सजवता येईल. आज संत्र्यांची बास्केट कशी बनवायची हे शिकू या. साहित्य: मोठ्या आकाराचा कागद, केशरी रंगाचे कागद, केशरी पुठ्ठे (वेगवेगळ्या रंगांचे आणि डिझाईनचे केशरी कागद घ्या.), लाल कागद, गम, स्टिकर तसंच सजावटीच्या इतर वस्तू

कृती: कप किंवा छोट्या प्लेटचा वापर करून केशरी कागदांवर गोल आकार काढा. हे गोल कापून घ्या. तुमच्याकडच्या लाल कागदाचा वापर करून बास्केट किंवा बाउलचा आकार कापून घ्या. बास्केटला तुम्ही आवडीचा आकार देऊ शकता. लाल कागदाचा बाऊल मोठ्या कागदावर चिकटवा. आता लाल बाऊलच्या वरच्या भागावर केशरी गोल चिकटवा. हे केशरी गोल म्हणजे संत्री आहेत. बाऊलमध्ये संत्री ठेवली आहेत असं वाटायला हवं, मित्रांनो. बाऊल सजवण्यासाठी स्टीकर्स किंवा इतर वस्तूंचा वापर करता येईल. याच प्रकारे तुम्ही वेगवेगळ्या फळांचे आकार कापून टोपली सजवू शकता.

**कार्यानुभव**

चित्र रंगवा



# गावाची गोडी वाढवा




मित्रांनो, 'गावाकडे चला' असं गांधीजी म्हणाले होते. गावाला गेल्यावर किती बरं वाटतं. गावात फार गर्दी नसते, प्रदूषण नसतं. गावातली नदी, हिरवळ, शेणाने सारवलेलं घर, शेती हे सगळं हवंहवंसं वाटतं. काही दिवस गावाला जाऊन आल्यावर कसं ताजंतवानं वाटतं. गावच्या हवेत ही जादू असते मित्रांनो. भारताच्या ग्रामीण भागात बरंच काही घडत असतं. इथलं वातावरण, जगणं सगळंच वेगळं असतं. शहरातल्या जीवनासारखी धामधूम इथे नसते. या सगळ्याचा अभ्यास करून तुम्ही करीअर घडवू शकता. 'बॅचलर ऑफ रूरल स्टडीज' हा अभ्यासक्रम पूर्ण करून तुम्ही ग्रामीण जीवनाकडे वेगळ्या दृष्टीकोनातून बघू शकता.


या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून ग्रामीण भागातलं जीवन तुम्हाला अगदी जवळून पाहता येईल. विकासकामांमध्ये सहभागी होता येईल. भारताच्या ग्रामीण भागाचा मोठ्या प्रमाणावर विकास होणं गरजेचं आहे. यात तुमचा हातभार लागू शकतो. शेती, सामाजिक विकास, पशुपालन, जंगलांचा विकास, पर्यावरणाचं व्यवस्थापन अशा विविध आघाड्यांवर तुम्ही काम करू शकता. ग्रामीण भागाशी संबंधित विविध विषयांचा या अभ्यासक्रमात समावेश असतो. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर नोकरीच्या विविध संधी उपलब्ध होतात. सरकारी, खाजगी तसंच सार्वजनिक क्षेत्रात तुम्ही काम करू शकता.

**कोण होणार?**

**ठिपके जुळवा**



## स्मार्ट टिप्स



### अशी थांबवा उचकी

दोस्तांनो, उचकी लागली की खूप अस्वस्थ वाटतं. उचकी लागल्यावर आपण घटाघट पाणी पितो. आपल्याला वर बघायला सांगितलं जातं. उचकी थांबवण्यासाठी काही घरगुती उपायही करता येतील. उचकी लागल्यावर साखर खा. पाण्यात थोडं मीठ घालून प्या. घोट घोट पाणी प्या. हळूहळू श्वास घ्या. यामुळे बरं वाटेल.


## खादाडी

### चविष्ट पिटा पिझ्झा



मित्रांनो, पिझ्झा खायला कोणाला आवडत नाही? तुम्ही घरच्या घरी मस्त पिझ्झा बनवू शकता. यासाठी पिटा ब्रेड, स्पॅगेटी सॉस आणि मोझरेला चीज असं साहित्य लागेल. सर्वात आधी पिटा ब्रेड घ्या. त्यावर स्पॅगेटी सॉस पसरवा. थोडं चीज सॉसच्या वर पसरवा. आता हा ब्रेड ओव्हनमध्ये ठेवा. मिनिटभर बेक करा आणि खा. संध्याकाळी काय खायचं असा प्रश्न पडत असेल तर पिटा पिझ्झा हा स्मार्ट ऑप्शन आहे.

## दोस्त हे मस्त



### असा आहे ॲनाकोंडा

ॲनाकोंडा हा साप असून तो ॲमेझॉनच्या जंगलात आढळतो. ग्रीन ॲनाकोंडा हा जगातला सर्वात मोठा साप आहे. त्याची लांबी जवळपास २० फूट असते. तसंच हा सर्वात वजनदार साप आहे. तो दक्षिण अमेरिकेत आढळतो.

## वाचा तर खरं

### वाढतायंत चक्रीवादळं



दोस्तांनो, जगभरातच अनेक वादळं येत असतात. १९७० मध्ये पूर्व पाकिस्तान म्हणजे आजच्या बांग्लादेशमध्ये 'भोला' नावाचं वादळ आलं होतं. या वादळाने बरंच नुकसान केलं होतं. १९९१ मध्ये बांग्लादेशमध्ये 'मेरियन' नावाचं वादळ आलं होतं. १९७४ च्या 'नीना' या वादळानेही कहर केला होता. अशा नैसर्गिक आपत्ती कमी करण्यासाठी आपण पर्यावरणाचा विचार करायला हवा.

